**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1683 नाग/2010**

श्री जे. बी. रामटेके
द्वारा पवन रामटेके, प्लॉट क्र.63,
आर.पी.टी.एस.रोड, सुरेन्द्र नगर नागपूर
ता. जि. – 15 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा सह संचालक(शिक्षण)
समाज कल्याण संचालनालय, पुणे
3, चर्च रोड, पुणे
2) जन माहिती अधिकारी तथा उप संचालक(प्रशासन)
समाज कल्याण संचालनालय, पुणे
3, चर्च रोड, पुणे ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 3.3.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 30.11.2009 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 14.1.2011 रोजी नोटीस काढून दि. 3.3.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की दि. 7.10.2008 रोजी जन माहिती अधिकारी तथा उप संचालक(प्रशासन) समाज कल्याण संचालनालय, पुणे यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन गृहपालाच्या पदोन्नती बाबत खालीलप्रमाणे 1 ते 3 मुद्यांवर माहिती मागितलेली होती
1. समाज कल्याण निरीक्षकांना गृहपालाची पदोन्नती देतांना कोणते निकष वापरण्यात आले. 2. सदर आदेशातील सर्व कर्मचा–याच्या समाज कल्याण निरीक्षक पदावरील नियुक्तीच्या तारखा उपलब्ध करुन द्याव्या. 3. सदर पदावर जाण्या करीता निरीक्षकांनी विकल्प दिले असल्यास गडचिरोली, नागपूर, वर्धा व भंडारा या जिल्हयातून प्राप्त झालेले विकल्पाच्या प्रती आणि संबंधित जिल्हयाच्या समाज कल्याण अधिकारी यांनी दिलेल्या शिफारस पत्राच्या प्रती. वरील प्रमाणे त्यांनी तीन मुद्यांची माहिती मागितलेली होती. मात्र त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दि. 7.11.2008 च्या पत्राने असे कळविले की अर्जदाराने मागितलेली माहिती 12 वर्षा पूर्वीची असून त्याबाबत कार्यालयीन दप्तरी/अभिलेख कक्षा कडील दप्तरी माहितीचा शोध घेण्यात येत असून माहिती

उपलब्ध होताच माहिती पुरविण्यात येईल. त्यानंतर पुन्हा दि. 12.2.2009 रोजी जन माहिती अधिकारी यांनी त्यांना असे कळविले की आपण मागितलेल्या माहिती बाबत अभिलेख कक्षा कडील दप्तराचा शोध घेण्यात आला. परंतू सदरची माहिती उपलब्ध होवू शकत नाही असे त्यांनी कळविले. म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलानंतरही त्यांना पूर्ण माहिती मिळाली नाही असे त्यांनी आयोगापुढे नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस विद्यमान जन माहिती अधिकारी तथा सहा. संचालक(प्रशासन) समाज कल्याण संचालनालय, पुणे श्री यु. एम. घुले हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा सह संचालक(शिक्षण) समाज कल्याण संचालनालय, पुणे यांच्या तर्फे श्री ई. एस. हार्डींग कार्यालय उपअधिक्षक हे उपस्थित होते.

4. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्त्याचा माहितीचा दि. 7.10.2008 चा अर्ज त्यांचे कार्यालयास दि. 20.10.2008 रोजी प्राप्त झाला. त्या माहितीला अनुसरुन अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीचा शोध घेण्यात आला. तथापी मागितलेली माहिती ही 12 वर्षा पूर्वीची असल्यामुळे माहितीचा शोध घेण्यात येत असून माहिती उपलब्ध होताच माहिती पुरविण्यात येईल असे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी दि. 7.11.2008 च्या पत्राने अपीलकर्त्यास कळविले. तथापी अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीचा शोध घेवून देखील ती माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दि. 16.9.2008 च्या पत्राने पुन्हा तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास कळविले की आपण मागितलेल्या माहितीचा अभिलेख कक्षात शोध घेण्यात आला मात्र माहिती उपलब्ध होवू शकत नाही असे अपीलकर्त्यास कळविले. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपीलीय अधिकारी तथा सह संचालक समाज कल्याण संचालनालय, पुणे यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली. आणि अपीलाचा निर्णय दि. 13.7.2009 रोजी देण्यात आला. त्यामध्ये खालील प्रमाणे माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेश दिले. 1. समाज कल्याण निरीक्षकांना गृहपालाची पदोन्नती देतांना कोणते निकष वापरण्यात आले त्याची माहिती देण्यात यावी. 2. 15 समाज कल्याण निरीक्षकाच्या पदावरील नियुक्तीच्या तारखा उपलब्ध करुन द्याव्या. आणि 3. गृहपाल या पदावरील पदोन्नतीसाठी गडचिरोली, नागपूर, वर्धा व भंडारा या जिल्हयातील समाज कल्याण निरीक्षक यांचे विकल्प आणि संबंधीत जिल्हा समाज कल्याण अधिकारी यांच्या शिफारस पत्राचा पुन्हा शोध घेवून माहिती 30 दिवसात उपलब्ध करुन देण्याचे आदेश दिले.

5. प्रथम अपीलाच्या निर्णया नंतर जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 27.7.2009 रोजी माहिती उपलब्ध करुन दिली. उपलब्ध करुन दिलेल्या माहिती मध्ये समाज कल्याण निरीक्षकाच्या पदावरील नियुक्तीच्या तारखा संदर्भात दि. 1.1.1996 ची समाज कल्याण निरीक्षकाची सेवा जेष्ठता यादी उपलब्ध करुन दिली. बाकी दोन मुद्यांची माहिती उपलब्ध झाली नाही असे अपीलकर्त्यास कळविले.

6. वास्तविक पाहता समाज कल्याण निरीक्षक पदावरुन गृहपाल या पदावर पदोन्नती देतांना कोणते निकष वापरले ही माहिती उपलब्ध जरी नसली तरी गृहपाल या पदावर समाज कल्याण निरीक्षकाना पदोन्नती देतांना सद्या काय निकष आहेत याची माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तीक आहे. तसेच ज्या समाज कल्याण निरीक्षकाना गृहपाल पदावर पदोन्नती देतांना त्यांनी दिलेले विकल्प आता उपलब्ध नाहीत मात्र त्यांना दिलेल्या पदोन्नती बाबत सेवा पुस्तकाच्या नोंदी करण्यात आलेल्या आहेत. त्याची प्रत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना खालील 2 मुद्यांची माहिती यक्तीशः किंवा रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

   1. समाज कल्याण निरीक्षकांना गृहपाल पदावर पदोन्नती देतांना सद्या अस्तीत्वात असलेल्या निकषाची प्रत

   2. ज्या समाज कल्याण निरीक्षकाना गृहपाल पदावर पदोन्नती दिलेली आहे त्या पदोन्नतीबाबत त्यांची सेवा पुस्तकाची नोंदीची प्रत.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1465-1467

जा.क्र.———————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1 नाग/2011**

श्री पॅंथर प्रकाश बन्सोड
अध्यक्ष, भारतीय दलित पॅंथर,
उंटखाना चौक, पॅंथर मुख्यालय,
डॉ. भदंत आनंद कौसल्यायन मार्ग, नागपूर
ता. जि. नागपूर – 440009 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री का. तु. सातकर
प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसचिव,
नगर विकास विभाग
1 ला माळा, नविन प्रशासन भवन, मंत्रालय मुंबई 32
2) श्री चं. वि. धायतडक
जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी(नवि–26)
नगर विकास विभाग
1 ला माळा, नविन प्रशासन भवन, मंत्रालय मुंबई 32 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 3.3.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 31.12.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 7.2.2011 रोजी नोटीस काढून दि. 3.3.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 1.1.2010 रोजी माहितीच्या अधिकारा खाली जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी(नवि–26) नगर विकास विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडे अर्ज सादर करुन डॉ. बाबसाहेब आंबेडकर सांस्कृतिक भवन बांधण्याबाबत नागपूर महानगर पालिकेने दि. 9.6.1993, दि. 3.1.2005, दि. 12.12.2005 अन्वये प्रस्ताव पाठवून त्याबाबत कार्यवाही करण्याची विनंती केली होती. त्याला अनुसरुन नागपूर महानगर पालिकेच्या या तीन पत्रावर काय कार्यवाही केली याची माहिती त्यांनी मागितलेली होती. त्या माहितीच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि. 31 मार्च 2010 रोजी पत्र पाठवून त्या मध्ये

असे नमुद केले की आपल्या अर्जाच्या अनुषंगाने कार्यासन नवि–9 कडून माहिती मागविली असता त्यांनी आपण माहिती मागितलेल्या विषयाबाबतची नस्ती निरीक्षणास्तव शासनास सादर करण्यात आले असून त्यावर अंतीम निर्णय होणे बाकी आहे असे कळविले आसल्यामुळे सदरची माहिती कक्ष अधिकारी नवि–9 यांचेशी संपर्क साधून प्राप्त करुन घ्यावी. तथापी त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे आजच्या सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी यांनी आयोगा समोर असे सांगितले की माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अंतर्गत दि. 1.1.2010 च्या अर्जान्वये नागपूर महानगर पालिकेने डॉ. बाबसाहेब आंबेडकर जन्मशताब्दी वर्षात सांस्कृतिक भवन शोध केंद्र बांधण्याबाबत सचिव नगर विकास यांना पाठविलेल्या दि. 9.6.1993, दि. 3.1.2005, दि. 12.12.2005 च्या पत्रावर करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती मागितलेली आहे. सदर विषय हा नगर विकास विभागातील जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी नवि–9 यांचेशी संबंधीत आहे म्हणून वर नमुद केलेली सर्व पत्रे देखील कार्यासन नवि–9 ला प्राप्त झाले असून त्यांच्या मार्फत कार्यवाही सुरु आहे. तथापी त्यांच्या विभागाच्या नोंदणी शाखेने अपीलकर्ता यांचा सदर अर्ज अनावधानाने नागपूर महानगर पालिकेच्या प्रशासकीय कामकाज पाहणा–या कार्यासनाकडे म्हणजे नवि–26 कडे पाठविल्याने अर्जात नमुद केलेल्या पत्राचा शोध घेण्यास बराच कालावधी गेला. त्यामुळे अपीलकर्ता यांना पाहिजे असलेली माहिती नवि–9 कार्यासनाकडून घेवून त्या आधारे अपीलकर्ता यांना दि. 31.3.2010 च्या पत्राने कळविण्यात आले आहे. मात्र आता सदरची माहिती ही कक्ष अधिकारी नवि–9 यांचेशी संबंधीत असल्याने त्यांचेकडून कार्यवाही करणे अपेक्षित आहे.

6. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्ता यांना त्यांच्या माहितीच्या अर्जाला अनुसरुन विद्यमान जन माहिती अधिकारी नवि–26 यांनी दि. 31.3.2010 च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. सदरची माहिती उपलब्ध होण्यास बराच कालापव्यय झालेला दिसून येतो. मात्र सदरची माहिती कार्यासन नवि–9 यांचेशी संबंधीत असल्यामुळे उपलब्ध होण्यास उशिर झालेला आहे. म्हणून जाणून बुजून माहिती देण्यास विलंब झालेला दिसून येत नाही. ही वस्तुस्थिती जरी असली तरी अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीची अद्यावत वस्तुस्थिती जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी नवि–26 यांनी कक्ष –9 कडून प्राप्त करुन घेवून अपीलकर्त्यास विनामुल्य पुरविणे योग्य होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 30 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी नवि–26 यांनी अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहिती अर्जातील माहितीची अद्यावत वस्तुस्थिती कक्ष अधिकारी नवि–9 कडून प्राप्त करुन घेवून अपीलकर्त्यास उपलब्ध करुन द्यावी.
2) कक्ष अधिकारी नवि–9 यांना आदेशित करण्यात येते की त्यांनी अपीलकर्त्याच्या वर नमुद केलेल्या अर्जावरील अद्यावत वस्तुस्थितीची माहिती कक्ष अधिकारी नवि–26 यांचेकडे 30 दिवसाचे आंत उपलब्ध करुन द्यावी.
3) सदरच्या निर्णयाची एक प्रत कक्ष अधिकारी(नवि–9) नगर विकास विभाग 1 ला माळा, नविन प्रशासन भवन, मंत्रालय मुंबई 32 यांचेकडे स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.
4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1469-1471

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1689 नाग/2010

श्री देवराव नत्थुजी चटप
20 ओंकार नगर, पोष्ट पार्वतीनगर,
रिंग रोड नागपूर
ता. जि. नागपूर 440 027 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री विजय धापके
प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंड विकास अधिकारी
पंचायत समिती नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्रीमती छायाताई इंगोले
जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी
पंचायत समिती कार्यालय
सिव्हील लाईन्स, नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 4.3.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 9.12.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 14.1.2011 रोजी नोटीस काढून दि. 4.3.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 17.5.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती नागपूर यांचेकडे मॅट्रिक एस.टी.सी. ट्रेन्ड शिक्षकांना 120–220 या वेतनश्रेणीस (बडकस) सुधारीत वेतन निश्चिती करुन थकबाकी मिळण्याबाबतची माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून चुकीची माहिती देण्यात आली. त्यांना मॅट्रिक एस.टी.सी. ट्रेन्ड 120–220 या वेतनश्रेणी नुसार सुधारीत वेतन निश्चित करुन थकबाकी त्यांना मिळालेली नाही तसेच त्यांना थकबाकीचा लाभ न देता एक वेतनवाढ काढून एस.टी.सी.ची थकबाकी दिली नाही परंतू रु. 9911/– थकबाकी दिल्याची खोटी माहिती दिली प्रत्यक्षात ही थकबाकी पी.टी.सी.ची आहे. म्हणून त्यांना

प्रत्यक्षात माहिती मिळाली नाही. त्यासाठी त्यांनी प्रथम अपील खंड विकास अधिकारी यांचेकडे दाखल केले. तथापी प्रथम अपीलाच्या निर्णयानंतरही त्यांना एस.टी.सी.ची थकबाकी मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे आजच्या सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी पंचायत समिती नागपूर श्रीमती छायाताई इंगोले हया उपस्थित होत्या. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंड विकास अधिकारी पंचायत समिती नागपूर श्री विजय धापके हे उपस्थित होते. त्यांनी सुनावणीत असे नमुद केले की अपीलकर्त्याचा दि. 17.5.2010 चा माहिती अधिकारा खालील अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दि. 25.5.2010 ला पोस्टाने प्राप्त झाला. त्या अर्जानुसार अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी दि. 21.6.2010 च्या पत्राने कळविले आहे की व्हाऊचर क्र. 897 दि. 7.11.2009 अन्वये एस.टी.सी. ट्रेन्ड 120–220 या वेतनश्रेणी नुसार रु. 9911/– थकबाकी अदा करण्यात आलेली आहे. त्यावर अपीलकर्त्याने सुनावणीत असे सांगितले की सदरची थकबाकी ही एस.टी.सी. ट्रेन्डची नसून पी.टी.सी.ची आहे. कारण थकबाकी देयकावर पी.टी.सी. असे लिहीले आहे. त्यामुळे त्यांना एस.टी.सी. ट्रेन्डची थकबाकी मिळणे आवश्यक आहे. मात्र याबाबत जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्त्याच्या रु. 9911/– च्या देयकावर नजरचुकीने एस.टी.सी. ऐवजी पी.टी.सी. असे लिहीले गेलेले आहे. प्रत्यक्षात सदरची थकबाकी ही एस.टी.सी. ट्रेन्डचीच आहे आणि ही वस्तुथिती अपीलकर्त्यास प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर देखील सविस्तरपणे दि. 16.7.2010 च्या पत्राने कळविले आहे. सदरचे पत्र अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने मान्य केले.

5. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्यास रु. 9911/– ची थकबाकी अदा करण्यात आलेली आहे.. सदरची थकबाकी ही एस.टी.सी. ट्रेन्डची असून नजरचुकीन त्या देयकावर पी.टी.सी.ची थकबाकी दर्शविण्यात आल्याचे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. म्हणून जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिलेली थकबाकी रु. 9911/– ही पी.टी.सी.ची नसून एस.टी.सी. ट्रेन्डची आहे असे स्पष्टपणे कळविणे संयुक्तीक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना रु. 9911/– थकबाकीची रक्कम अदा केलेली आहे ती रक्कम पी.टी.सी.ची नसून एस.टी.सी. ट्रेन्डची अदा केलेली आहे असे स्पष्टपणे अपीलकर्त्यास व्यक्तीशः किंवा रजिस्टर पोस्टाने कळवावे.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1473-1475

जा.क्र.––––––––– दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1691 नाग/2010

श्री निशिकांत ओमकारनाथ मेश्राम
नया बाजार कामठी
ता. कामठी जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री पांढरे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी
नगर परिषद कामठी
ता. कामठी जि. नागपूर
2) श्री बोरकर
जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता
नगर परिषद कामठी
ता. कामठी जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 4.3.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 22.11.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 14.1.2011 रोजी नोटीस काढून दि. 4.3.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 24.8.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता नगर परिषद कामठी यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन शुक्रवारी बाजार सब्जी मार्केटचा नकाशा, वर्क ऑर्डर, जे.ई.कंप्लीशन रीपोर्ट इत्यादी बाबतची माहिती त्यांनी मागितलेली होती. मात्र त्यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील मुख्याधिकारी नगर परिषद कामठी यांचेकडे दाखल केले. त्या प्रथम अपीलाची सुनावणी होवून प्रथम अपीलाचा निर्णय दि. 18.11.10 रोजी देण्यात आला आणि त्या निर्णयामध्ये अपीलकर्त्यास 10 दिवसाचे आत माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश दिले होते. मात्र त्यानंतरही अपीलकर्त्यास माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता नगर परिषद कामठी श्री बोरकर हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी

नगर परिषद कामठी श्री पांढरे हे देखील उपस्थित होते. जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीत आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 24.8.2010 चा माहिती मागण्याचा अर्ज त्यांचेकडे प्राप्त झाला होता. माहिती अर्जाला अनुसरुन ती माहिती तयार करण्यात आली आणि अपीलकर्त्यास माहिती घेवून जाण्याबाबत तोंडी निरोप देण्यात आला होता. मात्र अपीलकर्ता माहिती घेण्यास कार्यालयात आले नाहीत. मात्र यावर अपीलकर्ता यांनी असे सांगितले की त्यांना माहिती घेवून जाण्याबाबतचा कोणताही तोंडी निरोप मिळाला नाही किंवा त्यांना लेखी पत्र देखील दिलेले नाही. याउलट माहिती घेण्यासाठी अपीलकर्त्याने जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात वेळोवेळी पाठपुरावा केला मात्र त्यांना माहिती मिळाली नाही असे अपीलकर्त्याने सांगितले. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील मुख्याधिकारी नगर परिषद कामठी यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि. 18.11.10 रोजी देण्यात आला होता. परंतू निर्णयामध्ये अपीलकर्त्यास 10 दिवसाचे आत माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश दिले होते. प्रथम अपीलाच्या निर्णयानंतरही अपीलकर्ता माहिती घेण्यास कार्यालयात आले नाहीत. म्हणून त्यांना माहिती उपलब्ध करुन देता आली नाही असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले. तसेच जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असेही सांगितले की अपीलकर्त्याला पाहिजे असलेली माहिती त्यांनी सोबत आणलेली असून आयोगा समोर ती माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देण्याची तयारी दर्शविली. त्याला अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी आयोगा समोर आज दि. 4.3.2011 रोजी अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्याने स्वीकृत करुन पोच दिली.

4. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकत्याच्या दि. दि. 24.8.2010 चा माहिती अर्जाला अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास 30 दिवसाचे आत माहिती दिलेली दिसून येत नाही. तसेच माहिती घेवून जाण्याबाबत अपीलकर्त्यास कोणताही पत्रव्यवहार जन माहिती अधिकारी यांनी केलेला दिसून येत नाही. केवळ माहिती घेवून जाण्याबाबत अपीलकर्त्यास तोंडी निरोप दिला असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे योग्य दिसून येत नाही. तसेच प्रथम अपीलाच्या निर्णयानंतरही जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास 10 दिवसाचे आत माहिती उपलब्ध करुन दिल्याबाबत कोणताही पुरावा आयोगा समोर दाखविला नाही फक्त माहिती घेवून जाण्याबाबत तोंडी निरोप अपीलकर्त्यास दिला असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे योग्य दिसून येत नाही. तथापी अपीलकत्याच्या दि. 24.8.2010 च्या माहिती अर्जाला अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास आयोगा समोर दि. 4.3.2011 रोजी माहिती उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती विलंबाने अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिल्याचे दिसते. या विलंबाबद्यल जन माहिती अधिकारी यांना विचारणा केली असता त्यांनी सुनावणीत असे सांगितले की माहिती घेवून जाण्याबाबत अपीलकर्त्यास तोंडी कळविण्यात आले होते मात्र कोणताही लेखी पुरावा त्यांनी आयोगा समोर दाखविला नाही. म्हणून जन माहिती अधिकारी यांनी विलंबाबद्यल केलेला खुलासा

संयुक्तीक व योग्य दिसून येत नाही. म्हणून ते विलंबास जबाबदार दिसून येतात. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता नगर परिषद कामठी यांनी अपीलकर्त्यास दि. 24.8.2010 च्या माहिती अर्जाला अनुसरुन 30 दिवसांत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही तसेच सदरची माहिती आयोगा समोर दि. 4.3.2011 रोजी अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती उपलब्ध करुन देण्यास सुमारे 5 महिन्याचा विलंब झालेला दिसून येतो. म्हणून या विलंबाबद्यल जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 (1) अन्वये रु. 15000/— ची शास्ती लादण्यात येत आहे. सदरच्या शास्तीची वसुली ही त्यांचे दरमहाचे वेतनातून मुख्याधिकारी नगर परिषद कामठी यांनी वसुल करावयाची असून लेखाशिर्ष ''0070—इतर प्रशासनिक सेवा, 60, इतर सेवा, 800, इतर जमा रकमा, (18) माहितीचा अधिकार (0070—016'1)'' मध्ये जमा करण्यात यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1477-1479

जा.क्र.———————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1690 नाग/2010

श्री रमेशकुमार मनोहरलाल बाली
फुटाना ओली, कामठी
ता. कामठी जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी
सेठ रामनाथ लोईया हायस्कूल, कामठी
ता. कामठी जि. नागपूर
2) श्री आर. एम. डुंबरे
जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक
सेठ रामनाथ लोईया हायस्कूल, कामठी
ता. कामठी जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 4.3.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 7.12.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 14.1.2011 रोजी नोटीस काढून दि. 4.3.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे हजर होते. त्यांनी सुनावणीत असे सांगितले की त्यांनी दि. 21.9.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक सेठ रामनाथ लोईया हायस्कूल, कामठी यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन शाळेतील यशोदा माणिकलाल सोनवणे यांच्या स्कूल लिव्हींग सर्टिफिकेटची प्रत तसेच 2008–09 व 2009–2010 वर्षातील ऑडीट रिपोर्टची कॉपी आणि शाळेच्या पदाधिका–याची माहिती मागितलेली होती. सदरचा माहितीचा अर्ज त्यांनी पोस्टाने पाठविलेला होता. तथापी विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. मात्र त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले असे त्यांनी सांगितले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक हे उपस्थित होते. त्यांनी सुनावणीत आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 21.9.2010 चा माहितीचा अर्ज अद्याप पर्यंत त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झालेला नाही. म्हणून अपीलकर्त्यास माहिती पुरविता आली नाही. तसेच जन माहिती अधिकारी यांनी असेही

सांगितले की अपीलकर्ता हे त्रास देण्याच्या हेतूने शाळेकडे वेगवेगळया प्रकारची माहिती मागविल्याचे दर्शवितात परंतू प्रत्यक्ष माहिती मागण्याचा अर्ज ते शाळेकडे पाठवित नाहीत आणि त्यानंतरही राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल करुन शाळेचा आणि मुख्याध्यापकाचा वेळ वाया घालवितात. त्यामुळे अशा अर्जदारावर कार्यवाही करावी असे मुख्याध्यापकाने सुनावणीत नमुद केले.

4. माहितीच्या अर्जाबाबत अपीलकर्त्यास विचारणा केली असता त्यांनी असे सांगितले की माहिती मागण्याचा अर्ज त्यांनी पोस्टाद्वारे पाठविला होता. परंतू तो अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाला नाही असे जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे. सदरचा अर्ज जन माहिती अधिकारी यांचेकडे प्राप्त झाल्याचा कोणताही पुरावा अपीलकर्ता हे सुनावणीत आयोगासमोर दाखवू शकले नाही.

5. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याचा दि. 21.9.2010 चा माहिती अर्ज जन माहिती अधिकारी यांचेकडे पोस्टाद्वारे प्राप्त झालेला दिसून येत नाही. तथापी आयोगाकडून द्वितीय अपीलाच्या सुनावणी नोटीस बरोबर माहितीचा अर्ज त्यांना प्राप्त झाला. म्हणून जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना त्यांनी मागितलेली माहिती पुरविणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी अपीलकर्ता यांना त्यांचेकडील दि. 21.9.2010 च्या अर्जात मागितलेली माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1481-1482

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 3 नाग / 2011

श्री पॅंथर प्रकाश बन्सोड
सचिव, सिव्हील हयुमन राईटस् प्रोटेक्शन असा.,
180,उंटखाना मेडीकल कॉलेज रोड, नागपूर
ता. जि. नागपूर – 440009 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री पाटील
प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग)
जिल्हा परिषद नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्रीमती पतींगे
जन माहिती अधिकारी
माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 5.3.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 30.12.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 7.2.2011 रोजी नोटीस काढून दि. 5.3.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी माहितीच्या अधिकारा खाली जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे अर्ज सादर करुन समाज कल्याण विभाग जिल्हा परिषद नागपूर यांनी दि. 19.1.2010 रोजी शिक्षणाधिकारी यांचेकडे पाठविलेल्या पत्रावर केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितलेली होती. तथापी जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून त्यांनी शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग) जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे दि. 26.3.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी दि. 9.4.2010 रोजी घेण्यात आली मात्र त्यांना प्रथम अपीलाचा निर्णय मिळाला नाही. प्रथम अपीलाचा निर्णय प्राप्त

होण्यासाठी त्यांनी दोन स्मरणपत्रे दिली तरी देखील प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाचा निर्णय त्यांना पाठविलेला नाही. म्हणून माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अन्वये त्यांना 30 दिवसात जन माहिती अधिकारी यांचेकडून माहिती उपलब्ध झाली नाही तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणी घेवून निर्णय दिला नाही म्हणून जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांचे विरुध्द शास्तीची कार्यवाही करावी असे अपीलकर्ता यांनी सुनावणीत आयोगापुढे सांगितले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद नागपूर श्रीमती पतींगे हया उपस्थित होत्या. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 23.2.2010 चा माहितीचा अर्ज प्राप्त झाला होता. त्यावेळी जन माहिती अधिकारी म्हणून तत्कालीन अधिक्षक माध्यमिक शिक्षण विभाग श्री एस. पी. राऊत हे जन माहिती अधिकारी म्हणून कार्यरत होते. त्यांनी 30 दिवसाच्या मुदतीत या अर्जावर कोणतीही कार्यवाही केलेली नाही असे त्यांचेकडे उपलब्ध असलेल्या रेकॉडवरुन दिसून येते. कारण विद्यमान जन माहिती अधिकारी हया दि. 1.9.2010 पासून कार्यरत आहेत. त्यामुळे 30 दिवसाच्या मुदतीत अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन न देण्यास त्या जबाबदार नसून तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री एस. पी. राऊत हे जबाबदार आहेत असे विद्यमान जन माहिती अधिकारी श्रीमती पतींगे यांनी आयोगापुढे नमुद केले.

4. आजच्या सुनावणीस प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग) जिल्हा परिषद नागपूर श्री पाटील हे उपस्थित होते. त्यांनी सुनावणीत असे नमुद केले की अपीलकर्त्याचे प्रथम अपील दि. 26.3.2010 रोजी दाखल झालेले होते. प्रथम अपीलाची सुनावणी दि. 9.4.2010 रोजी घेण्यात आली मात्र प्रथम अपीलाचा निर्णय काय दिला याबाबतचे कोणतेही कागदपत्र त्यांनी आयोगा समोर दाखल केलेले नाही. किंवा त्याबाबत कोणताही समाधानकारक खुलासा त्यांनी आयोगापुढे केला नाही त्यामुळे प्रथम अपीलाचा निर्णय अपीलकर्त्यास पाठविल्याचे दिसून येत नाही.

5. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याच्या दि. 23.2.2010 च्या माहिती अधिकारा खालील अर्जाची माहिती 30 दिवसाच्या आंत तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री एस. पी. राऊत यांनी दिलेली नाही तसेच श्री एस. पी. राऊत यांनी माहितीच्या अर्जाची कोणतीही दखल घेतलेली नाही म्हणून माहिती देण्यास विलंब झालेला आहे आणि त्या विलंबास श्री एस. पी. राऊत तत्कालीन जन माहिती अधिकारी हे जबाबदार दिसून येतात. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 (1) अन्वये रु. 10000/– ची शास्ती का लादण्यात येवू नये याचा खुलासा त्यांचेकडून प्राप्त करणे आवश्यक आहे. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (1) प्रमाणे प्रथम अपीलाची सुनावणी घेवून निर्णय निर्गमित केलेला दिसत नाही म्हणून प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून त्यांच्यावर टाकलेली जबाबदारी त्यांनी पार पाडलेली नाही असे दिसून येते. म्हणून अपीलकर्ता यांचे मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री एस. पी. राऊत यांनी अपीलकर्ता यांच्या दि. 23.2.2010 रोजीच्या माहितीच्या अधिकारा खाली अर्जाची कोणतीही दखल घेतलेली नाही त्यामुळे अपीलकर्त्यास 30 दिवसात माहिती उपलब्ध झालेली नाही म्हणून माहिती उपलब्ध करुन देण्याच्या विलंबास ते जबाबदार दिसून येतात. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 (1) अन्वये रु. 10000/- ची शास्ती का लादण्यात येवू नये याचा खुलासा हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसात आयोगाकडे दाखल करावा. त्यांनी खुलासा न केल्यास त्यांच्यावर शास्तीची कार्यवाही लादण्यात येईल याची नोंद घ्यावी.

2) विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी या निर्णयाची एक प्रत तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री एस. पी. राऊत यांचेकडे खुलसा सादर करण्यासाठी पाठवावी.

3) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग) जिल्हा परिषद नागपूर यांनी प्रथम अपीलाची सुनावणी घेवून देखील निर्णय दिलेला नाही म्हणून माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (1) प्रमाणे त्यांच्यावर सोपविलेली जबाबदारी त्यांनी पार पाडलेली नाही म्हणून त्यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येते.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1484-1486

जा.क्र.---------- दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1695 नाग/2010**

श्री धरमराज झिबल तिवाडे
रा.बोंद्री(कांद्री) मनसर
ता. रामटेक जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री राजेश बागडे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंड विकास अधिकारी
पंचायत समिती रामटेक
ता. रामटेक जि. नागपूर
2) श्री व्ही. एस. सिंगाडे
जन माहिती अधिकारी तथा सचिव
ग्रामपंचायत बोंद्री(कांद्री) मनसर
ता. रामटेक जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 5.3.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 13.12.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 14.1.2011 रोजी नोटीस काढून दि. 5.3.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांच्या वतीने ॲड. बरबटकर यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्ता यांनी दि. 21.7.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा सचिव ग्रामपंचायत बोंद्री(कांद्री) मनसर ता. रामटेक यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन घरकूल योजने संदर्भात श्रीमती सुनिता राजू तिवाडे यांच्या घरकूलाची 1 ते 4 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. त्यांना तीन मुद्यांची माहिती प्राप्त झाली मात्र एका मुद्याची माहिती म्हणजे श्रीमती सुनिता राजू तिवाडे यांना ज्या प्लॉट वर घरकूल मंजूर केलेला आहे त्या प्लॉटचा गाव नमुना नं. 8 ची प्रत त्यांना मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा सचिव ग्रामपंचायत बोंद्री(कांद्री) आणि प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंड विकास अधिकारी पंचायत समिती रामटेक हे उपस्थित होते. त्यांनी सुनावणीत असे सांगितले की अपीलकर्त्याच्या दि. 21.7.2010

च्या अर्जाला अनुसरुन अपीलकर्त्यास दि. 12.8.2010 च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तथापी घरकूल योजने अंतर्गत श्रीमती सुनिता राजू तिवाडे यांना ज्या प्लॉट वर घरकूल मंजूर केलेला आहे तो प्लॉट त्यांचे पती राजू कवडू तिवाडे यांच्या नावावर आहे. त्यामुळे श्रीमती सुनिता राजू तिवाडे यांच्या नावावर तो प्लॉट नाही. शासनाच्या सुचने प्रमाो पती पत्नी पैकी कोणा एकाच्या नावावर प्लॉट असल्यास घरकूल मंजूर करण्यात येते. म्हणून श्रीमती सुनिता राजू तिवाडे यांना घरकूल मंजूर झालेला आहे. म्हणून आयोगा समोर राजू कवडू तिवाडे यांच्या प्लॉटचा गाव नमुना नं. 8 चा उतारा जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याच्या वकीलांना उपलब्ध करुन दिला. सदरच्या प्लॉटचा उतारा अपीलकर्त्याच्या वकीलांनी आयोगा समोर स्वीकारुन पोच दिली. अपीलकर्त्यास आयोगा समोर माहिती मिळाल्यामुळे अपील खारीज करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1488-1489

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 4 नाग/200

श्री पॅंथर प्रकाश बन्सोड
सचिव, सिव्हील हयुमन राईटस् प्रोटेक्शन असा.,
180,उंटखाना मेडीकल कॉलेज रोड, नागपूर
ता. जि. नागपूर – 440009 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री पाटील
प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद नागपूर
ता. जि. नागपूर
2) जन माहिती अधिकारी मुख्याध्यापिका
वसंतराव नाईक कृषी विद्यालय, सिर्सी
ता. उमरेड जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 7.3.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 30.12.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 7.2.2011 रोजी नोटीस काढून दि. 7.3.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी मुख्याध्यापिका हया गैरहजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद नागपूर हे हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे सुनावणीत असे नमुद केले की त्यांनी दि. 19.3.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका वसंतराव नाईक कृषी विद्यालय, सिर्सी ता. उमरेड यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ नागपूर विभागीय मंडळ यांनी आयोजित केलेल्या फेब्रुवारी मार्च 2010 या परीक्षेच्या शुल्काबाबत तसेच शिष्यवृत्ती वाटपाबाबत इत्यादीची माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपीलाची सुनावणी होवून देखील प्रथम अपीलाचा लेखी निर्णय त्यांना

अद्यापही प्राप्त झाला नाही व माहिती देखील प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले. तसेच जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही म्हणून त्यांचे विरुध्द शास्तीची कार्यवाही करावी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाची सुनावणी घेवूनही अद्यापपर्यंत लेखी निर्णय दिलेला नाही म्हणून त्यांचे विरुध्दही कार्यवाही करावी असे अपीलकर्ता यांनी सुनावणीत आयोगा समोर सांगितले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी हे उपस्थित नसल्यामुळे त्यांचे कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही. तथापी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका वसंतराव नाईक कृषी विद्यालय, सिर्सी ता. उमरेड यांनी अपीलकर्त्याच्या दि. 19.3.2010 च्या माहिती अर्जाची कोणतीही दखल घेतलेली नाही तसेच अपीलकर्त्यास 30 दिवसात माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्या दोषी आढळून येतात. म्हणून माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 (1) प्रमाणे त्यांचे विरुध्द रु. 15000/– ची शास्तीची कार्यवाही कां करु नये याबद्यलचा लेखी खुलासा त्यांनी आयोगापुढे करावा.

4. आजच्या सुनावणीस प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद नागपूर हे सुनावणीस उपस्थित होते. त्यांनी सुनावणीत असे नमुद केले की अपीलकर्त्याचे प्रथम अपील त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाले होते. त्याची सुनावणी घेण्यात आली होती आणि प्रथम अपीलात मुख्याध्यापिकेला 8 दिवसात अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश दिलेले होते. मात्र कार्यबाहुल्यामुळे प्रथम अपीलाचा निर्णय निर्गमीत करता आला नाही. वास्तविक पाहता माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (1) प्रमाणे प्रथम अपील दाखल झाल्यानंतर 30 दिवसाच्या आत किंवा कारणे नमुद करुन 45 दिवसाच्या आत लेखी निर्णय देणे आवश्यक आहे. मात्र प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांचेकडे सोपविलेली ही जबाबदारी व्यवस्थीतरीत्या पार पाडलेली नाही म्हणून त्यानी भविष्यात पुन्हा अशा प्रकारची पुनरावृत्ती करु नये अशी सक्त ताकीत त्यांना देण्यात येत आहे. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाचा निर्णय देवून अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी.
2) जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका वसंतराव नाईक कृषी विद्यालय, सिर्सी ता. उमरेड यांनी अपीलकर्त्याच्या दि. 19.3.2010 च्या माहिती अर्जाची कोणतीही दखल घेतलेली नाही तसेच अपीलकर्त्यास 30 दिवसात माहिती

उपलब्ध करुन दिलेली नाही म्हणून त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 (1) प्रमाणे त्यांचे विरुध्द रु. 15000/– ची शास्ती कां लादण्यात येवू नये याबद्यलचा लेखी खुलासा त्यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसात आयोगाकडे करावा. अन्यथा त्यांचे विरुध्द शास्तीची कार्यवाही करण्यात येईल.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1486-1488

जा.क्र.––––––––– दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1702 नाग/2010**

श्री अशाक रायभान चिमणकर
प्लॉट नं. 176, शिक्षक कॉलनी, भरत नगर
कळमना मार्केट रोड नागपूर
ता. जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री पाटील
प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग)
जिल्हा परिषद नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्रीमती पतंगे
जन माहिती अधिकारी
माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद कार्यालय नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 7.3.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 16.12.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 19.1.2011 रोजी नोटीस काढून दि. 7.3.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 22.9.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी माध्यमिक जिल्हा परिषद नागपूर यांच्या कार्यालयाकडे त्यांनी माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन दि. 1.4.1999 ते 20.9.2010 पर्यंत शिपाई पदासाठी समायोजित करण्यासाठी समायोजित केलेल्या आदेशाची प्रमाणीत प्रत अशी माहिती मागितलेली होती. मात्र त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे दाखल केले. तथापी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि. 11.11.2010 च्या पत्राने अपीलकर्ता यांना दि. 1.4.1999 ते 20.9.2010 पर्यंतची मागितलेली माहिती दि. 22.9.2010 ला उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपील खारीज केले असे अपीलकर्ता यांनी सुनावणीत सांगितले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा माध्यमिक शिक्षण विभाग, जिल्हा परिषद नागपूर श्रीमती पतंगे आणि प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद नागपूर श्री पाटील हे उपस्थित होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचे याच विषयाचे अपील क्र. 1657/2010 आयोगाकडे दाखल झालेले होते. त्या अपीलाची सुनावणी होवून आयोगाने दि.15.2.2010 रोजी निर्णय दिलेला होता. आणि त्या निर्णयातील आदेशा प्रमाणे अपीलकर्त्यास दि. 24.2.2011 रोजी आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच अपीलकर्त्यास मागितलेली माहिती यापूर्वीच दि. 22.9.2010 च्या पत्राने उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यामुळे हे अपील खारीज करावे असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले.

4. प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्यास आयोगाकडील अपील क्र. 1657/2010 मधील दि.15.2.2010 च्या निर्णयाप्रमाणे अपीलकर्त्यास प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि. 24.2.2011 च्या पत्राने सविस्तर माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच दि. 22.9.2010 च्या पत्राने अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1490-1491

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1703 नाग/2010**

श्री विजय मधुकर चौधरी
C/o प्रभाकर चौधरी मु. पो. वाढोणा
ता. आर्वी जि. वर्धा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी
पोलीस अधिक्षक कार्यालय वर्धा
ता. जि. वर्धा

2) जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधिक्षक(मुख्यालय)
पोलीस अधिक्षक कार्यालय वर्धा
ता. जि. वर्धा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 7.3.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 16.12.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 19.1.2011 रोजी नोटीस काढून दि. 7.3.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 15.6.2010 रोजी जन माहिती अधिकारी पोलीस अधिक्षक कार्यालय वर्धा यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन पोलीस स्टेशन खरांगणा अपराध क्र. 48/2009 या गुन्हयाच्या तपासाबाबत अर्जदार यांचे दि.30.11.2009 चे तक्रार अर्जावर विशेष पोलीस निरीक्षक नागपूर यांनी दि. 3.12.2009 प्रमाणे अर्जदाराचे मुळ तक्रारीसह चौकशी करण्याचे पत्र दिलेले आहे. त्यावर केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितलेली होती. जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दि. 9.8.2010 च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिली. मात्र सदरची माहिती ही बनावट कागदपत्राच्या आधारे तयार केलेली आहे असे त्यांनी सुनावणीत नमुद केले. म्हणून त्यांनी प्रथम अपील

दि. 21.8.2010 रोजी पोलीस अधिक्षक वर्धा यांचेकडे दाखल केले. सदरचा अपील अर्ज जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधिक्षक(मुख्यालय) पोलीस अधिक्षक कार्यालय वर्धा यांनी उपविभागीय पोलीस अधिकारी पुलगाव यांचेकडे पाठविला. त्याला अनुसरुन उपविभागीय पोलीस अधिकारी यांनी दि. 3.11.2010 रोजी अपीलकर्ता यांना कळविले की आपल्या अर्जात नमुद केल्याप्रमाणे घटनेची चौकशी आम्ही स्वतः केलेली असून संपूर्ण माहिती ही पूर्णतः खरी आहे असे कळविल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या वतीने पोलीस उपनिरीक्षक श्री उल्हास भूसारी ठाणेदार खरांगणा हे उपस्थित होते. त्यांनी सुनावणीत आयोगापुढे असे नमुद केले की अपीलकर्त्यास दि. 9.8.2010 च्या पत्रा प्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. या माहिती मध्ये विशेष पोलीस निरीक्षक नागपूर परीक्षेत्र नागपूर यांच्या कडील दि. 3.12.2009 च्या पत्रातील सुचनांप्रमाणे अपीलकर्त्याच्या तक्रार अर्जाची चौकशी उपविभागीय पोलीस अधिकारी पुलगाव यांचेकडून करुन घेण्यात आली व त्याचा सविस्तर अहवाल विशेष पोलीस निरीक्षक नागपूर यांना सादर केलेला आहे. त्या अहवालाची प्रत अपीलकर्त्यास दि. 9.8.2010 च्या पत्राने उपलब्ध करुन दिलेली आहे.

4. मात्र या चौकशी अहवाला बाबत अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांनी केलेली चौकशी ही बनावट कागदपत्राच्या आधारे केलेली आहे.

5. प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी दि. 9.8.2010 च्या पत्राने आवश्यक ती माहिती म्हणजे विशेष पोलीस निरीक्षक नागपूर यांच्याकडे सादर केलेल्या चौकशीची प्रत उपलब्ध करुन दिलेली आहे. मात्र सदर चौकशी अहवालाच्या गुणवत्तेबाबतचा निर्णय आयोगाच्या कार्यकक्षेत येत नाही त्यासाठी अपीलकर्त्यास केलेली चौकशी मान्य नसल्यास त्या चौकशीसाठी सक्षम अधिका—याकडे दाद मागणे योग्य होईल. तथापी अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांचेकडून दि. 9.8.2010 च्या पत्रा प्रमाणे माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1493-1495

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1704 नाग/2010

श्री सीताराम किसना सोरटे
महावीर वार्ड हिंगणघाट
ता. हिंगणघाट जि. वर्धा –442 301 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री संजय दैने
प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी
हिंगणघाट
ता. हिंगणघाट जि. वर्धा

2) श्री संजय काटपाताळ
जन माहिती अधिकारी तथा शिरस्तेदार
उपविभागीय अधिकारी कार्यालय हिंगणघाट
ता. हिंगणघाट जि. वर्धा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 7.3.2011 )**

### नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक 16.12.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 19.1.2011 रोजी नोटीस काढून दि. 7.3.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे सुनावणीत असे नमुद केले की त्यांनी दि. 7.8.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा शिरस्तेदार उपविभागीय अधिकारी कार्यालय हिंगणघाट यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन पूरपीडीत (पोथरा प्रकल्प) वसाहतीतील भूखंड विक्री परवानगीबाबतची मागील 20 वर्षापासूनची 1 ते 5 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दि. 1.9.10 च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन

दिली. मात्र सदरची माहिती समाधानकारक नसल्यामुळे त्यांनी प्रथम अपील उपविभागीय अधिकारी हिंगणघाट यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाच्या निर्णयानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा शिरस्तेदार श्री संजय काटपाताळ आणि प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी हिंगणघाट श्री संजय दैने हे उपस्थित होते. त्यांनी आयोगापुढे सुनावणीत असे नमुद केले की अपीलकर्त्याचा माहिती मागण्याचा दि. 7.8.2010 चा अर्ज त्यांचेकडे प्राप्त झाला होता. त्या माहिती अर्जाला अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी दि. 1.9.10 च्या पत्रान्वये त्यांचेकडे उपलब्ध असलेली माहिती अपीलकर्त्यास दिलेली होती. त्यानंतर अपीलकर्त्याने दि. 16.9.2010 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी दि. 29.9.2010 रोजी घेण्यात आली. आणि निर्णय देखील दि. 29.9.2010 रोजी देण्यात आला. आणि त्या निर्णयानुसार 3 मुद्यांची माहिती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली आहे. मात्र मुद्या क्र. 1 आणि 2 ची माहिती जन माहिती अधिकारी यांनी 15 दिवसात उपलब्ध करुन देण्याचे आदेश दिले होते. प्रथम अपीलाच्या निर्णयाला अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीत असे नमुद केले की मुद्या क्र. 1 बाबत श्री वसंत धर्माजी भगत यांना 3500 चौ.फूटा पैकी 1 हजार चौ.फूट जागा विक्रीची परवानगी दि. 17.9.2010 च्या आदेशा प्रमाणे दिलेली आहे. मात्र महालेखाकार यांच्या ऑडीट मधील आक्षेपा प्रमाणे शासकीय भूखंड विक्री करण्याचे अधिकार हे जिल्हाधिकारी यांना असल्यामुळे अपीलकर्त्याचा भूखंड विक्रीचा प्रस्ताव जिल्हाधिकारी वर्धा यांचेकडे पाठविलेला आहे. तसेच अपीलकर्त्याच्या भूखंड विक्री बाबतच्या त्रुटीची पूर्तता करुन त्याचा पूर्तता अहवाल दि. 8.7.2010 च्या पत्राने जिल्हाधिकारी वर्धा यांचेकडे पाठविलेला आहे.

4. म्हणून प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की शासकीय भूखंड विक्रीस परवानगी देण्याचे अधिकार हे जिल्हाधिकारी यांना असल्यामुळे अपीलकर्त्याचा भूखंड विक्रीचा प्रस्ताव जिल्हाधिकारी वर्धा यांचेकडे सादर केलेला आहे. म्हणून अपीलकर्त्याने जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये याबाबत पाठपुरावा करणे संयुक्तिक होईल.

5. तथापी अपीलकर्त्याने मागितलेल्या माहिती अर्जातील मुद्या क्र. 1 बाबत श्री वसंत धर्माजी भगत यांना भूखंड विक्रीस परवानगी दिल्याबाबतची वस्तुस्थितीदर्शक माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास स्पष्टपणे कळविणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना त्यांच्या माहिती अर्जातील वर नमुद केल्याप्रमाणे वस्तुस्थितीदर्शक माहिती विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1497-1499

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1711 नाग/2010 व अपील क्रमांक 1712 नाग/2010**

**<u>अपील क्रमांक 1711 नाग/2010</u>**

श्री प्रमोद मारोतराव पांडे
उपाध्यक्ष–जनमंच, नागपूर
एम–5, प्रिमियम प्लाझा बिल्डींग, 1ला माळा,
242, खरे टाऊन, धरमपेठ, नागपूर –440010 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री ए. एस. तांदळे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी
गडचिरोली
ता. जि. गडचिरोली
2) जन माहिती अधिकारी
जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालय गडचिरोली
ता. जि. गडचिरोली ..... **उत्तरवादी**

**<u>अपील क्रमांक 1712 नाग/2010</u>**

1) श्रीमती प्रज्ञा गोळघाटे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय कृषी सहसंचालक
नागपूर विभाग नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री एस. के. दिक्षीत
जन माहिती अधिकारी
विभागीय कृषी सहसंचालक कार्यालय नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 8.3.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 15.12.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. दोन्ही अपीलांमध्ये माहिती मागण्याचा विषय एकच असल्यामुळे आणि दोन्ही अपीलांमध्ये कृषी विभागाचे अधिकारी उत्तरवादी असल्यामुळे दोन्ही अपीलांची एकत्रीत

सुनावणी घेण्यासाठी अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 19.1. 2011 रोजी नोटीस काढून दि. 8.3.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या दोन्ही द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. त्यानुसार आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे सुनावणीत असे नमुद केले की त्यांनी दि. 28.9.2010 रोजी जन माहिती अधिकारी जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालय गडचिरोली आणि जन माहिती अधिकारी विभागीय कृषी सहसंचालक कार्यालय नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन श्री प्र. अ. शास्त्रकार उपविभागीय कृषी अधिकारी अहेरी यांनी त्यांचे कालावधीत राबविलेल्या सर्व कृषी योजनांच्या तपशिलाच्या खर्चासह माहिती मागितलेली होती. आणि माहितीचा कालावधी दि. 1.4.2010 ते दि. 31.7.2010 असा नमुद केलेला होता. या माहिती मध्ये प्रामुख्याने फळबाग लागवड (जेट्रोफा) चारही तालुक्यातील म्हणजे अहेरी, एटापल्ली, सिरोंचा, भामरागड या तालुक्यात योजनेवर झालेल्या खर्चाचा सविस्तर तपशिल आणि लाभार्थी व्यक्तीनिहाय झालेल्या प्रत्येक व्यक्तीस प्रत्यक्ष लाभ याबाबतची सविस्तर माहिती नर्सरी धारकांच्या नावावर मागितलेली होती. तसेच तालुका बिजगुणन प्रक्षेत्र रंधानपेठ, कृषी चिकित्सालय सिरांचा, रोपवाटीका कसणसूर, कृषी चिकित्सालय कसणसूर तसेच तालुका कृषी अधिकारी एटापल्ली यांनी राबविलेल्या विदर्भ पाणलोट विकास कार्यक्रमा अंतर्गत सविस्तर माहिती मागितलेली होती. मात्र विहित मुदतीत जन माहिती अधिकारी यांचेकडून माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय त्यांना मिळाला नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे. म्हणून जन माहिती अधिकारी यांचेकडून माहिती देण्यास विलंब झालेला असल्यामुळे सदरची माहिती त्यांना विनाविलंब उपलब्ध करुन द्यावी आणि माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे विरुध्द कार्यवाही करावी असे अपीलकर्ता यांनी सुनावणीत आयोगापुढे नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी विभागीय कृषी सहसंचालक कार्यालय नागपूर श्री एस. के. दिक्षीत उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी श्रीमती प्रज्ञा गोळघाटे हया उपस्थित होत्या. तसेच जन माहिती अधिकारी जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालय गडचिरोली तर्फे श्री महल्ले हे उपस्थित होते. आणि प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी गडचिरोली श्री ए. एस. नांदळे हे उपस्थित होते. आणि उपविभागीय कृषी अधिकारी अहेरी डॉ. के. बी. खोत हे देखील उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी विभागीय कृषी सहसंचालक कार्यालय नागपूर यांनी आयोगापुढे सुनावणीत असे नमुद केले की अपीलकर्त्याचा दि. 28.9.2010 चा माहिती

मागण्याचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे पोस्टाने दि. 8.10.2010 ला प्राप्त झाला. तथापी अपीलकर्त्याने मागितलेली माहिती उपविभागीय कृषी अधिकारी अहेरी यांचेशी संबंधित असल्यामुळे त्यांच्या कार्यालयाने दि. 8.10.2010 रोजी सादरचा अर्ज उपविभागीय कृषी अधिकारी अहेरी यांचेकडे माहिती देण्यासाठी पाठविण्यात आला आणि त्याची प्रत अपीलकर्त्यास दिली.

5. उपविभागीय कृषी अधिकारी अहेरी यांनी सुनावणीत असे नमुद केले की अपीलकर्त्याचा सादरचा अर्ज कृषी सहसंचालक कार्यालय नागपूर यांचे कार्यालयाकडून दि. 22.10.2010 रोजी प्राप्त झाला. तथापी अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही मोठया प्रमाणात होती. त्यामध्ये एकूण 4 तालुक्याची माहिती तसेच एका नर्सरीची माहिती एक बिजगुणन केंद्राची माहिती 2 कृषी चिकित्सालयाची माहिती अशा प्रकारे एकूण 8 घटकांची माहिती होती. म्हणून सदरची माहिती संबंधीत कार्यालयातून मागविण्यात आलेली असून ती प्राप्त झाल्यानंतर पुरविण्यात येईल असे अपीलकर्त्यास दि. 25.10.2010 च्या पत्राने उपविभागीय कृषी अधिकारी अहेरी यांनी साध्या पोस्टाने कळविले. मात्र सदरचे पत्र अपीलकर्त्यास मिळालेले नाही असे अपीलकर्त्याने सुनावणीत आयोगासमोर सांगितले. त्यानंतर उपविभागीय कृषी अधिकारी अहेरी यांनी दि. 24.11.2010 रोजी अपीलकर्त्यास साध्या पोस्टाने पत्र पाठवून असे कळविले की आपण मागितलेल्या माहितीचे स्वरुप व प्रमाण जास्त असल्याने आपण या कार्यालयास माहिती पाहून शहानिशा करावी त्यानंतर आपणास आवश्यक असलेल्या माहितीचे झेरॉक्स प्रती बाबतची रक्कम चालानद्वारे भरणा करुन झेरॉक्स प्रती प्राप्त होवू शकतील. मात्र सदरचे पत्र देखील अपीलकर्त्यास प्राप्त झाले नाही असे अपीलकर्त्याने सुनावणीत सांगितले.

6. त्यानंतर अपीलकर्त्याने कृषी सहसंचालक नागपूर यांचे कार्यालयाकडे आणि जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी गडचिरोली यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. मात्र सदरचे प्रथम अपील हे उपविभागीय कृषी अधिकारी अहेरी यांचेशी संबंधित असल्यामुळे प्रथम अपीलाचा अर्ज दि. 25.11.2010 च्या पत्राने त्यांच्याकडे पाठविण्यात आला असे विभागीय कृषी सहसंचालक कार्यालयातील श्रीमती प्रज्ञा गोळघाटे प्रथम अपीलीय अधिकारी आणि जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी गडचिरोली यांनी सुनावणीत सांगितले. सादरचा प्रथम अपीलाचा अर्ज उपविभागीय कृषी अधिकारी अहेरी यांचे कार्यालयाकडे दि. 2.12.2010 रोजी प्राप्त झाला. मात्र प्रथम अपीलाची सुनावणी न घेता उपविभागीय कृषी अधिकारी अहेरी यांनी अपीलकर्त्यास दि. 9.12.2010 रोजी माहितीची फी आणि टपाल खचे असे एकूण रु. 23,274/— भरण्याबाबतचे पत्र साध्या पोस्टाने पाठविले. मात्र माहितीची फी भरण्याबाबतचे पत्र अपीलकर्त्यास प्राप्त झाले नाही असे अपीलकर्ता यांनी सुनावणीत नमुद केले. अपीलकर्त्यास माहितीची फी भरण्याबाबतचे दि. 9.12.2010 चे पत्र पोस्टाद्वारे पाठविल्याबाबतचा यु.पी.एस.चा किंवा रजिस्टर पोस्टाचा कोणताही पुरावा उपविभागीय कृषी अधिकारी अहेरी यांनी आयोगापुढे सादर केला नाही तसेच प्रथम अपीलाचा निर्णय देखील नियमाप्रमाणे योग्य त—हेने दिलेला दिसून येत नाही.

7. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की उपविभागीय कृषी अधिकारी अहेरी यांनी अपीलकर्त्यास दि. 9.12.2010 च्या पत्राद्वारे माहितीची फी भरण्याबाबतचे पत्र पाठविले आहे मात्र ते पत्र अपीलकर्त्यास यु.पी.एस.ने किंवा रजिस्टर पोस्टाने पाठविल्याबाबत कोणताही पुरावा आयोगा समोर सादर केलेला नाही तसेच जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास 30 दिवसाचे मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. तथापी सदरची माहिती ही मोठया प्रमाणात असल्यामुळे ती संकलीत करण्यास विलंब झालेला दिसून येतो. म्हणून अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देण्यास विलंब झालेला असल्यामुळे आता विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय कृषी अधिकारी अहेरी यांनी अपीलकर्ता यांना त्यांच्याकडील दि. 28.9.2010 च्या माहिती अर्जतील माहिती विनामुल्य व्यक्तीशः किंवा रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1501-1504

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1710 नाग/2010**

श्री ॲड. प्रशांत तुकारामजी रोकडे
मु. पो. फुलचुर(आबाटोली)
ता. जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एस. एस. मोटघरे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार
तहसिल कार्यालय गोंदिया
ता. जि. गोंदिया
2) श्री बी. डी. तेळे
जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार
तहसिल कार्यालय गोंदिया
ता. जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 8.3.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 18.12.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 19.1.2011 रोजी नोटीस काढून दि. 8.3.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे विलंबाने हजर झाले. त्यांनी आयोगासमोर सुनावणीत असे नमुद केले की त्यांनी दि. 5.4.2010 रोजी जन माहिती अधिकारी तहसिलदार कार्यालय अकृषीक आकारणी विभाग गोंदिया यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन श्री तुकारामजी व किसनजी रोकडे यांचे नावे मौजा फुलचुर ग. नं. 385 येथे जमीन असून त्यावर त्यांनी सन 1989–90 ला घर बांधले त्यासाठी दि. 10.11.93 ला अकृषीक आकारणी दंड रु. 695/– भरले व त्याला अनुसरुन त्यांनी अपर तहसिलदार अकृषीक आकारणी गोंदिया यांना सदरची जागा अकृषीकरणास मंजुरी देण्याबाबत दि. 28.1.1994 ला आवश्यक त्या दस्तऐवजासोबत अर्ज दिला परंतू अर्जावर तहसिलदार अकृषीक आकारणी गोंदिया यांनी कोणता आदेश पारीत केला त्याची प्रत त्यांनी मागितलेली आहे. मात्र जन माहिती अधिकारी यांचेकडून त्यांना विहित मुदतीत

माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील तहसिलदार गोंदिया यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि. 2.8.2010 रोजी देण्यात आला आणि त्या निर्णयात प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे नमुद केले की सहाय्यक माहिती अधिकारा आणि जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याने मागणी केलेल्या माहितीचा कसून शोध घ्यावा व अपीलकर्त्यास विनामुल्य माहिती 10 दिवसात द्यावी असा प्रथम अपीलाचा निर्णय झाल्यानंतर देखील त्यांना कोणतीही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आणि जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द कार्यवाही करावी आणि त्यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी असे अपीलकर्ता यांनी सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस विद्यमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार श्री बी. डी. तेळे हे उपस्थित होते. तसेच विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार गोंदिया श्री एस. एस. मोटघरे हे उपस्थित होते.

4. विद्यमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार श्री बी. डी. तेळे यांनी आयोगापुढे सुनावणीत असे नमुद केले की अपीलकर्त्याचा दि. 5.4.2010 चा माहितीचा अर्ज तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री एन.टी.काळे यांचेकडे प्राप्त झाला होता. तथापी सदरची माहिती अकृषीक शाखेशी संबंधीत असल्यामुळे त्यांनी माहितीचा अर्ज सहाय्यक माहिती अधिकारी श्री एस.बी.रघुवंशी अव्वल कारकून यांचेकडे पाठविला होता. कारण अकृषीक शाखेचे कामाकाज अव्वल कारकून श्री एस.बी.रघुवंशी हे पाहात आहेत. तथापी श्री एस.बी.रघुवंशी यांचेकडून माहिती प्राप्त झाली नसल्याने अपीलकर्त्यास ती माहिती देता आली नाही असे कागदपत्रावरुन दिसून येते. तसेच त्यानंतर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि. 2.8.2010 रोजी निर्णय दिल्यानंतर देखील तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री राहांगडाले यांनी संबंधीत सहाय्यक माहिती अधिकारी श्री एस.बी. रघुवंशी यांना अपीलकर्त्यास माहिती पुरविण्याबाबत दि. 24.8.2010 च्या पत्राने कळविले आहे. परंतू सहाय्यक माहिती अधिकारी श्री एस.बी.रघुवंशी यांनी सदर माहिती उपलब्ध करुन न दिल्याने अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध झाल्याचे दिसून येत नाही असे विद्यमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार श्री बी. डी. तेळे यांनी आयोगासमोर सुनावणीत सांगितले.

5. तसेच आजच्या सुनावणीस प्रथम अपीलीय अधिकारी तथा विद्यमान तहसिलदार गोंदिया श्री एस. एस. मोटघरे हे उपस्थित होते. त्यांनी आयोगापुढे असे नमुद केले की तत्कालीन तहसिलदार यांनी प्रथम अपीलाचा निर्णय दि. 2.8.2010 रोजी दिलेला असून अपीलकर्त्यास 10 दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश दिलेले होते. तथापी सदरची माहिती सहाय्यक माहिती अधिकारी श्री एस.बी.रघुवंशी यांनी उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही. कारण श्री एस.बी.रघुवंशी हे अव्वल कारकून या पदावर असून त्यांचेकडे अकृषीक आकारणी बाबतचे काम सोपविलेले आहे म्हणून प्रस्तूत प्रकरणी ते जन माहिती अधिकारी यांना सहाय्य करणारे असल्यामुळे ते सहाय्यक माहिती अधिकारी

आहेत. तथापी त्यांचेकडून अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही तथापी आता 15 दिवसात अपीलकर्त्याने मागितेलेल्या माहितीचा शोध घेवून अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल असे विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगा समोर सुनावणीत नमुद केले.

6. अपीलकर्ता तसेच विद्यमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार श्री बी. डी. तेळे व विद्यमान प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार गोंदिया श्री एस. एस. मोटघरे यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्यान मागितलेली माहिती ही अकृषीक आकारणी बाबत आणि अकृषीक आकारणीचे कामाकाज अव्वल कारकून श्री एस.बी.रघुवंशी हे पाहातात. जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देण्याचे कळवूनही त्यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही तसेच प्रथम अपीलाच्या निर्णया नंतरही त्यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही म्हणून माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 5 (5) प्रमाणे श्री एस.बी.रघुवंशी अव्वल कारकून यांना सहा. जन माहिती अधिकारी असे समजण्यात येत असून त्यांनी अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देण्यास विलंब केलेला आहे आणि या विलंबास ते जबाबदार दिसून येतात म्हणून त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20(1) प्रमाणे रु. 10000/- ची शास्ती शास्ती कां लादण्यात येवू नये याबद्यलचा खुलासा त्यांचेकडून मागणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत विद्यमान तहसिलदार गोंदिया आणि विद्यमान जन माहिती अधिकारी गोंदिया यांनी अपीलकर्त्याने मागितेलेल्या माहितीचा शोध घेवून त्यांना विनामुल्य माहिती उपलब्ध करुन द्यावी.

2) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्याच्या विलंबास श्री एस.बी.रघुवंशी अव्वल कारकून हे जबाबदार दिसून येतात म्हणून त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20(1) प्रमाणे रु. 10000/- ची शास्ती कां लादण्यात येवू नये याबद्यलचा खुलासा त्यांनी हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसात आयोगाकडे सादर करावा अन्यथा त्यांचे विरुध्द शास्तीची कार्यवाही कायम करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

3) सदरच्या निर्णयाची एक प्रत विद्यमान तहसिलदार गोंदिया यांनी श्री एस.बी. रघुवंशी अव्वल कारकून यांचेकडे पाठवून त्यांना विलंबा बद्यल आयोगाकडे खुलासा सादर करण्यास कळवावे.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1506-1509

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1721 नाग/2010

श्री पुण्यवर्धन अभिमन गोंडाणे
प्लॉट नं. 164 इंदीरा गांधी नगर
बिनाकी मंगळवारी नागपूर
ता. जि. नागपूर – 17 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री सुरेश गायकवाड
प्रथम अपीलीय अधिकारी तथा सचिव
स्व. हिराबाई गायकवाड शिक्षण संस्था, पोही
द्वारा–महालक्ष्मी अध्यापक विद्यालय
कुंदनलाल गुप्ता नगर नागपूर

2) सौ. रेखा सौलाखे
जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य
महालक्ष्मी अध्यापक विद्यालय
कुंदनलाल गुप्ता नगर नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 10.3.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 25.11.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 19.1.2011 रोजी नोटीस काढून दि. 10.3.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे सुनावणीत असे सांगितले की त्यांनी दि. 1.10.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य महालक्ष्मी अध्यापक विद्यालय नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन कु. विद्या काशीराम मेश्राम हया त्यांच्या अध्यापक विद्यालयात शिक्षीका असल्यामुळे त्यांच्या नियुक्ती विषयक माहिती व त्यांना मिळणारे वेतन याबाबतची

माहिती मागितलेली होती. तथापी जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य यांनी त्यांना दि. 11.10.2010 रोजी पत्र पाठवून असे उत्तर दिले की सदरची माहिती संस्थेकडे आहे. प्रायार्यांकडे ती माहिती नाही म्हणून संस्थेकडून ती माहिती प्राप्त करुन घ्यावी. अपीलकर्ता यांना माहिती प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील सचिव स्व. हिराबाई गायकवाड शिक्षण संस्था, पोही जिल्हा नागपूर यांचेकडे दाखल केले. तथापी प्रथम अपीलाचा निर्णय प्राप्त झाला नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे आजच्या आयोगाकडे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा प्राचार्या सौ. रेखा सौलाखे आणि प्रथम अपीलीय अधिकारी तथा सचिव स्व. हिराबाई गायकवाड शिक्षण संस्था, पोही श्री सुरेश गायकवाड हे उपस्थित होते. त्यांनी आयोगापुढे सुनावणीत असे नमुद केले की स्व. हिराबाई गायकवाड शिक्षण संस्था, पोही जिल्हा नागपूर द्वारा–महालक्ष्मी (डी.एड) अध्यापक विद्यालय हे विना अनुदान तत्वावर मंजूर झालेले विद्यालय आहे या विद्यालयास शासनाचे कोणत्याही प्रकारचे अनुदान मिळत नाही म्हणून या विद्यालयास माहितीचा अधिकार कायदा हा लागू होत नाही त्यामुळे अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिली नाही. तसेच अपीलकर्त्याने कु. विद्या काशीराम मेश्राम यांच्या बाबत माहिती मागितलेली आहे. त्या या अद्यापक विद्यालयात 1 वर्षा करीता तात्पूरत्या स्वरुपात दि. 1.10.2010 पासून कार्यरत होत्या. तथापी त्यांनी स्वच्छेने प्राध्यापक पदाचा राजीनामा संस्थेकडे दिला होता. त्यानुसार शाळा समिती ठराव दि. 31.8.2010 च्या ठराव क्र. 3 प्रमाणे त्यांचा राजीनामा मंजूर करण्यात आलेला असून त्या आता या विद्यालयाच्या सेवेत नाहीत आणि याबाबतची माहिती अपीलकर्त्याने घेण्यासाठी त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहावे म्हणून शिपाया मार्फत त्यांना निरोप पाठवूनही अपीलकर्ता हे माहिती घेण्यास आले नाहीत. तथापी आयोगा समोर जन माहिती अधिकारी यांनी कु. विद्या काशीराम मेश्राम यांचा राजीनामा मंजूर केल्याचे दि. 4.9.2010 च्या पत्राची प्रत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिली ती प्रत अपीलकर्त्याने आयोगा समोर स्वीकारली.

4. अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की सदरच्या अद्यापक विद्यालयास शासनाचे कोणत्याही प्रकारचे अनुदान उपलब्ध होत नाही त्यामुळे मा. उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ नागपूर यांचेकडील याचिका क्र. 5132/2008 नुसार विना अनुदानीत शाळांना माहितीचा अधिकार कायदा हा लागू होत नाही असा निर्णय मा. उच्च न्यायालयाचा आहे. तथापी अपीलकर्त्यास कु. विद्या काशीराम मेश्राम यांच्या प्राध्यापक पदाचा राजीनामा मंजूरीच्या दि. 4.9.2010 च्या पत्राची प्रत आयोगा समोर जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिली असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1511-1513

जा.क्र.—————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 7 नाग/2011**

श्री घनश्याम जयनारायण ब्रजपुरिया
गुजरी बाजार, कामठी
ता. कामठी जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी
श्री शिवगृह निर्माण सह.संस्था, रनाळा, जुनी कामठी
ता. पारशिवनी जि. नागपूर
2) जन माहिती अधिकारी तथा अध्यक्ष
श्री शिवगृह निर्माण सह.संस्था, रनाळा, जुनी कामठी
ता. पारशिवनी जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 10.3.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 27.12.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 7.2.2011 रोजी नोटीस काढून दि. 10.3.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी गैरहजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे म्हणणे एकून घेता आले नाही. तथापी अपीलकर्ता यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या अपील अर्जावरुन असे दिसून येते की अपीलकर्ता यांनी दिनांक 21.9.2010 रोजी माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन जन माहिती अधिकारी श्री शिवगृह निर्माण सह.संस्था, रनाळा, जुनी कामठी ता. पारशिवनी यांचेकडे श्री शिवगृह निर्माण सह.संस्था बाबत माहिती मागितलेली दिसून येते. तथापी अपीलकर्ता यांना विहित मुदतीत जन माहिती अधिकारी यांचेकडून माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील श्री शिवगृह निर्माण सह.संस्था, रनाळा यांचेकडे दाखल केलेले दिसते. मात्र त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत दिसून येते.

3. अपीलकर्ता यांनी दाखल केलेल्या द्वितीय अपीलावरुन असे दिसून येते की त्यांनी श्री शिवगृह निर्माण सह.संस्थेबाबत माहिती मागितलेली आहे. ही सहकारी गृह निर्माण संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम 1960 च्या कायद्यान्वये नोंदणी झालेली आहे.

सहकारी कायद्याची अंमलबजावणी जिल्हा उपनिवबंधक सहकारी संस्था, तालुका उपनिवबंधक सहकारी संस्था आणि आणि तालुका सहा. निबंधक सहकारी संस्था हे करीता असतात. त्यामुळे सहकारी गृह निर्माण संस्थेवर वैधानिक नियंत्रण हे हया निबंधकाचे असते म्हणून प्रस्तूत प्रकरणी तालुका सहा. निबंधक सहकारी संस्था पारशिवनी यांच्या कार्यालयाकडे अपीलकर्त्याने या गृह निर्माण संस्थेची माहिती मागण्यासाठी अर्ज करणे संयुक्तीक होईल आणि अपीलकर्त्याने तालुका सहा. निबंधक सहकारी संस्था पारशिवनी यांचेकडे सदर गृह निर्माण संस्थेच्या माहिती बाबत संपर्क केल्यानंतर सहा. निबंधक सहकारी संस्था ता. पारशिवनी यांनी अपीलकर्त्यास सहकार कायद्यातील तरतुदीप्रमाणे या गृह निर्माण सहकारी संस्थे कडून माहिती प्राप्त करुन घेवून अपीलकर्त्यास पुरविणे संयुक्तीक होईल. म्हणून अपीलकर्त्याने तालुका सहा. निबंधक सहकारी संस्था ता. पारशिवनी यांचेशी माहिती प्राप्त करण्यासाठी संपर्क साधणे. संयुक्तीक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.
2) सदरच्या निर्णयाची एक प्रत **तालुका सहा. निबंधक सहकारी संस्था ता. पारशिवनी जिल्हा नागपूर** यांचेकडे स्वतंत्रपणे योग्य कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी.
3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1515-1516

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1719 नाग/2010**

श्री डॉ. ए. सी. शिरसाट
मु. पो. चोपा
ता. गोरेगाव जि. गोंदिया –441801 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसचिव(सेवा–1)
सार्वजनिक आरोग्य विभाग
मंत्रालय मुंबई 32
2) जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव(सेवा–1)
सार्वजनिक आरोग्य विभाग
मंत्रालय मुंबई 32 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 10.3.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 16.12.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 19.1.2011 रोजी नोटीस काढून दि. 10.3.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. मात्र जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव(सेवा–1) सार्वजनिक आरोग्य विभाग मंत्रालय मुंबई आणि प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसचिव(सेवा–1) सार्वजनिक आरोग्य विभाग मंत्रालय मुंबई हे दोन्ही अधिकारी गैरहजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगासमोर सुनावणीत असे सांगितले की त्यांनी जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव(सेवा–1) सार्वजनिक आरोग्य विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडे दि. 12.3.2010 रोजी माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन जिल्हा तांत्रीक सेवा वर्ग 3 (आरोग्य) असुधारीत वेतनश्रेणी 6500–19500 सुधारीत वेतनश्रेणी 8000–13500 यांच्या सेवा ग्राम विकास तथा जलसंधारण विभागाकडून सार्वजनिक आरोग्य विभागाकडे हस्तांतर करण्यास शासनाने आदेश दिलेले आहेत त्या संदर्भात केलेल्या कार्यवाहीची त्यांनी माहिती मागितलेली होती. त्यांना 30 दिवसाच्या आत माहिती प्राप्त झाली नाही मात्र दि. 5.6.2010 च्या पत्राने अवर सचिव यांनी त्यांना मागितलेल्या माहितीचे उत्तर पाठविले आणि सदरचे उत्तर सुमारे 80 दिवस उशीराने पाठविल्याचे अपीलकर्त्याने सुनावणीत

सांगितले. जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराने समाधान झाले नाही म्हणून त्यांनी प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसचिव(सेवा–1) सार्वजनिक आरोग्य विभाग मंत्रालय मुंबई यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली. आणि त्यामध्ये जन माहिती अधिकारी यांनी 2009 च्या जेष्ठता सूचीची प्रत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देण्याचा निर्णय देण्यात आला. प्रथम अपीलाच्या निर्णयानुसार जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव यांनी दि. 3.9.2010 च्या पत्राने जिल्हा तांत्रीक सेवेतील वैद्यकीय अधिका–याची 2009 च्या जेष्ठता सूचीची प्रत उपलब्ध करुन दिली. मात्र सदरची जेष्ठता सूची ही अन्यायकारक असल्याचे अपीलकर्त्याने सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव(सेवा–1) सार्वजनिक आरोग्य विभाग मंत्रालय मुंबई आणि प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसचिव(सेवा–1) सार्वजनिक आरोग्य विभाग मंत्रालय मुंबई हे दोन्ही अधिकारी सुनावणीस गैरहजर राहिले. त्यामुळे त्यांचे कोणतेही म्हणणे एकून घेता आले नाही. परंतू अपीलकर्त्याने दाखल केलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की अपीलकर्त्याच्या दि. 12.3.2010 च्या माहिती अधिकारा खालील अर्जाला अनुसरुन जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव(सेवा–1) सार्वजनिक आरोग्य विभाग मंत्रालय मुंबई यांनी त्यांचेकडील दि. 5.6.2010 च्या पत्राने माहिती दिलेली दिसते तथापी सदरची माहिती 30 दिवसाच्या मुदतीत अपीलकर्त्यास पुरविलेली दिसून येत नाही. सदरची माहिती सुमारे 80 दिवस उशिराने अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिल्याचे दिसते. सदरची माहिती देण्यास विलंब झालेला आहे म्हणून या बाबीस जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव हे जबाबदार दिसून येतात. म्हणून त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 (1) प्रमाणे शास्तीची कार्यवाही करणेस ते पात्र दिसून येतात. तथापी ते आजच्या सुनावणीस गैरहजर असल्यामुळे त्यांचे म्हणणे एकून घेणे आवश्यक आहे.

4. तसेच प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास जेष्ठता सूची उपलब्ध करुन दिलेली आहे. सदरची जेष्ठता सूची ही अन्यायकारक असल्याचा त्यांनी आयोगा समोर आक्षेप घेतला. तथापी माहितीच्या अधिकारामध्ये असलेली माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे त्या जेष्ठता सूचीच्या गुणवत्तेची बाब आयोगाच्या कार्यकक्षेत येत नाही त्यासाठी अपीलकर्त्याने सक्षम अधिका–याकडे दाद मागणे संयुक्तिक होईल.

5. अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी सुमारे 80 दिवस उशिराने माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव(सेवा–1) सार्वजनिक आरोग्य विभाग मंत्रालय मुंबई यांनी अपीलकर्ता यांना वर नमूद केल्याप्रमाणे सुमारे 80 दिवस उशिराने माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसते. त्यामुळे माहिती देण्याच्या विलंबास ते जबाबदार दिसून येतात म्हणून त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 (1) प्रमाणे रु. 5000/– ची शास्ती त्यांचेवर का लादण्यात येवू नये याचा खुलासा त्यांनी आयोगाकडे हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आत सादर करावा. वर नमूद केलयाप्रमाणे खुलासा सादर न केल्यास त्यांचेवर शास्तीची कार्यवाही कायम करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1518-1520

जा.क्र.––––––––– दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1720 नाग/2010**

श्री बाबुलाल मारोती रावते
रा. बागबोडी पो. इंदोरा
ता. मौदा जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री संगीतराव
प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी
रामटेक
ता. रामटेक जि. नागपूर

2) श्री पवार
जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार
तहसिल कार्यालय मौदा
ता. मौदा जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 10.3.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 16.12.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 19.1.2011 रोजी नोटीस काढून दि. 10.3.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर आहेत मात्र उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे प्रस्तूत प्रकरणी त्यांचे कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार श्री पवार हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी रामटेक श्री संगीतराव हे उपस्थित होते. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा माहिती मागण्याचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला. सदरच्या

अर्जात अपीलकर्त्याने मौजा वाघबोडी ता. मौदा येथील शेत सर्व्हे क्र. 61 या शेतीची आराजी कशी वाढली त्या संबंधीचे दस्तऐवज व फेरफाराचे संबंधी इत्यादीची एकूण 1 ते 7 मुद्यांवर मागितलेली माहिती होती. सदरची माहिती ही तलाठी अडेगाव तलाठी सा. क्र. 44 ता. मौदा यांचेशी संबंधीत असल्याल्याने सदरची माहिती जन माहिती अधिकारी यांनी तलाठी यांचेकडून मागविली. अपीलकर्त्याने मागितलेली 1 ते 7 मुद्यांची माहिती ही विस्तृत स्वरुपात असल्याने व फेरफाराचे संबंधी असल्याने संपूर्ण रेकॉर्ड तलाठी यांना शोधावा लागला. सदरची माहिती विस्तृत असल्याने ती माहिती तयार करण्यास बराच वेळ खर्ची झाला त्यानंतर तलाठी यांनी संपूर्ण माहिती संकलीत करुन ती माहिती जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालयाकडे दि. 18.11.2010 रोजी प्राप्त झाली. त्यानंतर अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात बोलावून दि. 22.11.2010 रोजी संपूर्ण माहिती अपीलकर्त्यास विनामुल्य उपलब्ध करुन दिली असे जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीत नमुद केले. तसेच अपीलकर्त्यास दि. 22.11.2010 रोजी संपूर्ण माहिती मिळाल्याची पोच त्यांनी आयोगा समोर सादर केली.

4. आजच्या सुनावणीस प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी रामटेक श्री संगीतराव हे उपस्थित होते. त्यांनी आयोगापुढे असे नमुद की अपीलकर्त्याचे प्रथम अपील त्यांचेकडे दाखल झाले प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली त्यावेळेला अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. अपीलकर्त्याने मागितलेली 1 ते 7 मुद्यांची माहितीची व्याप्ती ही मोठी होती. सदरची माहिती तलाठी यांचे अभिलेख तपासून विनामुल्य उपलब्ध करुन देण्याचे आदेश जन माहिती अधिकारी यांना प्रथम अपीलाच्या निर्णयात दिलेले होते. त्यानुसार जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 22.11.2010 रोजी संपूर्ण माहिती विनामुल्य उपलब्ध करुन दिली असल्याचे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले.

5. जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की जन माहिती अधिकारी यांचेकडून अपीलकर्त्यास दि. 22.11.2010 रोजी विनामुल्य माहिती उपलब्ध करुन दिल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

# आ दे श

1) अपीलकर्ता यांना विनामुल्य माहिती उपलब्ध करुन दिल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1522-1524

जा.क्र.––––––––– दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1725 नाग/2010**

श्री संजय कचरुजी वासनिक
सिध्दार्थ नगर, टेका, नागपूर
ता. जि. नागपूर – 440017 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री गिरीष जोशी
प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य अधिकारी
नागपूर गृह निर्माण व क्षेत्रविकास मंडळ नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री टी. पी. राठोड
जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक
नागपूर गृह निर्माण व क्षेत्रविकास मंडळ नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 11.3.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 5.12.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 19.1.2011 रोजी नोटीस काढून दि. 11.3.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर आहेत मात्र उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे प्रस्तूत प्रकरणी त्यांचे कोणतेही म्हणणे ऐकून घेता आले नाही. तथापी त्यांनी आयोगाकडे दाखल केलेल्या द्वितीय अपीलातील कागदपत्रावरुन असे दिसून येते की त्यांनी दि. 6.9.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक नागपूर गृह निर्माण व क्षेत्रविकास मंडळ नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन श्री संजय कचरुजी वासनिक यांनी दि. 27.7.2010 रोजी भू. क्र. 65 वसाहत 263 भूखंड योजना येथील नामांतर (म्यूटेशन) प्रक्रियेला दिलेल्या अर्जावर काय कार्यवाही करण्यात आली याबाबत माहिती मागितलेली दिसून येते.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक नागपूर गृह निर्माण व क्षेत्रविकास मंडळ नागपूर आणि प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्य अधिकारी नागपूर गृह निर्माण व क्षेत्रविकास मंडळ नागपूर हे उपस्थित होते. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा माहिती मागण्याचा

अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झला होता. अपीलकर्त्याला प्रत्यक्षात म्यूटेशनची माहिती पाहिजे होती मात्र म्यूटेशन ऐवजी अपीलकर्त्यास lease hold rights of tenancy करण्यासाठी म्यूटेशनचा अर्ज करावयास पाहिजे होता. परंतू अपीलकर्त्याने transfer of tenancy चा अर्ज केल्यामुळे सदरचा अर्ज म्यूटेशन शाखेकडे न जाता transfer of tenancy शाखेकडे गेला म्हणून अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीचा शोध घेतला असतांना ही बाब लक्षात आली त्यानंतर अपीलकर्त्याने कार्यालयात संपर्क साधला त्यांना वरील माहिती समजावून सांगण्यात आली आणि त्यांचेकडून सुधारीत म्यूटेशनचा अर्ज घेतला आणि त्या अर्जावर कार्यवाही करण्यात आली म्हणून अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात त्याला जन माहिती अधिकारी यांनी दि. 12.10.2010 च्या पत्राने सविस्तर माहिती उपलब्ध करुन दिली आहे.

4. अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी दि. 12.10.2010 च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिल्याचे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाच्या निर्णयात देखील नमुद केलेले आहे.

5. जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्यास दि. 12.10.2010 च्या पत्राने जन माहिती अधिकारी यांनी आवश्यक ती माहिती त्यांच्या माहिती अधिकारा खालील अर्जाला अनुसरुन उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1526-1527

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1728 नाग/2010

श्री हेमराज दादुजी चंद्रकापुरे
बरबसपुरा पो. बटाना
ता. जि. गोंदिया –441601 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री गोगुलवार
प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंड विकास अधिकारी
पंचायत समिती गोंदिया
ता. जि. गोंदिया
2) श्री एल. एस. गोरे
जन माहिती अधिकारी तथा सचिव
ग्रामपंचायत बरबसपुरा पो. बटाना
ता. जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 11.3.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 14.12.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 19.1.2011 रोजी नोटीस काढून दि. 11.3.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे सुनावणीत असे सांगितले की त्यांनी दि. 9.6.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा सचिव ग्रामपंचायत बरबसपुरा पो. बटाना ता. जि. गोंदिया यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन ग्रामपंचायतच्या रस्ते बांधकाम संबंधात 1 ते 5 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून माहिती प्राप्त झाली परंतू दिलेली माहिती अपूर्ण आहे म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या निर्णयानंतरही त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे आजच्या सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा सचिव ग्रामपंचायत बरबसपुरा तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंड विकास अधिकारी पंचायत समिती गोंदिया श्री गोगुलवार हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी तथा सचिव ग्रामपंचायत बरबसपुरा यांनी आयोगापुढे सुनावणीत असे सांगितले की अपीलकर्त्याचा माहिती मागण्याचा दि. 9.6.2010 चा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही ग्रामपंचायतच्या रस्त्याबाबत 1 ते 5 मुद्यांवर मागितलेली होती. सदरची माहिती काढण्यात आली आणि अपीलकर्त्यास दि. 9.7.2010 च्या पत्राद्वारे 1 ते 5 मुद्यांची मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने सुनावणीत नमुद केले. मात्र ज्या रस्त्यावर मुरुम टाकलेला आहे तो मुरुम प्लॉट नं. 18 वर अतिक्रमण करुन टाकलेला आहे. तसेच त्या रस्त्यावर मुरुम टाकण्याचा ठराव असतांना प्रत्यक्ष त्या रस्त्यावर मलमा टाकलेला आहे असे अपीलकर्त्याने सुनावणीत सांगितले. मात्र याबाबत जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की ज्या रस्त्यावर मुरुम टाकलेला आहे त्या ठिकाणी अंगणवाडीच्या मुलांना जाता यावे यासाठी तो टाकलेला आहे. तसेच ग्रामपंचायतने मुरुम टाकतांना कोणतेही अतिक्रमण केलेले नाही असेही सचिवांनी सुनावणीत नमुद केले. त्याचप्रमाणे अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की ग्रामपंचायतने ज्या जागेवर मुरुम टाकलेला आहे त्या जागेचा शासकीय प्रकार कोणता आहे याची त्यांना माहिती मिळालेली नाही असे आयोगा समोर नमुद केले. यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की सदर जागेचा शासकीय प्रकार कोणता आहे याबाबतची अधिकृत माहिती महसूल विभागाच्या अखत्यारीत येते म्हणून अपीलकर्त्याने ती माहिती महसूल विभागाकडून प्राप्त करुन घ्यावी असे अपीलकर्त्यास कळविल्याचे सुनावणीत नमुद केले.

5. प्रथम अपीलीय अधिकारी तथा खंड विकास अधिकारी पंचायत समिती गोंदिया श्री गोगुलवार यांनी आयोगापुढे सुनावणीत असे सांगितले की अपीलकर्त्याचे प्रथम अपील त्यांचेकडे दाखल झाले होते प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली. आणि सुनावणी नंतर अपीलाचा निर्णय दि. 24.9.2010 रोजी देण्यात आला. आणि त्या प्रथम अपीलाच्या निर्णयाला अनुसरुन ग्रामसेवक यांनी अपीलकर्त्यास त्यांचेकडे उपलब्ध असलेली माहिती उपलब्ध करुन दिल्याचे आयोगापुढे सुनावणीत नमुद केले.

6. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्ता यांना जन माहिती अधिकारी तथा सचिव यांनी दि. 9.7.2010 च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तथापी अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की ग्रामपंचायतने अतिक्रमण करुन प्लॉट नं. 18 वर मुरुम टाकलेला आहे आणि त्याबाबतचा वाद कोर्टात सुरु आहे असे अपीलकर्त्याने सुनावणीत नमुद केले. तथापी अतिक्रमणाची बाब आयोगाच्या कार्यकक्षेत येत नाही त्यासाठी अपीलकर्त्याने सक्षम प्राधिका–याकडे दाद मागणे संयुक्तिक होईल. अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी दि. 9.7.2010 च्या पत्राद्वारे त्यांचेकडे उपलब्ध असलेली माहिती उपलब्ध करुन दिल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1529-1531

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1760 नाग/2010 व अपील क्रमांक 1761 नाग/2010

श्री दिलीप गजाननराव खेडीकर
नयापुरा राम मंदिर जवळ, प्रम नगर वार्ड क्र.34 नागपूर
ता. जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री व्ही. एस. जोहरी
प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता(लोककर्म विभाग)
महानगर पालिका नागपूर
सिव्हील लाईन्स, नागपूर
2) श्री राहाटे
जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता
सतरंजीपुरा झोन क्र.7, महानगर पालिका नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 21.3.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 15.12.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा धिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये अपील क्रमांक 1760 नाग/2010 व अपील क्रमांक 1761 नाग/2010 अशी दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 1.2.2011 रोजी नोटीस काढून दि. 21.3.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. तसेच अपील क्रमांक 1760 नाग/2010 व अपील क्रमांक 1761 नाग/2010 हया दोन्ही अपीलात अपीलकर्ता व उत्तरवादी हे एकच असल्यामुळे दोन्ही अपीलांची एकत्रीत सुनावणी आयोगासमोर आज घेण्यात आली.

3. **<u>अपील क्रमांक 1760 नाग/2010</u>**

आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे आयोगापुढे स्वतः हजर होते. त्यांनी सुनावणीत असे सांगितले की त्यांनी दि. 19.7.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता सतरंजीपुरा झोन क्र.7, महानगर पालिका नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन वार्ड क्र.34 प्रेमनगर संदर्भात वार्डाचे विकासाची व रोड रुंदीकरणाच्या विकासाबाबतची 1 ते 14 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून दि. 13.8.2010 च्या पत्राने 1 ते 14

मुद्यांची माहिती प्राप्त झाली. मात्र सदरची माहिती अपूर्ण असल्यामुळे दि. 17.9.2010 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपील हे निकाली काढले म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले. तसेच जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण माहिती दिल्यामुळे त्यांचेविरुध्द कार्यवाही करावी असे देखील अपीलकर्त्याने आयोगापुढे सांगितले.

4. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता श्री राहाटे हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता श्री जोहरी हे सुनावणीस उपस्थित होते. त्यांनी आजच्या सुनावणीत आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा माहिती मागण्याचा अर्ज दि. 19.7.2010 रोजी त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. त्याला अनुसरुन 30 दिवसाच्या आत म्हणजे दि. 13.8.2010 च्या पत्राने अपीलकर्त्यास 1 ते 14 मुद्यांची मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे त्यांनी सुनावणीत नमुद केले. मात्र काही मुद्यांची माहिती ही उपलब्ध नाही असे उत्तर दिलेले आहे असे अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की ज्या मुद्यांची माहिती त्यांचेकडे उपलब्ध नाही त्याबाबत अपीलकर्त्यास तसे कळविलेले आहे. तथापी ज्या मुद्यांची माहिती उपलब्ध नाही असे जन माहिती अधिकारी यांनी कळविलेले आहे त्याबाबत ती माहिती उपलब्ध नसल्याबाबतची वस्तुस्थिती अपीलकर्त्यास कळविणे योग्य होईल. आणि ज्या मुद्यांची माहिती उपलब्ध नाही असे कळविलेले आहे त्याबाबतचा वस्तुस्थितीदर्शक खुलासा अपीलकर्त्यास देण्याबाबत जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगासमोर मान्य केले. म्हणून अपीलकर्त्यास दि. 13.8.2010 च्या पत्राने जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. तथापी ज्या मुद्यांची माहिती उपलब्ध नाही त्याबाबतची वस्तुस्थिती अपीलकर्त्यास कळविणे योग्य होईल.

5. <u>अपील क्रमांक 1761 नाग/2010</u>

अपीलकर्ता यांनी आयोगापुढे स्वतः हजर राहून या अपीलाबाबत असे सांगितले की त्यांनी दि. 6.8.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता सतरंजीपुरा झोन क्र.7, महानगर पालिका नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन सन 2007 ते 2008, सन 2008 ते 2009 आणि सन 2009 ते 2010 या 3 वर्षात वार्ड क्र.34 मध्ये केलेली विकास कामे, डांबरीकरण, गडर पाईप लाईन टाकणे, वाटर लाईन टाकणे इत्यादी बाबतची 3 वर्षाची सविस्तर माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दि. 2.9.2010 च्या पत्राने असे कळविले की आपण मागितलेली माहिती एकूण 3 वर्षाची असून विस्तृत प्रमाणात असल्याने ती संकलीत करण्याचे काम सुरु आहे. ती माहिती संकलीत झाल्यानंतर आपणास कळविण्यात येईल असे जन माहिती अधिकारी यांनी त्यांना कळविले. त्यानंतर त्यांनी प्रथम अपील कार्यकारी अभियंता(लोककर्म विभाग) महानगर पालिका नागपूर यांचेकडे

दाखल केले. प्रथम अपीलाच्या निर्णयानुसार दि. 25.11.2010 पर्यंत अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश होते. त्याप्रमाणे त्यांना माहिती उपलब्ध झाली परंतू अपूर्ण माहिती मिळाली. जी माहिती मिळाली त्या माहिती मध्ये विद्युत विभागाची माहिती अद्यापही त्यांना प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

6. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता श्री राहाटे हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता श्री जोहरी हे सुनावणीस उपस्थित होते. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 6.8.2010 अर्ज त्यांचेकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने सन 2007 ते 2008, सन 2008 ते 2009 आणि सन 2009 ते 2010 या 3 वर्षात वार्ड क्र.34 प्रेम नगर मधील विविध विकास कामाची विस्तृत स्वरुपात माहिती मागितलेली होती. माहितीची व्याप्ती ही मोठया प्रमाणात होती. त्याचप्रमाणे सदरची माहिती ही महानगर पालिकेच्या लोककर्म विभाग, जलप्रदाय विभाग, उद्यान विभाग, विद्युत विभाग इत्यादी विभागाशी संबंधीत असल्यामुळे सदरची माहिती संकलीत करण्यासाठी या सर्व विभागांना जन माहिती अधिकारी यांनी पत्र पाठवून माहिती तयार करण्याचे सांगितलेले होते. सदरची माहिती विस्तृत प्रमाणात असल्याने ती संकलीत करुन द्यावयाची असल्यामुळे सदरची माहिती उपलब्ध करुन देण्यास वेळ लागेल असे उत्तर अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी दि. 2.9.2010 च्या पत्राने कळविलेले होते. त्याप्रमाणे महानगर पालिकेच्या सर्व विभागांनी अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीचे संकलन करण्याचे काम सुरु केले होते. दरम्यानच्या काळात अपीलकर्त्याने कार्यकारी अभियंता यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि. 27.10.2010 रोजी देण्यात आला. आणि अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी सर्व विभागां कडील माहिती संकलीत करुन दि. 25.11.2010पर्यंत विनामुल्य उपलब्ध करुन देण्याचे आदेश दिले होते. त्यानुसार अपीलकर्त्यास सर्व विभागांची माहिती संकलीत करुन दि. 24.11.2010 च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने सुनावणीत नमुद केले. मात्र अद्यापही त्यांना विद्युत विभागाची माहिती प्राप्त झाली नाही तसेच केलेल्या कामाच्या बिलाच्या प्रति आणि नगरसेवकांच्या स्वेच्छा निधी संदर्भात केलेल्या कामाबाबतची वस्तूस्थितीची माहिती त्यांना मिळाली नाही असे अपीलकर्त्याने सांगितले. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की विद्युत विभागाची माहिती अद्यापही संकलीत करण्याचे काम सुरु आहे. त्यांचेकडून लवकरच माहिती प्राप्त करुन अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देण्यात येईल कारण अपीलकर्त्याने मागितलेली माहिती ही 3 वर्षाची असल्याने व तीची व्याप्ती मोठी असल्याने विद्युत विभागा कडील माहिती संकलीत करणे सुरु आहे. म्हणून प्रस्तूत प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 24.11.2010 च्या पत्राने इतर विभागाची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तथापी विद्युत विभागाची माहिती

तसेच बिलांच्या प्रति आणि स्वेच्छा निधीची माहिती अपीलकर्त्यास 30 दिवसात उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल.

7. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर खीललप्रमाणे दोन्ही अपीले अंशतः मंजुर करण्यात येत आहेत.

## आ दे श

1) **अपील कमांक 1760 नाग/2010** मध्ये अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास ज्या मुद्यांची माहिती उपलब्ध झाली नाही असे कळविलेले आहे त्या मुद्यांबाबत वस्तुस्थितीदर्शक माहिती हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत व्यक्तीशः किंवा रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

2) **अपील कमांक 1761 नाग/2010** मध्ये अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 30 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना केलेल्या कामाच्या बिलाच्या प्रती विनामुल्य उपलब्ध करुन द्याव्या. तसेच नगर सेवकांच्या स्वेच्छानिधी संदर्भात केलेल्या कामा बाबत वस्तुस्थितीदर्शक माहिती द्यावी तसेच महानगर पालिकेच्या विद्युत विभागाशी संबंधीत असलेली माहिती देखील अपीलकर्ता यांना विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी. वर नमुद केल्याप्रमाणे सर्व माहिती विनामुल्य व्यक्तीशः किंवा रजिस्टर पोस्टाने अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन द्याव्यात.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1531-1534

जा.क.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 12 नाग/2011

श्री विलास रामचंद्रराव लाडीकर
श्री लाडीकर राममंदीर, लाडीकर ले–आऊट
मानेवाडा रोड नागपूर
ता. जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री राजेश शांताराम कराडे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहा. आयुक्त
हनुमान नगर झोन क्र.3, महानगर पालिका नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्रीमती निलीमा नेरकर
जन माहिती अधिकारी तथा सहा. अधिक्षक
हनुमान नगर झोन क्र.3, महानगर पालिका नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 21.32011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 1.1.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 7.2.2011 रोजी नोटीस काढून दि. 21.3.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 30.8.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा सहा. अधिक्षक हनुमान नगर झोन क्र.3, महानगर पालिका नागपूर यांचकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन त्यांनी मौजा मानेवाडा ख.क्र.85/7–9 प्लॉट क्र. 73, 74 व 71, 72 बाबत श्री बंड यांनी कर विभागात केलेल्या अर्जावर दाखल आक्षेपा सुदर्भात दि. 23.5.2009 व दि. 17.7.2010 रोजी दिलेल्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना अपूर्ण माहिती उपलब्ध झाली म्हणून त्यांनी प्रथम अपील सहा. आयुक्त हनुमान नगर झोन क्र.3, महानगर पालिका नागपूर यांचेकडे दाखल केले. त्या अपीलाची सुनावणी झाली आणि अपीलाचा निर्णय दि. 1.11.200 रोजी देण्यात येवून त्यामध्ये त्यांना नस्तीमधील कागदपत्रे उपलब्ध करुन देण्याचे आदेश दिले होते. परंतू त्यांना ते कागदपत्र अद्याप मिळाले नाहीत म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अधिक्षक श्रीमती नेरकर आणि प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहा. आयुक्त श्री कराडे हे उपस्थित होते. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा माहिती मागण्याचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे प्राप्त झला होता. त्या अर्जाला अनुसरुन 30 दिवसाचे आत म्हणजे दि. 30.9.2010 च्या पत्राने

आवश्यक ती माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेली आहे. सदरच्या माहितीमध्ये अपीलकर्त्यास त्यांनी मागितलेल्या प्लॉट क्र. 73, 74 व 71, 72 बाबत संपूर्ण वस्तूस्थितीदर्शक माहिती दि. 30.9. 2010 च्या पत्राने अपीलकर्त्यास दिलेली आहे. इतकेच नव्हेतर प्रथम अपीलाच्या सुनावणीच्या वेळी अपीलकर्त्यास त्यांना पाहिजे असलेल्या माहितीची संपूर्ण नस्ती दाखविली. त्या नस्तीच्या डावीकडील पेज क्र. 17 ते 25 आणि नस्तीच्या उजवीकडील पेज क्र. 194 ते 197 आणि पेज क्र. 205 ते 209 याच्या प्रती अपीलकर्त्याने मागितल्या. त्या प्रती देखील अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देण्यासाठी तयार करण्यात आल्या. मात्र अपीलकर्ता सदरची माहिती घेण्यासाठी व्यक्तीशः जन माहिती अधिकारी यांचेकडे हजर झाले नाहीत तथापी आयोगा समोर त्या माहितीच्या प्रती जन माहिती अधिकारी यांनी दाखविल्या. सदरची माहिती अपीलकर्त्याने आयोगा समोर स्वीकृत केली. अपीलकर्त्याने सदरची माहिती विनामुल्य ताब्यात घेतली. म्हणून प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांना आवश्यक ती माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1536-1537

जा.क्र.––––––––– दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1762 नाग/2010**

श्री विवेक छन्नुलाल जौदिया
जवाहर होस्टेल के पिछे, बोरियापुरा, नागपूर
ता. जि. नागपूर – 2 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिष्ठाता,
इंदिरा गांधी महाविद्यालय व रुग्णालय(मेयो) नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री एस. व्ही. मडावी
जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक
इंदिरा गांधी महाविद्यालय व रुग्णालय(मेयो) नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 21.3.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 24.12.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 1.2.2011 रोजी नोटीस काढून दि. 21.3.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 25.11.2010 रोजी जन माहिती अधिकारी इंदिरा गांधी महाविद्यालय व रुग्णालय(मेयो) नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन ते रोजंदारी कर्मचारी असल्यामुळे त्यांना रुग्णालयातील अनेक विभागात काम करण्यासाठी सांगण्यात येते तसेच त्यांना वेळेवर पगार मिळत नाही अशा प्रकारचा तक्रारी स्वरुपातील अर्ज त्यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे केलेला होता. त्यानंतर त्यांना पगार मिळाला नाही आणि त्यांच्या कामामध्ये अनेक वेळा बदल करण्यात येत असतो असे त्यांनी आयोगापुढे नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी इंदिरा गांधी महाविद्यालय व रुग्णालय(मेयो) नागपूर श्री मडावी हे उपस्थित होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 25.11.2010 च्या माहिती अधिकारा खालील अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दि. 30.11.2010 रोजी प्राप्त झाला होता. अर्जात अपीलकर्त्याने कोणत्याही प्रकारची माहिती मागितलेली नव्हती तथापी त्यांना दिलेल्या कामाबाबत त्यांची तक्रार

आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या असेही निदर्शनास आणून दिले की अपीलकर्ता हे मेयो रुग्णालयात रोजंदारी कर्मचारी आहेत त्यामुळे आवश्यकते प्रमाणे रुग्णालयाच्या ज्या विभागात काम असते त्या विभागात त्यांना काम देण्यात येते. त्यामध्ये कधी वस्तीगृहातील काम, वार्डातील काम, अपघात विभागातील काम, आय सी यू मधील काम, ओ. टी. विभागामध्ये काम इत्यादी विभागात त्यांना आवश्यकते प्रमाणे ते रोजंदारी कर्मचारी असल्यामुळे त्यांना काम देण्यात येते. तथापी अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की त्यांना अनेक विभागात काम न देता एकाच विभागात काम देण्यात यावे व त्यांना पगार देखील नियमित देण्यात यावे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या असेही निदर्शनास आणून दिले की अपीलकर्ता हे रोजंदारी कर्मचारी असल्यामुळे ज्या ज्या विभागात त्यांनी काम केलेले आहे त्या त्या विभागाचे उपस्थिती बाबतचा दाखला असल्याशिवाय त्यांचा पगार काढता येत नाही आणि अपीलकर्ता हे रोजंदारी कर्मचारी असल्यामुळे त्यांना आवश्यकते प्रमाणे निरनिराळया विभागात काम देण्यात येते.

4. अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्ता हे रोजंदारी कर्मचारी आहेत आणि त्यांची कामाबाबत व पगार न मिळण्याबाबत तक्रार आहे. तथापी सदरची बाब ही आयोगाच्या कार्यकक्षेत येत नाही म्हणून अपीलकर्त्याने योग्य त्या सक्षम अधिका–याकडे दाद मागणे योग्य होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1535-1536

जा.क्र.––––––––– दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1763 नाग/2010**

श्री रामसागर पुंडलीक पिलेवान
83 हिंदुस्थान कॉलोनी, वर्धा रोड, नागपूर
ता. जि. नागपूर – 15 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री मेश्राम
प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी
नगर परिषद पवनी
ता. पवनी जि. भंडारा
2) श्री आनंद बांडेबुचे कनिष्ठ अभियंता
जन माहिती अधिकारी नगर परिषद पवनी
ता. पवनी जि. भंडारा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 21.3.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 24.12.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 1.2.2011 रोजी नोटीस काढून दि. 21.3.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता गैरहजर आहेत मात्र उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे कोणत्याही प्रकारचे म्हणणे एकून घेता आले नाही. तथापी त्यांनी आयोगापूढे दाखल केलेल्या द्वितीय अपीलावरुन असे दिसून येते की त्यांनी दि. 23.4.2010 रोजी जन माहिती अधिकारी नगर परिषद पवनी जि. भंडारा यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन श्रीमती प्रमिलाबाई गजभिये यांच्या मिळकतीवर बांधकामाची मंजूरी कोणत्या नियमान्वये दिली त्याबाबतच्या माहिती प्रकरणी महाराष्ट्र नगर पालीका औद्योगीक वसाहती 1965 चे कलम 45 नुसार मंजूरी देण्यात आलेली आहे. सदर कालावधीची प्रत त्यांनी मागितलेली आहे. तथापी त्यांना अपेक्षेप्रमाणे जन माहिती अधिकारी यांचेकडून माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केल्याचे दिसते. प्रथम अपील फेटाळल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे कागदपत्रावरुन दिसून येते.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता नगर परिषद पवनी श्री आनंद बांडेबुचे हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी नगर परिषद पवनी श्री मेश्राम हे उपस्थित होते. जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीत आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 23.4.2010 चा माहिती मागण्याचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. त्याला अनुसरुन अपीलकर्त्यास श्रीमती प्रमिलाबाई गजभिये यांना ज्या नियमाच्या आधारे बांधकामाची मंजूरी दिली ते कलम 45 व कलम 189 अनुक्रमे महाराष्ट्र प्रादेशिक नगर परिषद अधिनियम 1966 आणि महाराष्ट्र नगर पालीका नगर पंचायती व औद्योगीक वसाहती अधिनियम 1965 या अधिनियमाच्या प्रती अपीलकर्त्यास दि. 5/6.5.2010 च्या पत्राने उपलब्ध करुन देण्याबाबत कळवून त्याची फी रु. 59/- टपाल खर्चासह भरण्याबाबत कळविण्यात आले होते. त्याला अनुसरुन अपीलकर्त्यास सदरचे पत्र दि. 20.5.2010 ला प्राप्त झाले होते. आणि माहितीची फी भरण्याकरीता अपीलकर्ता त्यांचे कार्यालयात दि. 11.6.2010 रोजी आले अपीलकर्त्याने माहितीची फी भरुन त्यांना त्याच दिवशी वर नमूद केलेल्या नियमाच्या प्रती उपलब्ध करुन दिल्या असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले.

4. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचे प्रथम अपील त्यांचेकडे दाखल झाले होते. प्रथम अपीलाची सुनावणी दि. 20.9.2010 रोजी घेण्यात आली. आणि सुनावणी घेवून निर्णय दि. 20.9.2010 रोजी देण्यात आला. त्या निर्णयामध्ये असे नमूद केले की अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे जी माहिती उपलब्ध होती ती मुदतीत पुरविली असून सदरचे प्रकरण हे न्यायालयात सुरु असल्यामुळे त्या प्रकरणात कुठलीही कार्यवाही करणे शक्य नाही असा प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला आहे. जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीच्या वेळी असेही निदर्शनास आणून दिले की प्रस्तूत प्रकरणी श्रीमती प्रमिलाबाई गजभिये यांनी या संबंधात दिवाणी न्यायालयात प्रकरण दाखल केले असून या प्रकरणात न्यायालयाचे स्थगनादेश असल्यामुळे कुठलीही कार्यवाही आता करणे शक्य नाही व न्यायालयाचे जे काही आदेश पारीत होतील त्यानुसार नगर परिषदकडून कार्यवाही करण्यात येईल. म्हणून सद्यस्थितीत अपीलकर्त्याने मागितलेल्या नियमाच्या प्रती त्यांना उपलब्ध करुन दिलेल्या आहेत.

5. जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास माहिती अर्जाला अनुसरुन माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1538-1540

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1764 नाग/2010

श्री रामसागर पुंडलीक पिलेवान
83, हिंदुस्थान कॉलनी वर्धा रोड नागपूर
ता. जि. नागपूर – 15 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री मेश्राम
प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी
नगर परिषद पवनी
ता. पवनी जि. भंडारा
2) श्री आनंद बांडेबुचे कनिष्ठ अभियंता
जन माहिती अधिकारी नगर परिषद पवनी
ता. पवनी जि. भंडारा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 21.3.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 24.12.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 1.2.2011 रोजी नोटीस काढून दि. 21.3.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता गैरहजर आहेत मात्र उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे कोणत्याही प्रकारचे म्हणणे एकून घेता आले नाही. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता नगर परिषद पवनी श्री आनंद बांडेबुचे हे उपस्थित होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्ता यांचा माहिती मागण्याचा अर्ज त्यांचेकडे दि. 29.7.2010 रोजी प्राप्त झाला होता. त्या अर्जाला अनुसरुन अपीलकर्त्यास दि. 21.8.2010 च्या पत्राने आवश्यक ती माहिती पोस्टाने उपलब्ध करुन दिलेली आहे. याबाबत जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे आणखी असे सांगितले की अपीलकर्त्यास नगर परिषदेचे पत्र क्र. नपप/बांधवि/116/10 दि. 21.8.2010 च्या पत्राने माहिती पाठविलेली आहे. त्यांची प्रत अपीलकर्ता यांनी आयोगास दाखविली.

3. आजच्या सुनावणीस प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी नगर परिषद पवनी श्री मेश्राम हे उपस्थित होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचे प्रथम अपील त्यांचे कार्यालयाकडे दि. 7.9.2010 रोजी प्राप्त झाले होते. प्रथम अपीलाची सुनावणी दि. 20.9.2010 रोजी घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपीलकर्ता उपस्थित

होते. त्यावेळी असे दिसून आले की जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती अपीलकर्त्यास पुरविलेली आहे. तथापी अपीलकर्ता यांचे अपील अर्जात म्हणणे असे आहे की श्रीमती दमयंतीबाई तागडे यांचे अतिक्रमण तोडणे आवश्यक आहे. याबाबत जन माहिती अधिकारी आयोगापुढे असे सांगितले की श्रीमती दमयंतीबाई तागडे यांना सिटी सर्व्हे कार्यालयाकडून त्यांच्या जागेची माजणी करण्याबाबत कळविलेले आहे. मोजणी मध्ये सदरील शौचालय अपीलकर्त्याच्या जागेत असल्यास त्या जागेतून शौचालय हटविण्या संबंधात नगर परिषद कार्यवाही प्रस्तावीत करेल.

4. जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या माहिती अर्जाला अनुसरुन दि. 21.8.2010 च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1542-1543

जा.क्र.———————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1765 नाग/2010

श्री लक्ष्मण महादेव तितिरमारे
रा. तामसवाडी(तुडका) पो.खापा(तुमसर)
ता. तुमसर जि. भंडारा -441913 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री नारायण जोशी
प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग)
जिल्हा परिषद भंडारा
ता. जि. भंडारा
2) जन माहिती अधिकारी तथा माध्यमिक शिक्षण विभाग
जिल्हा परिषद भंडारा
ता. जि. भंडारा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 21.3.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 22.12.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 1.2.2011 रोजी नोटीस काढून दि. 21.3.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 28.10.2010 रोजी जन माहिती अधिकारी माध्यमिक शिक्षण विभाग जिल्हा परिषद भंडारा यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली मिडल स्कूल विभागात 25 टक्क्यात नियुक्ती आणि शिक्षण विभागाची मान्यता याबाबत शासन निर्णयाची प्रत मागितलेली होती. तथापी त्यांना जन माहिती अधिकारी यांनी असे कळविले की मिडल स्कूल विभागात 25 टक्के नियुक्ती करीता आवश्यक असलेले जी. आर. इंटरनेट किंवा माध्यमिक शाळा संहीता किंवा शासकीय लेखन मुद्रण भांडार नागपूर यांचेकडे संपर्क साधून जी.आर.प्राप्त करुन घ्यावा. त्यानंतर त्यांनी प्रथम अपील शिक्षणाधिकारी यांचेकडे दाखल केले. मात्र त्यानंतरही त्यांना जी.आर. मिळाला नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक विभाग) जिल्हा परिषद भंडारा श्री नारायण जोशी हे उपस्थित होते. त्यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणून दिले की जन माहिती अधिकारी हे आजारी असल्यामुळे

सुनावणीस येवू शकले नाहीत. तथापी त्यांच्या वतीने त्यांनीच आयोगापुढे बाजू मांडली. शिक्षणाधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्त्याने मागितलेल्या शासन निर्णयाची प्रत इंटरनेट किंवा माध्यमिक शाळा संहीता किंवा शासकीय लेखन मुद्रण भांडार नागपूर यांचेकडे उपलब्ध होवू शकेल असे अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी दि. 28.10.2010 रोजी कळविलेले आहे. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील त्यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाची सुनावणी दि. 29.1.2010 रोजी ठेण्यात आली. मात्र अपीलकर्ता त्या सुनावणीस गैरहजर होते म्हणून त्यांचे म्हणणे एकून घेता आले नाही. तथापी दि. 31.11.2010 च्या पत्राने प्रथम अपीलाचा निर्णय देवून त्यामध्ये जन माहिती अधिकारी यांनी कळविल्यानुसार इंटरनेट किंवा माध्यमिक शाळा संहीता किंवा शासकीय लेखन मुद्रण भांडार नागपूर यांचेकडून शासन निर्णयाची प्रत उपलब्ध करुन घ्याव्यात असे अपीलकर्त्यास कळविलेले आहे.

4. तथापी शिक्षणाधिकारी यांनी अपीलकर्त्यास पाहिजे असलेल्या शासन निर्णयाची दि. 17.1.2010 ची प्रत आयोगापुढे सादर केली. सदरची प्रत अपीलकर्त्याने आयोगा समोर स्विकृत करुन समाधान व्यक्त केले. म्हणून प्रस्तूत प्रकरणी अपीलकर्त्यास आवश्यक असलेली माहिती उपलब्ध झाल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांना आवश्यक असलेली माहिती उपलब्ध झाल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1545-1546

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1766 नाग/2010**

श्री सुनिल दत्तत्रय शास्त्री
जी 4, श्री नारायण अपार्टमेंट, खरे टाऊन
धरमपेठ नागपूर
ता. जि. नागपूर –10 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री प्रकाश व–हाडे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा कर निर्धारक
नागपूर महानगर पालिका
महाल नागपूर

2) श्री मदन सुभेदार
जन माहिती अधिकारी तथा कर अधिक्षक,
कर व कर आकारणी विभाग नागपूर महानगर पालिका
महाल नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 22.3.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 19.12.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 1.2.2011 रोजी नोटीस काढून दि. 22.3.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. मात्र उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे प्रस्तूत प्रकरणी कोणतेही म्हणणे एकून घेता आलेले नाही.

3. तथापी आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा कर अधिक्षक, कर व कर आकारणी विभाग नागपूर महानगर पालिका महाल नागपूर श्री मदन सुभेदार हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा कर निर्धारक नागपूर महानगर पालिका श्री प्रकाश व–हाडे हे देखील उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्ता यांचा दि. 9.7.2010 चा माहिती मागण्याचा अर्ज त्यांच्या कार्यालयाकडे दि. 12.7.2010 रोजी प्राप्त झालेला होता. अपीलकर्त्याने रोजंदारीवर नियुक्त केलेल्या तीन कर्मचा–याबद्यल एकूण 1 ते 8 मुद्यांची माहिती मागितलेली होती. अपीलकर्त्याने मागितलेली माहिती तयार करण्यात आली. सदरची माहिती एकूण 215 पेजेसची होती म्हणून माहितीची फी रु. 430/– भरण्याकरीता अपीलकर्त्यास दि. 31.10.2010 रोजी पत्र पाठविले. त्याला अनुसरुन अपीलकर्त्याने दि. 6.8.2010 रोजी माहितीच्या फी चा भरणा केला. त्यानंतर अपीलकर्त्यास दि. 9.8.2010 च्या पत्राप्रमाणे मुद्या क्र. 5 सोडून एकूण 7 मुद्यांची माहिती देण्यात आली. मात्र मुद्या क्र. 5 ची माहिती प्रमुख लेखा व वित्त अधिकारी यांचेशी संबंधीत असल्यामुळे त्यांचेकडून ती संकलीत करण्यात आली. त्यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे सदरची माहिती दि. 6.8.2010 रोजी प्राप्त झाली. त्यानंतर त्या माहितीच्या फी रु. 10/– भरण्याबाबत अपीलकर्त्यास दि. 12.8.2010 रोजी पत्र पाठविले. त्यानुसार अपीलकर्त्याने दि. 13.8.2010 रोजी रु. 10/– च्या फी चा भरणा केला आणि त्यानंतर अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी दि. 17.8.2010 च्या पत्राने मुद्या क्र. 5 ची माहिती देखील दिली. अपीलकर्त्यास वर नमुद केल्याप्रमाणे त्याने फी चा भरणा केल्यानंतर 30 दिवसाच्या मुदतीत संपूर्ण माहिती अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिल्यानंतरही अपीलकर्त्याने प्रथम अपील कर निर्धारक यांचेकडे दाखल केले. त्या अपीलाची सुनावणी दि. 15.10.2010 रोजी घेण्यात आली त्या सुनावणीत अपीलकर्ता हे हजर होते. अपीलकर्त्याने सुनावणीत प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे असे सांगितले की जन माहिती अधिकारी यांचेकडून त्यांना प्राप्त झालेली आहे. मात्र सदरची माहिती त्यांना प्रमाणित करुन दिलेली नाही. म्हणून त्यांना प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाचा निर्णय देवून त्यामध्ये जन माहिती अधिकारी यांना असे आदेश दिले की अपीलकर्त्यास पुरविलेली माहिती पुन्हा प्रमाणित करुन विनामुल्य द्यावी. प्रथम अपीलाच्या निर्णयाला अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास पुन्हा 1 ते 8 मुद्यांची माहिती प्रमाणित करुन विनामुल्य दि. 4.1.2011 च्या पत्राने उपलब्ध करुन दिली असे प्रथम अपीलीय अधिकारी तथा कर निर्धारक नागपूर महानगर पालिका श्री व–हाडे यांनी आयोगापुढे सांगितले.

5. जन माहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी संपूर्ण माहिती प्रमाणित करुन दिली असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1548-1550

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1770 नाग/2010**

श्री सुरेश रामचंद्र पचारे
ताडोबा रोड दे.गो.तुकुम चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री राजीव घाटोळे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ चंद्रपूर
ताडोबा रोड दे.गो.तुकुम चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर
2) श्री के. डी. पल्लडवार
जन माहिती अधिकारी तथा विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी,
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ चंद्रपूर
ताडोबा रोड दे.गो.तुकुम चंद्रपूर
ता. जि. चंद्रपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 22.3.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 28.12.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 1.2.2011 रोजी नोटीस काढून दि. 22.3.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 28.9.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ चंद्रपूर यांचेकडे त्यांनी माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन वाहक पदाबाबत 1 ते 4 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील विभाग नियंत्रक महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ चंद्रपूर यांचेकडे दाखल केले. मात्र प्रथम अपीलाच्या निर्णयानंतरही त्यांना पाहिजे असलेली माहिती

उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले. तसेच जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अपेक्षित असलेली माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून त्यांचे विरुध्द कार्यवाही करावी अशी मागणी अपीलकर्ता यांनी सुनावणीत केली.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी श्री के. डी. पल्लडवार हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक श्री राजीव घाटोळे हे उपस्थित होते.

4. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 28.9.2010 चा माहिती मागण्याचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झला होता. त्या अर्जात अपीलकर्त्याने वाहक पदाच्या निकाला बाबत 1 ते 4 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. त्याला अनुसरुन अपीलकर्त्यास दि. 11.10.2010 च्या पत्राने 1 ते 4 मुद्यांपैकी मुद्या क्र. 2 उमेदवाराच्या वयोमर्यादे बाबत शासकीय परीपत्रकाची सत्यप्रत उपलब्ध करुन दिलेली असून मुद्या क्र.1 आणि 3 बाबत वाहक पदाची अंतीम निवड अद्याप झालेली नाही म्हणून अंतीम निवड उमेदवाराची माहिती देता येत नाही असे कळविलेले असून मुद्या क्र.4 बाबत वाहक पदाची लेखी परीक्षा खाजगी संस्थे मार्फत घेण्यात आलेली आहे. त्यामुळे सदर परीक्षेच्या प्रश्नपत्रिका त्यांचे कार्यालयात उपलब्ध नसल्याचे कळविण्यात आलेले आहे. कारण अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीच्या वेळी म्हणजे आक्टोबर 2010 मध्ये वाहक पदाच्या भरतीबाबत जी प्रक्रिया झालेली होती त्याला अनुसरुन अपीलकर्त्यास दि. 11.10.2010 च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले.

5. आजच्या सुनावणीस प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक श्री राजीव घाटोळे हे उपस्थित होते. त्यांनी आयोगापुढे सुनावणीत असे नमुद केले की त्यांचेकडे अपीलकर्त्याचे प्रथम अपील दाखल झाले होते. प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली. आणि अपीलकर्त्यास आमंत्रीत केलेल्या उमेदवाराची वयोमर्यादा, खुला प्रवर्ग व इतर मागास वर्ग यांच्या वयोमर्यादे बाबत शासकीय परीपत्रकाची सत्यप्रत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्वरीत पुरविण्याचे आदेश दिले होते. मात्र आता दि. 22.11.2010 रोजी वाहक पदाची अंतीम निवड झालेली आहे.

6. अपीलकर्त्याने सुनावणीत आणखी असेही नमुद केले की वाहक पदाची अंतीम निवड झालेली असल्याने त्यांना माहिती अर्जात मागितलेल्या माहिती प्रमाणे वाहक पदासाठी ज्या उमेदवाराची निवड झालेली आहे त्याची गुणवत्तेसह यादी मिळणे आवश्यक आहे तसेच वाहक पदाची निवड झालेल्या उमेदवाराच्या कागदपत्राच्या सत्यप्रती देखील त्यांना उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे.

7. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की आता वाहक पदाची भरती प्रक्रिया पूर्ण झालेली असल्यामुळे तसेच वाहक पदातील भरती बाबत पारदर्शकता

दिसण्यासाठी तसेच व्यापक जनहिताच्या दृष्टिकोनातून अपीलकर्त्यास वाहक पदासाठी निवड केलेल्या उमेदवाराची यादी गुणवत्तेसह उपलब्ध करुन देणे योग्य होईल. तसेच निवड केलेल्या उमेदवाराच्या अर्जासोबत दाखल केलेल्या कागदपत्राच्या प्रती देखील अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे योग्य होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना वाहक पदासाठी निवड केलेल्या उमेदवाराची यादी त्यांनी प्राप्त केलेल्या गुणवत्तेसह उपलब्ध करुन द्यावी तसेच निवड केलेल्या उमेदवाराच्या अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्राच्या सत्यप्रती योग्य ती फी घेवून उपलब्ध करुन द्याव्यात.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1552-1554

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1769 नाग/200**

कु. मनिषा हिरामण सोनवाने
तिवारी कॉलनी गुरुनानक वार्ड गणेश नगर गोंदिया
ता. जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी,
गोंदिया
ता. जि. गोंदिया
2) श्री अविनाश कोटांगळे तांत्रीक अधिकारी
जन माहिती अधिकारी
जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालय गोंदिया
ता. जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 22.3.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 27.12.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 1.2.2011 रोजी नोटीस काढून दि. 22.3.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ती हया स्वतः हजर होत्या. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 25.10.2010 रोजी जन माहिती अधिकारी जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी कार्यालय गोंदिया यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन सन 2010 मध्ये शिपाई पदावर नियुक्त केलेल्या कर्मचा-यांची नियुक्ती पत्राच्या प्रती तसेच त्याबाबतची जाहीरातीची प्रत आणि जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी गोंदिया यांच्या सेवा पुस्तकातील प्रथम पृष्ठाची प्रत इत्यादी माहिती मागितलेली होती. सदरची माहिती त्यांना दि. 23.2.2011 रोजी मिळाली. तथापी जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी गोंदिया यांच्या सेवा पुस्तकातील प्रथम पृष्ठाची प्रत मिळाली नाही तसेच जी माहिती मिळाली ती माहिती अतिशय विलंबाने म्हणजे सुमारे 4 महिने उशिराने माहिती दिली त्यामुळे विलंबाबद्यल जन माहिती अधिकारी यांच्यावर कार्यवाही करावी तसेच त्यांना 30 दिवसात

माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी गोंदिया यांचेकडे प्रथम अपील दाखल केले होते. मात्र प्रथम अपीलाची सुनावणी झालेली नाही आणि प्रथम अपीलाचा निर्णय देखील दिलेला नाही म्हणून प्रथम अपीलीय अधिकारी यांचे विरुध्द कार्यवाही करावी असे अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा तांत्रीक अधिकारी श्री अविनाश कोटांगळे हे उपस्थित होते. प्रथम अपीलीय अधिकारी तथा जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी गोंदिया हे सुनावणीस गैरहजर होते. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा माहिती मागण्याचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दि. 25.10.2010 रोजी प्राप्त झाला होता. तथापी कार्यबाहुल्यामुळे 30 दिवसाच्या मुदतीत अपीलकर्त्यास त्यांना माहिती उपलब्ध करुन देता आली नाही. त्यानंतर दि. 23.2.2011 च्या पत्राने अपीलकर्त्यास त्यांनी माहिती उपलब्ध करुन दिली. सदरची माहिती अपीलकर्त्यास सुमारे 4 महिने उशिराने उपलब्ध करुन देण्याबाबत त्यांनी आयोगापुढे असा खुलासा केला की कार्यालयातील कामकाजाच्या व्यापामुळे माहिती देण्यास विलंब झालेला आहे. तसेच अपीलकर्त्याने जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी गोंदिया यांच्या सेवा पुस्तकातील प्रथम पृष्ठाची प्रत मागितलेली आहे. तथापी जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी गोंदिया यांचे सेवा पुस्तक विभागीय कृषी सहसंचालक नागपूर यांचेकडे असल्यामुळे यांचेकडून प्रत मागितलेली आहे ती प्रत प्राप्त झाल्यावर अपीलकर्त्यास पुरविण्यात येईल. मात्र बाकी माहिती अपीलकर्त्यास दि. 23.2.2011 च्या पत्राने उपलब्ध करुन दिलेली आहे असे जन माहिती अधिकारी यांनी सांगितले.

4. अपीलकर्त्याने प्रथम अपील जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी गोंदिया यांचेकडे दि. 29.11.2010 रोजी दाखल केले होते. तथापी जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांनी प्रथम अपीलाची सुनावणी घेवून निर्णय दिलेला दिसून येत नाही. म्हणून प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (1) प्रमाणे त्यांच्यावर सोपविलेली जबाबदारी त्यांनी पार पाडलेली नाही. म्हणून त्यांना याबाबत सक्ती ताकीद देण्यात येत आहे. तसेच जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याच्या दि. 25.10.2010 च्या माहिती अर्जाला अनुसरुन 30 दिवसाच्या आत माहिती न देता दि. 23.2.2011 च्या पत्राने म्हणजे सुमारे 4 महिने विलंबाने माहिती दिलेली आहे. विलंबाबद्यल जन माहिती अधिकारी यांना सुनावणीत खुलासा विचारला असता त्यांनी असे सांगितले की कामाच्या व्यापामुळे 30 दिवसात माहिती उपलब्ध करुन देवू शकले नाही. तथापी जन माहिती अधिकारी यांनी विलंबाबद्यल केलेला खुलासा समर्थनीय व योग्य दिसून येत नाही म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

# आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी गोंदिया यांच्या सेवा पुस्तकातील प्रथम पृष्ठाची प्रत विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

2) जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना दि. 25.10.2010 च्या माहिती अर्जाला अनुसरुन दि. 23.2.2011 च्या पत्रान्वये म्हणजे सुमारे 4 महिने विलंबाने माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे ते विलंबास जबाबदार दिसून येतात. म्हणून जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 (2) प्रमाणे शिस्तभंगाच्या कार्यवाहीची शिफारस करण्यात येत आहे.

3) सदरच्या निर्णयाची एक प्रत स्वतंत्रपणे **मा. आयुक्त कृषी महाराष्ट्र राज्य पूणे आणि विभागीय कृषी सहसंचालक नागपूर विभाग नागपूर** यांचेकडे योग्य त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1543-1545

जा.क्र.––––––––– दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1772 नाग/2010**

श्री कृष्णा उपासराव वाठ
684 मरारटोली राम नगर नागपूर
ता. जि. नागपूर –33 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री कैलास कनसे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त
परिमंडळ क्र.1 नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री पी. पी. धरमसींह
जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त
सिताबर्डी विभाग, नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 23.3.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 23.12.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 3.2.2011 रोजी नोटीस काढून दि. 23.3.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त सिताबर्डी विभाग, नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली दि. 22.7.2010, दि. 23.7.2010, दि. 31.7.2010 व दि. 23.6.2010 रोजी अर्ज सादर करुन त्यांनी अर्जदारास दिलेल्या उत्तराच्या पत्रात जे संदर्भ नमूद केलेले आहेत त्या संदर्भाच्या प्रती त्यांनी मागितलेल्या होत्या. त्याला अनुसरुन त्यांना काही प्रती जन माहिती अधिकारी यांचेकडून प्राप्त झाल्या मात्र काही प्रती प्राप्त झाल्या नाहीत. प्रामुख्याने दि. 23.6.2010 च्या अर्जात मागितलेली माहिती त्यांना मिळाली नाही. मात्र आज आयोगा समोर जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अपेक्षित असलेली माहिती विनामुल्या उपलब्ध करुन दिल्याचे नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त सिताबर्डी विभाग, नागपूर श्री पी. पी. धरमसींह हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय

अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त परिमंडळ क्र.1 नागपूर श्री कैलास कनसे हे उपस्थित होते. यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणून दिले की अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे यापूर्वी देखील सुमारे 2000 च्या वर त्यांचे माहितीचे अर्ज आलेले आहेत. त्या अर्जावर नियमाप्रमाणे यापूर्वी देखील त्यांना उत्तर दिलेले आहेत. तसेच त्यांच्या अर्जा बाबतच्या कार्यवाहीची माहिती त्यांना वेळोवेळी दिलेली आहे. तथापी आज पुन्हा आयोगा समोर वर नमूद केल्याप्रमाणे त्यांना सर्व माहिती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात आली. सदरची माहिती अपीलकर्त्याने आयोगा समोर स्वीकृत करुन माहिती मिळाल्याबद्यल समाधान व्यक्त केले.

4. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्यास माहिती अधिकारा खालील मागितलेली माहिती यापूर्वी जन माहिती अधिकारी यांनी वेळोवेळी पुरविलेली दिसून येते. तथापी पुन्हा आयोगा समोर अपीलकर्त्यास पाहिजे असलेली माहिती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात आली. सदरची माहिती अपीलकर्त्याने स्वीकृत करुन समाधान व्यक्त केले म्हणून अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1547-1548

जा.क्र.––––––––– दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1771 नाग/2010**

श्री अरविंद निळकंठराव लिखाणकर
एम/37 नंदनवन कॉलनी नागपूर
ता. जि. नागपूर –9 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहसंचालक/अवर सचिव
अल्पबचत संचालनालय, वित्त विभाग
नवीन प्रशासन भवन, 8 वा मजला मंलालयासमोर मुंबई 32.
2) श्री स. दि. खरात
जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,
अल्पबचत संचालनालय, वित्त विभाग
नवीन प्रशासन भवन, 8 वा मजला
मंलालयासमोर मुंबई 32. ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 23.3.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 10.12.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 3.2.2011 रोजी नोटीस काढून दि. 23.3.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 5.8.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, अल्पबचत संचालनालय, वित्त विभाग मंलालय मुंबई यांचेकडे त्यांनी माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन श्री अ. द. कदम तत्कालीन सहाय्यक संचालक अल्पबचत कार्यालय नागपूर यांचेवर आर्थीक गैरव्यवहाराचा आरेप लावण्यात आलेला होता. त्या गैरव्यवहाराला मी मदत केली असा आरोप झाला. त्या आरोपा संदर्भात श्री कदम यांच्या गैरव्यवहाराची माहिती मागितलेली होती. तथापी जन माहिती अधिकारी यांचेकडून दि. 26.8.2010 च्या पत्राने माहिती उपलब्ध झाली नाही असे कळविल्यामुळे त्यांनी प्रथम अपील दाखल केले. त्या प्रथम अपीलाची सुनावणी घेण्यात आली मात्र अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती उपलब्ध नसल्याने पुरविता येत नाही म्हणून प्रथम

अपील निकाली काढले. म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी श्री एस. डी. खरात आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या वतीने श्री एस. एम. उईके हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा माहिती मागण्याचा दि. 5.8.2010 चा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. त्या अर्जाला अनुसरुन अपीलकर्त्यास दि. 26.8.2010 च्या पत्राने माहिती उपलब्ध नसल्याबाबत कळविण्यात आले. याबाबत जन माहिती अधिकारी यांनी आयोगा पुढे असा खुलासा केला की अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीचा कालावधी हा सन 1994 ते 2006 असा दर्शविलेला आहे. तथापी मागितलेल्या माहितीचा कालावधी हा सन 1990 च्या सुमाराचा आहे. तसेच अपीलकर्त्याने श्री कदम यांच्या बाबत मागितलेली माहिती ही अभिलेख स्वरुपात मागितलेली नाही. श्री कदम यांनी केलेल्या आर्थीक गैरव्यवहाराच्या संदर्भात त्यांच्याकडे श्री कदम यांच्यावर बजावण्यात आलेले आरोपपत्र आणि महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाने त्यांच्या प्रकरणात दिलेल्या निर्णयाची प्रत त्यांचेकडे उपलब्ध आहे. श्री कदम यांच्यावर बजावण्यात आलेल्या आरोपपत्रामध्ये अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीचा समावेश आहे. तसेच महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणामध्ये दिलेल्या निकालात प्रत्येक बाबीवर न्यायालयाचा निर्णय आहे त्यामुळे अपीलकर्त्यास आरोपपत्राची प्रत आणि महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाच्या निकालाची प्रत उपलब्ध करुन देता येईल.

5. प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या वतीने श्री एस. एम. उईके हे उपस्थित होते. त्यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचे प्रथम अपील त्यांच्याकडे दाखल झाले होते. त्याची सुनावणी घेण्यात आली आणि जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 26.8.2010 च्या पत्राने माहिती उपलब्ध नाही असे कळविले ते योग्य असल्याने प्रथम अपील त्यांनी निकाली काढले.

6. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी त्यांनी मागितलेल्या श्री कदम यांच्या माहितीच्या संदर्भात त्यांच्यावर बजावण्यात आलेल्या आरोपपत्राची प्रत आणि महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाने दिलेल्या निकालाची प्रत अपीलकर्त्यास विनामुल्य उपलब्ध करुन देणे योग्य होईल सुनावणीत अपीलकर्त्यास सदरच्या प्रती उपलब्ध करुन देण्याबाबत जन माहिती अधिकारी यांनी मान्य केले म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना श्री कदम यांच्यावर बजावण्यात आलेल्या आरोपपत्राची प्रत आणि महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाने दिलेल्या निकालाची प्रत व्यक्तीशः किंवा रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1550-1552

जा.क्र.———————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 14 नाग/2011**

श्री पांडुरंग विठोबा शेंदरे
नागझरी पो.आमगाव(देवळी)
ता. हिंगणा जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा वनसंरक्षक
वनविभाग नागपूर
ता. जि. नागपूर
2) जन माहिती अधिकारी
वनपरिक्षेत्र कार्यालय बुटीबोरी
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 23.3.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 3.1.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 7.2.2011 रोजी नोटीस काढून दि. 23.3.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर आहे. मात्र जन माहिती अधिकारी हे हजर आहेत. व प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या वतीने देखील जन माहिती अधिकारी हे हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे प्रस्तूत प्रकरणी कोणतेही म्हणणे एकून घेता आलेले नाही. तथापी आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी श्री एस.बी.भलावी हे हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्ता यांचा माहिती मागण्याचा अर्ज जन माहिती अधिकारी म्हणून त्यांचेकडे प्राप्त झालेला नाही. मात्र अपीलकर्ता यांचा प्रथम अपीलाचा अर्ज प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे दि. 4.12.2010 रोजी दाखल झाले. त्यावेळेला असे दिसून आले की अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही वनपरिक्षेत्र अधिकारी बुटीबोरी आणि वनपरिक्षेत्र अधिकारी हिंगणा यांचेशी संबंधीत असल्यामुळे दि. 6.12.2010 रोजी पत्र देवून त्यांचेकडून माहिती मागितली. अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही सन 1996 ते 15.11.1998 या कालावधीची असल्यामुळे ती माहिती संबंधीत वनपरिक्षेत्र अधिकारी यांनी संकलीत केली आणि त्या माहितीचे संकलन झाल्यावर वनपरिक्षेत्र अधिकारी बुटीबोरी यांनी ती माहिती पाठविली त्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी दि. 17.2.2011 रोजी अपीलकर्त्यास

माहिती पाठविली तसेच अपीलकर्त्याने मागितलल्या माहितीचे संकलन झाल्यावर वनपरिक्षेत्र अधिकारी हिंगणा यांनी त्यांचेकडील माहिती जन माहिती अधिकारी यांचेकडे पाठविली आणि त्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी हिंगणा रेंजशी संबंधीत माहिती दि. 24.2.2011 रोजी अपीलकर्त्यास पाठविली. सदरची माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास पोस्टाने पाठविली असल्याबाबत सुनावणीत सांगितले. सदरची माहिती पोस्टाने पाठविल्या बाबतचा जावक क्रमांक 368 व 379 जन माहिती अधिकारी यांनी आयोगा समोर दाखविला.

3. अपीलकर्त्याने मागितलली माहिती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिली असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**

Ageyord6.1554-1555

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1773 नाग/2010**

श्री अनिल श्यामसुंदर आग्रे
44 वर्धमान नगर ठक्कर नर्सिंग होम,
वैष्णवी देवी चौक नागपूर
ता. जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एम. एन. गुर्जर
प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त (मुख्यालय)
पोलीस आयुक्त कार्यालय नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री एस. एस. कुदरे
जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन)
पोलीस आयुक्त कार्यालय नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 23.3.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 29.12.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 3.2.2011 रोजी नोटीस काढून दि. 23.3.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांच्या वतीने ॲड. तुषार मंडलेकर हे हजर होते. तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी हे देखील हजर होते.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांच्या वतीने ॲड. तुषार मंडलेकर यांनी आयोगापुढे असे सांगितले की अपीलकर्ता यांनी दि. 26.8.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त सिताबीडी विभाग नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन नागपूर शहरात बेकायदेशीररीत्या वास्तव्य करुन राहणा–या पाकीस्तानी आणि बांगलादेशी नागरीकांच्या संदर्भात एकूण 1 ते 21 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. सदरच्या माहितीसाठी त्यांनी आवश्यक असणा–या माहितीचे शुल्क भरणा केले. त्यानंतर त्यांना 30 दिवसाच्या मुदतीनंतर माहिती प्राप्त झाली मात्र प्राप्त झालेल्या माहितीमध्ये मुद्या क्र. 5 च्या संदर्भात परीपत्रकाच्या प्रती आणि

नोटिफिकेशनच्या प्रती त्यांना उपलब्ध झालेल्या नाहीत. म्हणून परीपत्रकाच्या प्रती आणि नोटिफिकेशनच्या प्रती त्यांना उपलब्ध करुन द्याव्या कारण सदरची माहिती माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 8 नुसार कोणत्याही प्रकारची गोपनिय स्वरुपाची नाही. तसेच शासनाकडून निर्गमीत केलेले परीपत्रके किंवा नोटिफिकेशन या संदर्भात कोणतीही माहिती गोपनिय असू शकत नाही असे त्यांनी सुनावणीत नमूद करुन याबाबत केंद्रीय माहिती आयुक्त यांनी दिलेले निर्णय आयोगाच्या निदर्शनास आणून दिले. तसेच अपीलकर्त्यास 30 दिवसा नंतर माहिती दिल्यामुळे सदरची माहिती विनामुल्य मिळावी असे ॲड. मंडलेकर यांनी आयोगापुढे सुनावणीत नमूद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त सिताबीडी विभाग नागपूर श्री कुदरे हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त श्री गुर्जर हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा माहिती मागण्याचा दि. 26.8.2010 चा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दि. 27.8.2010 प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने नागपूर शहरात बेकायदेशीररीत्या वास्तव्य करुन राहणा—या पाकीस्तानी आणि बांगलादेशी नागरीकांच्या संदर्भात एकूण 1 ते 21 मुद्यांवर विस्तृत स्वरुपात माहिती मागितलेली होती. तसेच अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीपैकी 1 ते 20 मुद्यांची माहिती विशेष शाखेशी संबंधीत होती आणि मुद्या क्र. 21 ची माहिती गुन्हे शाखा नागपूर यांचेशी संबंधीत होती. म्हणून सदरची माहिती प्राप्त करण्यासाठी दि. 27. 8.2010 रोजी विशेष शाखा यांना पत्र लिहून त्यांचेकडून माहिती मागितली. विशेष शाखेने दि.2.9.2010 च्या पत्राने जन माहिती अधिकारी यांना कळविले की अपीलकर्ता यांनी मागणी केलेल्या माहितीमध्ये एल टी व्ही व राहात असलेल्या 1340 लोकांची यादी त्याचप्रमाणे इतर माहिती अल्पशा काळात पुरविणे शक्य नाही म्हणून माहिती पुरविण्याकरीता कमीत कमी 15 दिवसाचा अवधी मिळण्यास विनंती केली व मुद्या क्र. 21 ची माहिती गुन्हे शाखेकडून मागण्यात यावी असे कळविले.

5. त्याला अनुसरुन गुन्हे शाखा नागपूर शहर यांना मुद्या क्र. 21 ची माहिती सादर करण्या बाबत पत्र देण्यात आले. तसेच अपीलकर्त्यास माहिती पुरविण्याकरीता 15 दिवसाचा अवधी आणखी लागेल असे कळविले आहे. त्यानंतर गुन्हे शाखेकडून मुद्या क्र. 21 ची माहिती दि. 7.9.2010 रोजी प्रप्त झाली म्हणून मुद्या क्र. 21 ची माहितीचे शुल्क भरण्याकरीता माहिती घेवून जाण्याबाबत अपीलकर्त्यास दि. 21.9.2010 च्या पत्राने कळविले. व उर्वरीत माहिती संकलीत करण्याकरीता 15 दिवसाचा अवधी लागेल असे देखील कळविण्यात आले.

6. त्यानंतर विशेष शाखा यांचेकडून 1 ते 20 मुद्यांची माहिती दि.27.9.2010 च्या पत्राने प्राप्त झाली. सदरची माहिती प्राप्त होताच अपीलकर्त्यास दि.27.9.2010 रोजी माहितीची फी रु. 520/— भरण्याबाबत कळविण्यात आले. त्यानुसार अपीलकर्ता यांनी दि. 11.10.2010 रोजी माहितीची फी रु. 520/— व रु. 44/— असे एकूण रु. 564/— चा भरणा करुन माहिती घेवून गेले.

7. जन माहिती अधिकारी यांनी आयोगा पुढे असेही सांगितले की अपीलकर्त्यास दि. 21.9.2010 अन्वये मुद्या क्र. 21 ची माहिती माहितीची फी भरुन घेवून जाण्याबाबत कळविले होते. तसेच मुद्या क्र. 1 ते 20 च्या माहितीची फी भरुन घेवून जाण्यासाठी दि. 27.9.2010 च्या पत्राने अपीलकर्त्यास कळविले होते. तसेच अपीलकर्त्याने मागणी केलेली माहिती व्यापक प्रमाणात असल्याने 15 दिवसाचा अवधी आणखी लागेल असे देखील अपीलकर्त्यास कळविण्यात आले होते. तथापी अपीलकर्त्याने माहितीची फी भरणा केल्यानंतर अपीलकर्त्यास मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. मात्र मुद्या क्र.5 बाबत पोलीस विभागाने काढलेले परीपत्रक किंवा नोटिफिकेशन गोपनिय स्वरुपाचे असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 8 प्रमाणे माहिती अपीलकर्त्यास देता येत नाही असे जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीत सांगितले. मात्र याबाबत ॲड. तुषार मंडलेकर यांनी आयोगापुढे असे सांगितले की शासनाकडून निर्गमीत केलेले परीपत्रके किंवा नोटिफिकेशन इत्यादी हे जनतेच्या माहितीसाठी असतात त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 8 अन्वये ते गोपनिय नाही म्हणून त्यांना त्यांच्या प्रती मिळणे आवश्यक आहेत. याबाबत माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 8 मधील तरतुदी अवलोकन केले असता शासनाकडून निर्गमीत केलेले परीपत्रके किंवा नोटिफिकेशन ही कागदपत्रे गोपनिय स्वरुपाची आहेत असे दिसून येत नाही. त्यामुळे सदरची माहिती प्रकट करण्याच्या अपवादामध्ये परीपत्रकाचा किंवा नोटिफिकेशनचा समावेश करणे योग्य व संयुक्तीक नाही म्हणून अपीलकर्त्यास मुद्या क्र.5 च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांचेंकडे उपलब्ध असलेले परीपत्रके ंव नोटिफिकेशनस अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. तसेच अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी 1 ते 21 मुद्यांची माहिती माहितीची फी भरल्या नंतर उपलब्ध करुन दिलेली दिसते. मात्र मुद्या क्र.5 बाबत वर नमूद केल्याप्रमाणे अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना मुद्दा क्र.5 बाबतची माहिती विनामुल्य व्यक्तीशः किंवा रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1551-1554

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 15 नाग/2011**

श्री रत्नशील सी. फुले
प्लॉट नं. 48 गुरुनानकपूरा, नागपूर
ता. जि. नागपूर – 440017 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधिक्षक अभियंता
नागपूर सुधार प्रन्यास नागपूर
ता. जि. नागपूर
2) श्री प्र. प्र. धनकर
जन माहिती अधिकारी तथा इमारत अभियंता(उत्तर)
नागपूर सुधार प्रन्यास नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 24.3.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 3.1.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 7.2.2011 रोजी नोटीस काढून दि. 24.3.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 9.6.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा इमारत अभियंता(उत्तर) नागपूर सुधार प्रन्यास नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन खाजगी भूखंड क्र. 66 नियमीतीकरणासाठी दिलेल्या संपूर्ण धारीकेचे निरीक्षण त्यांना करावयाचे होते. तथापी त्यांना जन माहिती अधिकारी यांनी सदरची धारीका निरीक्षणासाठी उपलब्ध करुन दिली नाही त्यानंतर त्यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या निर्णयात जन माहिती अधिकारी यांनी 30 दिवसाचे आत धारीकेचा शोध घेण्याचे आदेश दिले होते. तथापी त्यांना धारीका निरीक्षणाकरीता मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा इमारत अभियंता(उत्तर) नागपूर सुधार प्रन्यास नागपूर श्री धनकर हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता नागपूर सुधार प्रन्यास नागपूर श्री देव हे उपस्थित होते. जन माहिती अधिकारी यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याने भूखंड क्र. 66 बाबत निरीक्षणाकरीता धारिका मागितली होती त्या धारिकेचा शोध त्यांचे कार्यालयात केला तथापी सदरची धारीका सापडली नाही. अपीलकर्त्याने भूखंड क्र. 64 ची धारीका देखील निरीक्षणाकरीता मागितली होती. भूखंड क्र. 64 ची धारीका अपीलकर्त्यास निरीक्षणाकरीता देण्यात आली. मात्र अपीलकर्त्याला दि. 30.6.2010 च्या पत्राने अनवधानाने भूखंड क्र. 64 च्या ऐवजी भूखंड क्र. 66 ची धारीका उपलब्ध असल्याचे कळविण्यात आले होते. मात्र प्रत्यक्षात अपीलकर्त्याने भूखंड क्र. 64 च्या धारीकेचे निरीक्षण केलेले असून भूखंड क्र. 66 ची धारीका त्यांचे कार्यालयात उपलब्ध नसल्यामुळे ती निरीक्षणाकरीता उपलब्ध करुन देता येत नाही तसेच प्रथम अपीलाच्या निर्णया नंतर भूखंड क्र. 66 च्या धारीकेचा शोध घेण्यात अला मात्र ती धारीका मिळाली नाही. जन माहिती अधिकारी यांनी याबाबत आयोगाच्या असे निदर्शनास आणून दिले की जे भूखंड धारक नियमीतीकरणासाठी अर्ज करतात त्यांना रु. 1000/- ची तपासणी फी बॅकेत भरावी लागते. त्यांच्या संगणकावर रु. 1000/- ची तपासणी फी भरण्याबाबत भूखंड धारकांची यादी पाहीली असता त्यामध्ये भूखंड क्र. 66 चे रु. 1000/- ची तपासणी फी भरल्याचे दिसून येत नाही. म्हणून भूखंड क्र. 66 ची धारीका तयार झालेली दिसून येत नाही. तथापी याबाबत अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की भूखंड क्र. 66 ची तपासणी फी रु. 1000/- भरलेली आहे. त्याची पावती ते जन माहिती अधिकारी यांचेकडे दाखल करण्यात तयार आहेत. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की अपीलकर्त्याने भूखंड क्र. 66 ची तपासणी फी रु. 1000/- ची पावती हजर केल्यास भूखंड क्र. 66 च्या बाबत मालकी हक्काचे कागदपत्र मागविण्याची कार्यवाही करुन दुय्यम धारिका तयार करुन त्यावरुन अपीलकर्त्यास माहिती देता येईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे भूखंड क्र. 66 च्या बाबत रु. 1000/- ची तपासणी फी भरणा केल्याबाबतची पावती जन माहिती अधिकारी यांचेकडे सादर करावी. सदरची पावती जन माहिती अधिकारी यांचेकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी

भूखंड क्र. 66 च्या बाबत मालकी हक्काचे कागदपत्र मागविण्याची कार्यवाही करुन दुय्यम धारिका तयार करावी व त्यानंतर अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन द्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1556-1558

जा.क्र.———————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1777 नाग/2010**

श्री मुरलीधर पुंडलीकराव गुल्हाने
गरोबा मैदान बगडगंज पोस्ट ऑफीससमोर, नागपूर
ता. जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री शशिकांत हस्तक
प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता
जलप्रदाय विभाग महानगर पालिका धरमपेठ नागपूर
ता. जि. नागपूर

2) श्री टी. टी. साखरे
जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता
जलप्रदाय विभाग लकडगंज झोन क्र.8
महानगर पालिका धरमपेठ नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 24.3.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 30.12.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 3.2.2011 रोजी नोटीस काढून दि. 24.3.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 20.7.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता जलप्रदाय विभाग लकडगंज झोन क्र.8 महानगर पालिका धरमपेठ नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन तिरुपती कॉम्प्लेक्स घर क्र. 235 मोहनलाल सतनामी नगर वार्ड क्र. 23 जुना क्रस क्र. 1594 दि. 2.5.2010 ला 20 एम एम व्यासाचे अतिरिक्त नळ कनेक्शन मंजूर केलेले आहे त्याबाबत 1 ते 5 मुद्यांवर

माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना जन माहिती अधिकारी यांचेकडून अपूर्ण माहिती मिळाली म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या आदेशाप्रमाणे 7 दिवसात माहिती देण्याचे आदेश दिले परंतू त्यांना माहिती मिळाली नाही. माहितीची फी भरण्यासाठी ते जन माहिती अधिकारी यांचेकडे गेले. तथापी त्यांनी माहितीची फी भरुप घेतली नाही. फी भरण्यासाठी टाळाटाळीचे उत्तर दिले. म्हणून त्यांनी कार्यकारी अभियंता यांचेकडे तक्रार दाखल केली. त्या नंतरही माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करुन प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे 7 दिवसात संपूर्ण माहिती उपलब्ध करुन न दिल्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द शास्तीची कार्यवाही करावी असे त्यांनी आयोगापुढे नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता जलप्रदाय विभाग लकडगंज झोन क्र.8 महानगर पालिका धरमपेठ नागपूर श्री साखरे हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता जलप्रदाय विभाग महानगर पालिका धरमपेठ नागपूर श्री हस्तक हे देखील उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा माहिती मागण्याचा दि. 20.7.2010 चा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. त्या अर्जाला अनुसरुन त्यांनी दि. 5.8.2010 च्या पत्राने अपीलकर्त्यास 1 ते 5 मुद्यांची माहिती उपलब्ध करुन दिली. तथापी सदरच्या माहितीने अपीलकर्त्याचे समाधान झाले नाही म्हणून त्यांनी कार्यकारी अभियंता यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि. 1.10.2010 रोजी देण्यात आला आणि सदरचा निर्णय त्यांचे कार्यालयाकडे दि. 11.10.2010 रोजी प्राप्त झाला. प्रथम अपीलाच्या निर्णयात अपीलकर्त्यास मागितलेल्या माहितीच्या नकाशाची प्रत, दस्तऐवजाची प्रत शुल्क भरुन 7 दिवसाचे आत उपलब्ध करुन देण्याचे आदेश होते. त्यासाठी अपीलकर्त्यास माहितीची फी रु. 28/- भरण्यासाठी दि. 13.10.2010 च्या पत्राने कळविण्यात आले. मात्र अपीलकर्त्याने माहितीची फी रु. 28/- भरणा केला नाही म्हणून अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देता आली नाही. तथापी याबाबत अपीलकर्त्याने आयोगापुढे असे सांगितले की ते माहितीची फी भरण्यासाठी जन माहिती अधिकारी यांचेकडे दि. 22.10. 2010 ला हजर झाले. परंतू तिथे माहितीची फी भरुन घेण्यास तेथील कर्मचा-यानी टाळाटाळ करुन उडवाउडवीची उत्तरे दिली. मात्र त्यांचेकडून पैसे भरुन घेतले नाही म्हणून त्यांनी दि. 9.11.2010 रोजी याबाबत कार्यकारी अभियंता यांचेकडे तक्रार केली. सदरच्या तक्रारीची प्रत अपीलकर्त्याने आयोगा समोर हजर केली. त्यावर असे दिसून आले की अपीलकर्ता हे जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयाकडे दि. 22.10.2010 ला

पैसे भरण्यासाठी गेले होते. मात्र त्यांचेकडून पैसे भरुन घेण्यास तेथील कर्मचा–यानी टाळाटाळ केली अशा प्रकारची तक्रार त्यांनी कार्यकारी अभियंता यांचेकडे केल्याचे दिसून येते. याबाबत जन माहिती अधिकारी यांना खुलासा विचारला असता त्यांनी असे सांगितले की माहितीची फी भरुन घेण्याबाबत संबंधीत कर्मचा–यास त्यांनी सूचना दिल्या होत्या. तथापी त्यांनी केलेला खुलासा हा समर्थनीय दिसून येत नाही. वास्तविक पाहता जन माहिती अधिकारी यांचेकडून त्वरील फी भरुन घेण्याची कार्यवाही करणे अपेक्षित होते.

5. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 5.8.2010 च्या पत्राने दिलेली माहिती अपूर्ण दिलेली दिसून येते. तसेच प्रथम अपीलाचा निर्णय दि. 1.10.2010 रोजी देण्यात आला होता. सदरचा निर्णय जन माहिती अधिकारी यांचेकडे दि. 11.10.2010 रोजी प्राप्त झाला. तथापी अपीलकर्त्याने माहितीची फी भरण्याची तयारी दर्शवूनही जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयाकडे माहितीची फी स्वीकृत केलेली नाही. तसेच अपीलकर्त्यास प्रथम अपीलाच्या निर्णयानंतरही 7 दिवसाचे मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून याबाबत जन माहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे आवश्यक ती माहिती विनामुल्य व्यक्तीशः किंवा रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

2) जन माहिती अधिकारी यांनी प्रथम अपीलाच्या निर्णयानंतरही त्यात नमूद केल्याप्रमाणे 7 दिवसाचे आत अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही म्हणून माहिती देण्यास विलंब झालेला आहे. या विलंबाबद्यल जन माहिती अधिकारी यांना खुलासा विचारला असता त्यांनी केलेला खुलासा हा समर्थनीय दिसून येत नाही. म्हणून त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 (2) प्रमाणे शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येते. सदरची शिस्तभंगाची कार्यवाही ही सक्षम अधिकारी यांनी करावयाची आहे.

म्हणून सदरच्या निर्णयाची एक प्रत **<u>आयुक्त नागपूर महानगर पालिका नागपूर</u>** यांचेकडे स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1557-1560

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1778 नाग/2010**

श्री राजा खान मेहबूब खान
द्वारा डायमंड गॅस हाऊस,शॉप नं. 5,
छोटी मस्जीद कॉम्प्लेक्स, सदर बाजार नागपूर
ता. जि. नागपूर –01 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री दिलीप चरडे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय व्यवस्थापक
महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ, नागपूर
पंचशिल सिनेमा जवळ, वर्धा रोड, रामदास पेठ, नागपूर 440012

2) श्री विजय अलोणे उप व्यवस्थापक
जन माहिती अधिकारी
महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ, नागपूर
पंचशिल सिनेमा जवळ, वर्धा रोड, रामदास पेठ,
नागपूर 440012 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 24.3.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 23.12.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 3.2.2011 रोजी नोटीस काढून दि. 24.3.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 1.10.2010 रोजी जन माहिती अधिकारी महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ, नागपूर यांचेकडे त्यांनी माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन माहे सप्टेंबर 2010 मध्ये वेकोली आणि एस ई सी एल कडून लघुउद्योकजनांना आणि विटभटीधारकांना वितरीत केलेल्या कोळशाबाबत 1 ते 4 मुद्यांवर

माहिती मागितलेली होती. त्यांना माहितीचे शुल्क भरण्याबाबत जन माहिती अधिकारी यांनी कळविले त्यानुसार त्यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे दि. 28.10.2010 रोजी माहितीचे शुल्क रु. 50/– भरले. माहितीचे शुल्क भरल्यानंतर त्यांना दि. 9.11.2010 च्या पत्राने जन माहिती अधिकारी यांनी माहिती पाठविली. सदरच्या माहितीचे दि. 9.11.2010 चे पत्र त्यांना दि. 15.11.2010 रोजी मिळाले. परंतू मुद्या क्र. 4 मधील माहितीच्या संदर्भात फक्त परीपत्रकाची प्रत त्यांना दिली मात्र सप्टेंबर 2010 मध्ये अस्थायी विटभटीधारकांना केलेल्या कोळशा वितरणाबाबतची माहिती त्यांना मिळाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. परंतू त्यांचे प्रथम अपील फेटाळले म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ, नागपूर श्री अलोणे हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभागीय व्यवस्थापक महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ, नागपूर श्री चरडे हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा माहिती मागण्याचा दि. 1.10.2010 चा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. त्या अर्जाला अनुसरुन अपीलकर्त्याची माहिती काढण्यात आली आणि अपीलकर्त्यास माहितीची फी रु. 50/– भरण्याबाबत दि. 15.10.2010 रोजी पत्र पाठविले. अपीलकर्त्याने दि. 28.10.2010 रोजी माहितीचे शुल्क रु. 50/– भरले. त्यानंतर अपीलकर्त्यास दि. 9.11.2010 च्या पत्राने माहिती पाठविली. अपीलकर्त्यास सदरची माहिती दि. 15.11.2010 रोजी प्राप्त झाल्याचे त्यांनी मान्य केले. मात्र मुद्या क्र. 4 बाबत सप्टेंबर 2010 मध्ये अस्थायी विटभटीधारकांना कोळशाचे वितरण केल्याबाबतची कोणतीही माहिती त्यांना प्राप्त झालेली नाही. याबाबत जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगा पुढे असे सांगितले की सप्टेंबर 2010 मध्ये अस्थायी विटभटीधारकांना कोळशाचे वितरण झालेले नाही. तथापी अपीलकर्त्यास त्यानंतर कोळशाचे जे वितरण झालेले आहे त्याची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. म्हणून प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की सप्टेंबर 2010 मध्ये अस्थायी विटभटीधारकांना कोळशाचे वितरण झाले अगर कसे याची स्पष्ट माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना सप्टेंबर 2010 मध्ये अस्थायी विटभटीधारकांना कोळशाचे वितरण झाले अगर कसे याची माहिती स्पष्टपणे विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1562-1564

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1783 नाग/2010

श्री दिलीप गजाननराव खेडीकर
नयापुरा राम मंदिर जवळ, प्रम नगर वार्ड क्र.34 नागपूर
ता. जि. नागपूर –2 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी
आरोग्य व बाजार समिती, महानगर पालिका नागपूर
सिव्हील लाईन्स, नागपूर
2) जन माहिती अधिकारी
आरोग्य व बाजार समिती, महानगर पालिका नागपूर
सिव्हील लाईन्स, नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 25.3.2011 )**
**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 24.12.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 3.2.2011 रोजी नोटीस काढून दि. 25.3.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. मात्र उत्तरवादी हजर झालेले दिसून येत नाही.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 13.10.2010 रोजी जन माहिती अधिकारी अध्यक्ष आरोग्य व बाजार समिती, महानगर पालिका नागपूर यांचेकडे त्यांनी माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन 1 ते 14 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना कोणतीही माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. अपीलकर्ता यांनी आयोगाच्या असेही निदर्शनास आणून दिले की त्यांनी माहितीच्या अधिकारा खालील अर्ज हा महानगर पालिकेचे अध्यक्ष आरोग्य व बाजार समिती यांचेकडे दाखल केले होते. परंतू प्रत्यक्षात अध्यक्षा हया माहिती अधिकारी नाहीत. त्यामुळे त्यांना कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही असे त्यांनी आयोगाच्या निदर्शनास आणून दिले. म्हणून सुनावणीच्या वेळी अपीलकर्ता यांना त्यांनी मागितलेली माहिती प्राप्त होण्यासाठी अध्यक्ष यांच्या ऐवजी नागपूर महानगर पालिकेचे आरोग्य व

बाजार समितीचे जे जन माहिती अधिकारी आहेत त्यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन माहिती प्राप्त करुन घेणे संयुक्तिक होईल. आणि त्याप्रमाणे अपीलकर्त्याने आयोगा समोर नागपूर महानगर पालिकेच्या संबंधीत जन माहिती अधिकारी यांचेकडे माहिती मागण्याचे नवीन अर्ज दाखल करण्याबाबत मान्य केले. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्त्याने नागपूर महानगर पालिकेच्या आरोग्य व बाजार समितीच्या जन माहिती अधिकारी यांचेकडे माहितीचा अर्ज दाखल करणे संयुक्तिक असल्याने सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1566-1567

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1708 नाग/2010

श्री प्रकाश दगडू भारंबे
के.ऑफ किशोर मुंजनकर
7–ए, साटोने ले–आऊट गिताई नगर
धुनिवाले मठासमोर नागपूर रोड वर्धा
ता. जि. वर्धा –442401 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री तु. अ. पवार
प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसचिव
महाराष्ट्र लोकसेवा आयोग मुंबई
बॅक ऑफ इंडिया इमारत, महात्मा गांधी मार्ग मुंबई 400 001

2) श्री आचरेकर
जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव
महाराष्ट्र लोकसेवा आयोग मुंबई
बॅक ऑफ इंडिया इमारत, महात्मा गांधी मार्ग मुंबई 400 001 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 25.3.2011 )**

### नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक 16.12.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 9.1.2011 रोजी नोटीस काढून दि. 8.3.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. तथापी त्या दिवशी उत्तरवादी हजर झाले नाहीत. म्हणून पुढील सुनावणी तारीख दिनांक 25.3.2011 रोजी ठेवण्यात आली. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 6.10.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव महाराष्ट्र लोकसेवा आयोग मुंबई यांचेकडे त्यांनी माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर

करुन महाराष्ट्र शासनाच्या दुग्ध व्यवसाय विकास विभाग सामान्य राज्य सेवा गट–अ (कनिष्ठ) पदासाठी आयोगाने दि. 20 नोव्हेंबर 2004 रोजी दिलेल्या जाहिराती नुसार मुलाखत घेवून दि. 21.11.2008 रोजी निवड जाहीर केलेल्या उमेदवाराच्या अनिवार्य व प्रत्यक्षात असणा–या अनुभवाबाबत माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना 30 दिवसाच्या मुदतीत माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी दि. 15.11.2010 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसचिव महाराष्ट्र लोकसेवा आयोग मुंबई यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. त्यानंतर त्यांना दि. 22.12.2010 च्या पत्राने प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली. तथापी मुद्या क्र. 1 च्या माहिती बाबत त्यांना अपूर्ण माहिती मिळाली. तसेच जन माहिती अधिकारी यांनी 30 दिवसाच्या आत कोणतीही माहिती त्यांना उपलब्ध करुन दिली नाही म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अन्वये कार्यवाही करावी. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नाही म्हणून त्यांचेविरुध्द कार्यवाही करावी असे त्यांनी सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव महाराष्ट्र लोकसेवा आयोग मुंबई श्री आचरेकर हे उपस्थित होते. त्यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा माहिती मागण्याचा दि. 6.10.2010 चा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे पोस्टाद्वारे दि. 8.10.2010 रोजी प्राप्त झाला होता. मात्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मुलाखती संबंधीच्या कालबध्द कार्यक्रमामध्ये अधिकारी व कर्मचारी व्यस्त असल्यामुळे अपीलकर्त्यास 30 दिवसाच्या मुदतीत माहिती देता आली नाही त्यामुळे माहिती पुरविण्यास विलंब झालेला आहे. तथापी अपीलकर्त्याने त्यानंतर दि. 15.10.2010 च्या अर्जान्वये प्रथम अपील उपसचिव यांचेकडे दाखल केले. सदरचे प्रथम अपील उपसचिव यांचेकडे दि. 18.11.2010 रोजी प्राप्त झाले. त्यानंतर प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसचिव यांनी दि. 22.12.2010 रोजी अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिली असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत नमुद केले. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने सुनावणीत मान्य केले. मात्र सदरची माहिती विलंबाने प्राप्त झाली असून मुद्या क्र. 1 ची माहिती त्यांना अपूर्ण मिळालेली आहे. असे त्यांनी नमुद केले. याबाबत जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की मुद्या क्र. 1 च्या माहितीची वस्तुस्थिती अपीलकर्त्यास दिलेली आहे. तथापी आयोगाकडे मुद्या क्र. 1 बाबत सेवा प्रवेश बाबत नियमावली आहे त्या सेवा प्रवेश नियमावली मधील वस्तुस्थिती अपीलकर्त्यास कळविणे संयुक्तिक दिसून येते. तसेच मुद्या क्र. 2 बाबत सर्व कागदपत्रे शासनाकडे सादर केलेली असल्यामुळे शासनाकडून अपीलकर्त्याने मुद्या क्र. 2 ची माहिती प्राप्त करुन घेणे योग्य होईल.

4. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याच्या दि. 6.10.2010 च्या माहिती अधिकारा खालील अर्जाला अनुसरुन 30 दिवसाच्या मुदतीत जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यानंतर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि. 22.12.2010 च्या पत्राने अपीलकर्त्यास माहिती उशिरा दिलेली दिसून येते. म्हणजे सदरची माहिती अपीलकर्त्यास सुमारे 75 दिवस उशीराने उपलब्ध करुन दिलेली दिसून येते.

5. जन माहिती अधिकारी यांना माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाबद्यल खुलासा विचारला असता त्यांनी सुनावणीत आयोगापुढे असे सांगितले की महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मुलाखती संबंधीच्या कालबध्द कार्यक्रमामध्ये अधिकारी व कर्मचारी व्यस्त असल्यामुळे माहिती देण्यास विलंब झालेला आहे. तथापी जन माहिती अधिकारी यांनी केलेला खुलासा हा समर्थनीय व योग्य दिसून येत नाही म्हणून ते विलंबास जबाबदार दिसून येतात. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना माहिती अर्जातील मुद्या क्र. 1 बाबत सेवा प्रवेश नियमावली मधील वस्तुस्थिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने कळवावी.

2) जन माहिती अधिकारी यांनी वर नमूद केल्याप्रमाणे अपीलकर्त्यास 30 दिवसाचे आंत कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. सदरची माहिती दि. 22.12. 2010 च्या पत्राने म्हणजे सुमारे 75 दिवस विलंबाने उपलब्ध करुन दिलेली आहे. सदरच्या विलंबास जन माहिती अधिकारी हे जबाबदार दिसून येतात. म्हणून त्यांचे विरुध्द तक्रार माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 (2) शिस्तभंगाच्या कार्यवाहीची शिफारस करण्यात येत आहे.

3) प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपील दाखल झाल्यानंतर प्रथम अपीलाचा कोणताही निर्णय दिलेला नाही म्हणून त्यांना याबाबत सक्त ताकीद देण्यात येत असून भविष्यात याबाबतची पुनरावृत्ती करु नये अशी समज त्यांना देण्यात येत आहे.

4) सदरच्या निर्णयाची एक प्रत **<u>अध्यक्ष महाराष्ट्र लोकसेवा आयोग बॅंक ऑफ इंडिया इमारत, महात्मा गांधी मार्ग मुंबई 400 001</u>** यांचेकडे स्वतंत्रपणे पोस्टाने योग्य त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी.

5) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1567-1570

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1709 नाग/2010**

श्री प्रकाश दगडू भारंबे
के.ऑफ किशोर मुंजनकर
7–ए, साटोने ले–आऊट गिताई नगर
धुनिवाले मठासमोर नागपूर रोड वर्धा
ता. जि. वर्धा –442401 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री तु. अ. पवार
प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसचिव
महाराष्ट्र लोकसेवा आयोग मुंबई
बॅक ऑफ इंडिया इमारत, महात्मा गांधी मार्ग मुंबई 400 001

2) श्री आचरेकर
जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव
महाराष्ट्र लोकसेवा आयोग मुंबई
बॅक ऑफ इंडिया इमारत, महात्मा गांधी मार्ग मुंबई 400 001 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 25.3.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 18.12.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 9.1.2011 रोजी नोटीस काढून दि. 8.3.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. तथापी त्या दिवशी उत्तरवादी हजर झाले नाहीत. म्हणून पुढील सुनावणी तारीख दिनांक 25.3.2011 रोजी ठेवण्यात आली. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 6.10.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव महाराष्ट्र लोकसेवा आयोग मुंबई यांचेकडे त्यांनी माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर

करुन महाराष्ट्र शासनाच्या दुग्ध व्यवसाय विकास विभागातील महाव्यवस्थापक दुग्ध व्यवसाय विकास विभाग सामान्य राज्य सेवा गट–अ (कनिष्ठ) पदासाठी आयोगाने दि. 20 नोव्हेंबर 2004 रोजी दिलेल्या जाहिराती नुसार मुलाखत घेवून दि. 21.11.2008 रोजी निवड जाहीर केलेल्या उमेदवाराच्या अनिवार्य व प्रत्यक्षात असणा–या अनुभवाबाबत माहिती मागितलेली होती. तथापी जन माहिती अधिकारी यांचेकडून त्यांना 30 दिवसाच्या मुदतीत माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी दि. 16.11.2010 रोजी प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसचिव महाराष्ट्र लोकसेवा आयोग मुंबई यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपीलाचा निर्णय प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेला नाही. त्यानंतर त्यांना दि. 22.12.2010 च्या पत्राने प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली. मात्र सदरची माहिती त्यांना सुमारे 75 दिवस उशिराने प्राप्त झाली म्हणून जन माहिती अधिकारी यांनी 30 दिवसाच्या आत कोणतीही माहिती त्यांना उपलब्ध करुन दिली नाही म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम 2005 अन्वये कार्यवाही करावी. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नाही म्हणून त्यांचे विरुध्दही कार्यवाही करावी असे अपीलकर्त्याने सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा अवर सचिव महाराष्ट्र लोकसेवा आयोग मुंबई श्री आचरेकर हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसचिव महाराष्ट्र लोकसेवा आयोग मुंबई श्री पवार हे उपस्थित होते.

4. जन माहिती अधिकारी यांनी आजच्या सुनावणीस आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा माहिती मागण्याचा दि. 6.10.2010 चा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे पोस्टाद्वारे दि. 8.10.2010 रोजी प्राप्त झाला होता. मात्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मुलाखती संबंधीच्या कालबध्द कार्यक्रमामध्ये अधिकारी व कर्मचारी व्यस्त असल्यामुळे अपीलकर्त्यास 30 दिवसाच्या मुदतीत माहिती देता आली नाही. त्यामुळे माहिती पुरविण्यास विलंब झालेला आहे. तथापी अपीलकर्त्याने त्यानंतर दि. 16.11.2010 च्या अर्जान्वये प्रथम अपील उपसचिव यांचेकडे दाखल केले. त्यानंतर प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसचिव यांनी दि. 22.12.2010 रोजी अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन दिली असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत नमुद केले. तथापी सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने सुनावणीत मान्य केले. मात्र सदरची माहिती विलंबाने प्राप्त झालेली आहे म्हणून विलंबाबद्यल जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द कार्यवाही करावी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाच्या निर्णयात दिलेला नाही म्हणून त्यांचे विरुध्दही कार्यवाही करावी असे अपीलकर्त्याने सुनावणीत नमुद केले.

5. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 22.12.2010 च्या पत्रान्वये माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नाही.

4. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की जन माहिती अधिकारी यांनी 30 दिवसाच्या मुदतीत कोणतीही माहिती अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिलेली नाही. या विलंबाबद्यल त्यांनी आयोगा पुढे असे सांगितले की महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या मुलाखती संबंधीच्या कालबध्द कार्यक्रमामध्ये अधिकारी व कर्मचारी व्यस्त असल्यामुळे माहिती देण्यास विलंब झालेला आहे. तथापी जन माहिती अधिकारी यांनी केलेला खुलासा हा समर्थनीय व योग्य दिसून येत नाही म्हणून ते विलंबास जबाबदार दिसून येतात. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल झाल्यानंतरही प्रथम अपीलाचा निर्णय त्यांनी दिलेला नाही. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास 30 दिवसाचे आंत कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. सदरची माहिती दि. 22.12.2010 च्या पत्राने म्हणजे सुमारे 75 दिवस विलंबाने उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. म्हणून सदरच्या विलंबास जन माहिती अधिकारी हे जबाबदार दिसून येतात. त्यांनी विलंबाबद्यल केलेला खुलासा हा समर्थनीय व योग्य दिसून येत नाही. म्हणून त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 20 (2) शिस्तभंगाच्या कार्यवाहीची शिफारस करण्यात येत आहे. सदरच्या शिस्तभंगाची कार्यवाही ही सक्षम अधिकारी यांनी करावयाची आहे.
2) प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपील दाखल झाल्यानंतर प्रथम अपीलाचा कोणताही निर्णय दिलेला नाही म्हणून त्यांना याबाबत सक्त ताकीद देण्यात येत असून भविष्यात याबाबतची पुनरावृत्ती करु नये अशी समज त्यांना देण्यात येत आहे.

3) सदरच्या निर्णयाची एक प्रत **अध्यक्ष महाराष्ट्र लोकसेवा आयोग बॅक ऑफ इंडिया इमारत, महात्मा गांधी मार्ग मुंबई 400 001** यांचेकडे स्वतंत्रपणे पोस्टाने योग्य त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी.

4) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1572-1575

जा.क्र.––––––––– दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील कमांक 1785 नाग/2010

श्री दिलीप गजबे
मु. पो. येरला(इंदोरा)
ता. नरखेड जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी
एस.एफ.एस. कॉलेज, सेमिनरी हिल्स, नागपूर
ता. जि. नागपूर

2) जन माहिती अधिकारी
एस.एफ.एस. कॉलेज, सेमिनरी हिल्स, नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 25.3.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 5.10.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 3.2.2011 रोजी नोटीस काढून दि. 25.3.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 15.7.2010 व दि. 30.7.2010 रोजी जन माहिती अधिकारी एस. एफ.एस. कॉलेज, सेमिनरी हिल्स, नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन एस.एफ.एस. कॉलेज मधील मराठी विभागाच्या वर्कलोड बाबत मराठी विभागाच्या शिक्षकांची माहिती मागितलेली होती. तसेच मराठी विभागातील श्री प्रशांत शेळके यांना जी लीन दिली आहे त्याची प्रत मागितलेली होती. तथापी अपीलकर्त्यास दि. 15.7.2010 च्या अर्जातील माहिती दि. 22.7.2010 च्या पत्राने प्राप्त झाली आणि दि. 30.7.2010 च्या अर्जातील माहितीच्या संदर्भात सदरची माहिती त्रयस्थ पक्षाशी संबंधीत

असल्याने देता येत नाही असे दि. 22.9.2010 च्या पत्राने त्यांना कळविले म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. मात्र प्रथम अपील दाखल केल्यानंतरही त्यांना श्री प्रशांत शेळके यांच्या लीनची प्रत माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी एस.एफ.एस. कॉलेज, सेमिनरी हिल्स, नागपूर यांच्या तर्फे ॲड. बर्नाड जॉन हे उपस्थित होते. त्यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचे माहिती मागण्याचे दोन्ही अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाले होते. अपीलकर्त्याच्या दि. 15.7.2010 च्या माहिती अर्जाची माहिती दि. 22.7.2010 च्या पत्राने अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिली तसेच दि. 30.7.2010 रोजीच्या अर्जाची माहिती अपीलकर्त्यास दि. 22.9.2010 रोजी पत्र देवून सदरची माहिती त्रयस्थ पक्षाशी संबंधीत असल्याने देता येत नाही असे कळविले आहे. कारण अपीलकर्त्याने प्रा. श्री प्रशांत शेळके यांच्या लीन बाबत माहिती मागितलेली आहे. म्हणून सदरची माहिती त्रयस्थ पक्षाशी संबंधीत असल्याने ती अपीलकर्त्यास पुरविता येत नाही असे ॲड. बर्नाड जॉन यांनी आयोगा पुढे सांगितले.

4. उत्तरवादी यांचे वकील यांचे म्हणणे असे आहे की अपीलकर्त्यास दि. 15.7.2010 च्या माहिती अर्जाची माहिती दि. 22.7.2010 रोजी जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली आहे. मात्र दि. 30.7.2010 च्या माहिती अर्जातील प्रा. श्री प्रशांत शेळके यांना कॉलेजने जी लीन दिली आहे त्या लीनची प्रत दिलेली नाही. तथापी याबाबत उत्तरवादी यांच्या वकीलांचे म्हणणे असे आहे की माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 8 (जे) प्रमाणे सदरची माहिती वैयक्तीक स्वरुपाची असल्याने उपलब्ध करुन देता येत नाही. मात्र अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की प्रा. श्री प्रशांत शेळके यांना कॉलेजने लीन दिली आहे त्यामुळे ते कागदपत्र कॉलेजच्या संबंधात आहे. त्यामुळे त्यांना वैयक्तीक स्वरुप देता येणार नाही.

5. म्हणून प्रस्तूत प्रकरणात अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांचे वकीलांचे म्हणणे ऐकून घेतल्या नंतर असे दिसून येते की कॉलेजने प्रा. श्री प्रशांत शेळके यांना लीन दिलेली असल्यामुळे त्या लीनची प्रत हे कॉलेजचे दस्तऐवज आहे त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 8 (जे) प्रमाणे माहिती देता येत नाही हे वकीलांचे म्हणणे कायद्याला धरुन सुसंगत नाही म्हणून जन माहिती अधिकारी यांनी सदरच्या लीनची प्रत अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 15 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना प्रा. श्री प्रशांत शेळके यांना कॉलेजने जी लीन दिले ली आहे त्या लीनची सत्यप्रत विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1574-1576

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 8 नाग/2011 व अपील क्रमांक 9 नाग/2011**

श्री अमर ताराचंदजी तिरपुडे
के.ऑफ केंद्रीय कार्यालय, जनसेवा जयलक्ष अन्याय,
भ्रष्टाचार निराकरण समिती महा.
न्यू आशिर्वाद नगर, गिरोला(कारधा)
ता. जि. भंडारा ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

**<u>अपील क्रमांक 8 नाग/2011</u>**

1) श्री जाधव
प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,
साकोली
ता. साकोली जि. भंडारा
2) जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार
तहसिल कार्यालय साकोली
ता. साकोली जि. भंडारा ..... **उत्तरवादी**

**<u>अपील क्रमांक 9 नाग/2011</u>**

3) श्री जाधव
प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी,
साकोली
ता. साकोली जि. भंडारा
4) श्री डी. डी. सोनवाने
जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार
तहसिल कार्यालय लाखांदूर
ता. साकोली जि. भंडारा ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 28.3.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 1.11.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये वर नमुद केलेले दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून

दि. 7.2.2011 रोजी नोटीस काढून दि. 15.3.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. मात्र सदरच्या दिवशी सुनावणी न होवू शकल्यामुळे प्रस्तुत सुनावणी आज दि. 28.3.2011 रोजी घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. अपील क्र. 8/2011 मध्ये जन माहिती अधिकारी तहसिलदार साकोली हे आहेत तर अपील क्र. 9/2011 मध्ये जन माहिती अधिकारी तहसिलदार लाखांदूर हे आहेत. मात्र अपीलकर्ता हे एकच आहेत तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, साकोली हे एकच आहेत. त्यामुळे दोन्ही अपीलांची एकत्रीत सुनावणी आयोगापुढे घेण्यात आली.

3. **<u>अपील क्र. 8/2011</u>**

आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 28.10.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार साकोली यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन संजय गांधी निराधार योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृध्दापकाळ योजना, श्रावणबाळ योजना इत्यादी अर्थसहाय्य योजनेच्या बाबतीत एकुण 1 ते 5 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील उपविभागीय अधिकारी साकोली यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाच्या निर्णयानंतरही त्यांना अपेक्षित माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे आजच्या सुनावणीत नमुद केले.

4. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तहसिलदार साकोली यांच्या वतीने नायब तहसिलदार श्री एस.बी.चिखलीकर हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, साकोली श्री जाधव हे उपस्थित होते.

5. जन माहिती अधिकारी यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा माहिती मागण्याचा दि. 28.10.2010 चा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. अपीलकर्त्याने वर नमूद केलेल्या योजनेची व्यापक प्रमाणातील माहिती सन 2005 ते सन 2010 या कालावधीची मागितलेली होती. अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीचे स्वरुप हे फार मोठया प्रमाणात असल्यामुळे व व्यापक स्वरुपात असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी दि. 30.10.2010 च्या पत्राने अपीलकर्त्यास कळविले की आपण मागितलेली माहिती व्यापक प्रमाणात असल्यामुळे माहिती पुरविण्याकरीता आवश्यक असलेला निधी व मनुष्यबळ या कार्यालयात उपलब्ध नसल्याने तसेच या सार्वजनिक प्राधिकरणाची साधनसामग्री प्रमाणाबाहेर वळवावी लागत असल्याने माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 7 (9) अन्वये आपण या कार्यालयास उपस्थित राहून आवश्यक असलेल्या माहितीचे निरीक्षण करुन व तपासणी करुन आवश्यक ती माहिती प्राप्त करुन घ्यावी. तथापी अपीलकर्ता माहितीच्या निरीक्षणासाठी त्यांचे कार्यालयात गेले नाही त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील उपविभागीय अधिकारी साकोली यांचेकडे दाखल

केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि. 24.12.2010 रोजी देण्यात आला. आणि त्यामध्ये देखील अपीलकर्ता यांनी तहसिलदार साकोली यांचे कार्यालयात उपस्थित राहून माहितीची तपासणी करुन घ्यावी व तपासणी नंतर जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन द्यावी असे प्रथम अपीलाच्या निर्णयात आदेश दिलेले आहेत मात्र अपीलकर्ता जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात माहितीच्या निरीक्षणासाठी उपस्थित झाले नाहीत म्हणून त्यांना माहिती देता आली नाही असे आयोगापुढे जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत नमुद केले.

6. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीचे स्वरुप हे फार मोठया प्रमाणात दिसून येते. व्यापक स्वरुपात माहिती असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपस्थित राहून माहितीचे निरीक्षण करुन व तपासणी करुन घेवून आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेणे संयुक्तीक दिसून येते. म्हणून प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेल्या प्रथम अपीलाच्या निर्णयात कोणताही बदल करण्याची आवश्यकता दिसून येत नाही. म्हणून अपीलकर्ता व जन माहिती अधिकारी यांच्या संमतीने आयोगापुढे असे ठरविण्यात आले की अपीलकर्त्याने जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार साकोली यांचे कार्यालयात दि.7. 4.2011 व दि. 8.4.2010 रोजी कार्यालयीन वेळेत उपस्थित राहावे आणि कागदपत्रांची तपासणी व निरीक्षण करुन घ्यावे आणि निरीक्षणानंतर आवश्यक त्या माहितीचे शुल्क भरुन घेवून माहिती प्राप्त करुन घेणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

7. <u>अपील क्र. 9/2011</u>

आजच्या सुनावणीस अपीलकर्तायांनी आयोगापुढे सुनावणीत असे नमुद केले की त्यांनी वर नमूद केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार लाखांदूर यांचेकडे देखील दि. 28.10.2010 रोजी माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन वरील योजनेची माहिती मागितलेली होती. तथापी त्यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील उपविभागीय अधिकारी साकोली यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाच्या निर्णयानंतरही त्यांना अपेक्षित माहिती मिळाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे आजच्या सुनावणीत नमुद केले.

8. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार लाखांदूर श्री सोनवने हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, साकोली श्री जाधव हे उपस्थित होते. जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीत आयोगाच्या असे निदर्शनास आणून दिले की अपीलकर्त्याचा माहिती मागण्याचा दि. 28.10.2010 चा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. मात्र सदरच्या अर्जासोबत

दारीद्रय रेषेखालील प्रमाणपत्र जोडलेले नसल्यामुळे अपीलकर्त्यास दि. 1.11.2010 रोजी पत्र पाठवून दारीद्रय रेषेखालील प्रमाणपत्र जोडण्याबाबत कळविण्यात आले होते. मात्र अपीलकर्त्याने दारीद्रय रेषेखालील प्रमाणपत्र जोडलेले नाही म्हणून त्यांना विनाशुल्क माहिती पुरविता आली नाही. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील उपविभागीय अधिकारी साकोली यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि. 24.12.2010 रोजी देण्यात आला. आणि त्यामध्ये प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे नमुद केले की अपीलकर्त्याने दारीद्रय रेषेखालील प्रमाणपत्र जन माहिती अधिकारी यांचेकडे पुरवावे किंवा माहितीचे शुल्क जमा करावे आणि त्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय प्रथम अपीलात देण्यात आला. त्याला अनुसरुन अपीलकर्त्याने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि. 25.1.2010 रोजी दारीद्रय रेषेखालील प्रमाणपत्र सादर केले त्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 3.2.2011 रोजी कागदपत्रांच्या तपासणीसाठी व निरीक्षणसाठी त्यांचे कार्यालयात बोलाविले. मात्र अपीलकर्ता जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात रेकॉर्डच्या तपासणीसाठी व निरीक्षणासाठी गेले नाहीत म्हणून त्यांना माहिती देता आली नाही असे आयोगापुढे जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत नमुद केले.

9. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याने मागितलेल्या माहितीचे स्वरुप हे फार मोठया प्रमाणात असल्यामुळे त्यांनी प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपस्थित राहून संबंधीत कागदपत्रांचे निरीक्षण करुन व तपासणी करुन घेवून आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेणे संयुक्तीक होईल. यावर अपीलकर्त्याने जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात रेकॉर्डची तपासणी व निरीक्षण करण्याचे आयोगासमोर मान्य केले. म्हणून जन माहिती अधिकारी आणि अपीलकर्ता यांच्या दोघांच्या संमतीने आयोगासमोर असा निर्णय घेण्यात आला की अपीलकर्त्याने जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार लाखांदूर यांचे कार्यालयात दि.19.4.2011 व दि. 20.4.2010 रोजी रेकॉर्डची तपासणी व निरीक्षण करण्यासाठी उपस्थित राहावे आणि निरीक्षणानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास त्यांनी दारीद्रय रेषेखालील प्रमाणपत्र सादर केलेला असल्यामुळे आवश्यक ती माहिती विनाशुल्क उपलब्ध करुन द्यावे त्यासाठी अपीलकर्ता यांचे वरील दोन्ही अपीले ही अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) <u>**अपील क. 8/2011 मध्ये**</u> अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्त्याने दि.7.4.2011 व दि. 8.4.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार साकोली यांचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत उपस्थित राहून

आवश्यक त्या रेकॉर्डचे तपासणी व निरीक्षण करुन घ्यावे आणि निरीक्षणानंतर आवश्यक ती माहिती शुल्क भरुन उपलब्ध करुन घ्यावी.

2) **अपील क. 9/2011 मध्ये** अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्त्याने दि.19.4.2011 व दि. 20.4.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार लाखांदूर यांचे कार्यालयात कार्यालयीन वेळेत उपस्थित राहून आवश्यक त्या रेकॉर्डचे तपासणी व निरीक्षण करुन घ्यावे आणि निरीक्षणानंतर आवश्यक ती माहिती त्यांनी दारीद्रय रेषेखालील प्रमाणपत्र जोडलेला असल्यामुळे विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1578-1582

जा.क्र.—————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 308 नाग/2010

श्री विजयकुमार गोपालदास अग्रवाल
ओम राईस मिल कंपाउंड, फुलचूर रोड गोंदिया
ता. जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी
नगर परिषद कार्यालय गोंदिया
ता. जि. गोंदिया
2) श्री झाडे
जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार
नगर परिषद कार्यालय गोंदिया
ता. जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 1.4.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 20.3.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी दि. 30.4.2010 रोजी घेण्यात येवून दि. 30.4.2010 रोजी निर्णय दिलेला होता. तथापी आयोगाच्या दि. 30.4.2010 च्या निर्णया विरुध्द श्री मुकेश राजेंद्र मिश्रा यांनी मा. उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर येथे याचिका क्र. 4743/2010 दाखल केलेली होती. सदरच्या याचिकेची मा. उच्च न्यायालयात सुनावणी होवून मा. उच्च न्यायालयाने आयोगाचे दि. 30.4.2010 चे आदेश रद्यबातल ठरविले आणि मा. उच्च न्यायालयाने प्रस्तूत अपीलाची पुन्हा नव्याने सुनावणी घेवून आणि संबंधीतांचे म्हणणे एकून घेवून निर्णय देण्याबाबत दि. 2.2.2011 रोजी आदेश दिलेले आहेत. मा. उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर यांचेकडील दि. 2.2.2011 च्या आदेशान्वये आयोगाने प्रस्तूत अपीलाची सुनावणी घेण्यासाठी सर्व संबंधीतांना आयोगाच्या कार्यालयात दि. 1.4.2011 रोजी बोलाविण्यात आले होते. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी तसेच याचिकाकर्ते हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 3.11.2009 रोजी जन माहिती अधिकारी मुख्याधिकारी कार्यालय नगर परिषद गोंदिया यांचेकडे त्यांनी माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन (अ) उपरोक्त विषय व कालावधी संदर्भित प्रकरण मे अब तक की गयी संपुर्ण कार्यवाही (यदि शासन निर्धारीत अवधी मे न हुयी हो तो उव हेतु जनसेवको पर की गयी कार्यवाही सहीत) प्रदर्शित करने वाली समस्त सुचना कार्यालयीन टिपणी सह देवे

(ब) महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन निर्णय क्र.कडोमपा–1006/प.क्र. 192/2006/नवि–28 मंत्रालय मुंबई दि. 2 मार्च 2009 के अवलोकन हेतु संधी प्रदान की जाय
(क) यदि मेरे आवदेन के प्श्चात प्राप्त अतीक्रमण विषय के किसी प्रकरण मे यदि कोई कार्यवाही हुयी हो तो वह प्रकरण दिखाया जाय अशी माहिती मागितलेली दिसून येते.

3. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 2.11.2009 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतू अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 7.12.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि. 21.12.2009 रोजी देण्यात आला असून त्यात असे नमुद केले आहे की, माहिती मुदतीत दिली नाही याउलट अपुरी माहिती व पत्र दिल्याचे दिसून येते. तसेच जन माहिती अधिकारी नगर परिषद गोंदिया यांनी दुर्लक्ष केल्याचे दिसून येते. अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती त्यांना योग्य प्रकारे मिळाली नाही त्यामुळे जन माहिती अधिकारी आणि त्यांचे अधिनस्थ असलेल्या कर्मचा–यानी कसूर केला आहे. म्हणून मागितलेली माहिती रेकॉर्डच्या स्वरुपात देण्यात यावी असा प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येतो व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना दि. 2.12.2009 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. तथापी त्या माहिती बाबत समाधान झाले नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

4. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी मुद्या क्र. 1 मध्ये कार्यालयीन टिपणीची माहिती द्यावी असे मागितले होते. मुद्या क्र. 2 व 3 मध्ये माहिती अवलोकन करण्याकरीता मागणी केली होती परंतू त्यांना अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती देण्यात आली. माहिती मध्ये कोणताही प्रश्न नाही तरी प्रश्नांची माहिती देता येत नाही असे उत्तर दिलेले आहे. जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीत असे सांगितले की सदरची माहिती त्यांना त्यांचे सहाय्यक श्री मिश्रा यांचेकडून प्राप्त झाल्यामुळे त्यांनी ती माहिती अपीलकर्त्यास दिलेली आहे. श्री मिश्रा यांचेकडे त्यांनी अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता अर्जावर आदेश दिलेले आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या निर्णयात नगर रचनाकार व त्यांचे सहाय्यक हे माहिती विलंबाने उपलब्ध करुन देण्याकरीता जबाबदार आहेत असा निष्कर्ष काढलेला आहे.

5. म्हणून याबाबत याचीकाकर्ते श्री मिश्रा यांनी आयोगापुढे सविस्तर लेखी निवेदन सादर केले. त्यांनी सुनावणीत असे सांगितले की जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याच्या माहितीच्या अर्जावर माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता कोणतेही आदेश दिलेले नाहीत. त्यांनी सुनावणीच्या वेळी अपीलकर्त्याचा माहितीचा अर्ज आयोगापुढे सादर केला. सदरच्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविण्याबाबत कोणतेही आदेश दिल्याचे दिसून येत नाही. तसेच श्री मिश्रा यांनी सुनावणीत असेही सांगितले की अपीलकर्त्याच्या माहितीच्या अर्जाच्या वेळी तत्कालीन नगर रचनाकार नगर परिषद गोंदिया श्री सी.एस.झाडे हे जन माहिती अधिकारी म्हणून कार्यरत होते. त्यांनी माहितीचा अर्ज केवळ मिश्रा यांचेकडे पाठविला. मात्र त्यावर माहिती देण्याच`कोणतेही

आदेश दिलेले नाहीत. तसेच माहितीच्या अधिकारान्वये माहिती ही जन माहिती अधिकारी यांच्या स्वाक्षरीने उपलब्ध करुन देणे आवश्यक असते. तसेच त्यांनी असेही सांगितले की दि. 1.12.2009 रोजी त्यांनी प्रस्तूत प्रकरणी अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी टिपणी सादर केली होती आणि त्यामध्ये जन माहिती अधिकारी यांनी दि. 2.12.2009 रोजी असे आदेश दिले की अतिक्रमण संबंधी दिलेल्या नोटिसीची छायांकीत प्रत देण्यात यावी व प्रश्नोत्तरास माहिती देता येत नाही असे जन माहिती अधिकारी यांनी आदेश दिलेले आहेत. म्हणून जन माहिती अधिकारी यांनी टिपणीवर दिलेल्या आदेशाप्रमाणे कार्यवाही केलेली आहे असे मिश्रा यांनी सुनावणीत सांगितले. म्हणून त्यांचे विरुध्द शास्तीची कार्यवाही करु नये असे त्यांनी नमुद केले. कारण जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्याचे कोणतेही आदेश माहितीच्या अर्जावर दिलेले नव्हते. तसेच टिपणीवर जन माहिती अधिकारी यांनी आदेश दिले की प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती देता येत नाही. अश कार्यवाही जन माहिती अधिकारी यांच्या आदेशावर केलेली आहे असे मिश्रा यांनी सुनावणीत सांगितले.

6. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार नगर परिषद गोंदिया श्री झाडे यांनी सुनावणीत असे नमुद केले की श्री मिश्रा यांना वेळोवेळी तोंडी आदेश त्यांनी देवूनही अपीलकर्त्यास श्री मिश्रा यांनी मुदतीत माहिती दिलेली नाही. त्यामुळे विलंबास श्री मिश्रा हे जबाबदार आहेत असे जन माहिती अधिकारी श्री झाडे यांनी सांगितले.

7. वास्तविक पाहता माहितीच्या अधिकारान्वये जन माहिती अधिकारी यांनी माहितीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्यावर त्याची तातडीने दखल घेवून मुदतीत माहिती अर्जदारास उपलब्ध करुन देण्याची प्राथमिक जबाबदारी जन माहिती अधिकारी यांची आहे. अपीलकर्त्याच्या माहिती मागण्याच्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्याचे कोणतेही आदेश दिलेले दिसून येत नाही. तसेच त्यानंतर प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती देता येत नाही असे अभिप्राय जन माहिती अधिकारी यांनी टिपणीवर नमुद केलेले दिसून येतात. म्हणून जन माहिती अधिकारी यांनी माहितीच्या अर्जातील माहिती त्वरीत उपलब्ध होण्यासाठी अपेक्षित कार्यवाही केलेली दिसून येत नाही. म्हणून अपीलकर्त्यास माहिती विलंबाने उपलब्ध झालेली आहे आणि त्यास तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार नगर परिषद गोंदिया श्री सी.एस.झाडे हे जबाबदार दिसून येतात. तसेच आजच्या सुनावणीस प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी नगर परिषद गोंदिया यांनी लेखी निवेदन सादर करुन अपीलकर्त्यास माहिती विलंबाने उपलब्ध करुन देण्याच्या कार्यवाहीस श्री झाडे तत्कालीन नगर रचनाकार हे जबाबदार दिसून येतात असा निष्कर्ष काढून लेखी निवेदन दिलेले आहे. तथापी आता विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास संपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिल्याचे सुनावणीत सांगितले.

8. अपीलकर्ता तसेच याचिकाकर्ते आणि तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री झाडे व इतर संबंधीत यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की

अपीलकर्त्यास विलंबाने माहिती उपलब्ध करुन देण्यास तत्कालीन नगर रचनाकार तथा जन माहिती अधिकारी श्री झाडे हे जबाबदार दिसून येतात. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्त्यास विलंबाने माहिती उपलब्ध करुन देण्याच्या कृतीस तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार श्री झाडे हे जबाबदार दिसून येतात. म्हणून त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या अधिनियमाच्या कलम 20 (2) अन्वये शिस्तभंगाच्या कार्यवाहीची शिफारस करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1584-1587

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 308 नाग/2010**

श्री विजयकुमार गोपालदास अग्रवाल
ओम राईस मिल कंपाउंड, फुलचूर रोड गोंदिया
ता. जि. गोंदिया ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी
नगर परिषद कार्यालय गोंदिया
ता. जि. गोंदिया
2) श्री झाडे
जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार
नगर परिषद कार्यालय गोंदिया
ता. जि. गोंदिया
3) श्री मुकेश राजेंद्र मिश्रा (नगर परिषद गोंदिया)
सिव्हील लाईन्स गोंदिया
ता. जि. गोंदिया ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 1.4.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 20.3.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी दि. 30.4.2010 रोजी घेण्यात येवून दि. 30.4.2010 रोजी निर्णय दिलेला होता. तथापी आयोगाच्या दि. 30.4.2010 च्या निर्णया विरुध्द श्री मुकेश राजेंद्र मिश्रा यांनी मा. उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर येथे याचिका क्र. 4743/2010 दाखल केलेली होती. सदरच्या याचिकेची मा. उच्च न्यायालयात सुनावणी होवून मा. उच्च न्यायालयाने आयोगाचे दि. 30.4.2010 चे आदेश रद्यबातल ठरविले आणि मा. उच्च न्यायालयाने प्रस्तूत अपीलाची पुन्हा नव्याने सुनावणी घेवून आणि संबंधीतांचे म्हणणे एकून घेवून निर्णय देण्याबाबत दि. 2.2.2011 रोजी आदेश दिलेले आहेत. मा. उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर यांचेकडील दि. 2.2.2011 च्या आदेशान्वये आयोगाने प्रस्तूत अपीलाची सुनावणी घेण्यासाठी सर्व संबंधीतांना आयोगाच्या कार्यालयात दि. 1.4.2011 रोजी बोलाविण्यात आले होते. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी तसेच याचिकाकर्ते हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 3.11.2009 रोजी जन माहिती अधिकारी मुख्याधिकारी कार्यालय नगर परिषद गोंदिया यांचेकडे त्यांनी माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन (अ) उपरोक्त विषय व कालावधी संदर्भित प्रकरण मे अब तक की गयी संपुर्ण कार्यवाही (यदि शासन निर्धारीत

अवधी मे न हुयी हो तो उव हेतु जनसेवको पर की गयी कार्यवाही सहीत) प्रदर्शित करने वाली समस्त सुचना कार्यालयीन टिपणी सह देवे

(ब) महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग शासन निर्णय क्र.कडोमपा–1006/प.क्र. 192/2006/नवि–28 मंत्रालय मुंबई दि. 2 मार्च 2009 के अवलोकन हेतु संधी प्रदान की जाय

(क) यदि मेरे आवदेन के प्श्चात प्राप्त अतीक्रमण विषय के किसी प्रकरण मे यदि कोई कार्यवाही हुयी हो तो वह प्रकरण दिखाया जाय अशी माहिती मागितलेली दिसून येते.

3. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना दि. 2.11.2009 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतू अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दि. 7.12.2009 रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दि. 21.12.2009 रोजी देण्यात आला असून त्यात असे नमुद केले आहे की, माहिती मुदतीत दिली नाही याउलट अपुरी माहिती व पत्र दिल्याचे दिसून येते. तसेच जन माहिती अधिकारी नगर परिषद गोंदिया यांनी दुर्लक्ष केल्याचे दिसून येते. अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती त्यांना योग्य प्रकारे मिळाली नाही त्यामुळे जन माहिती अधिकारी आणि त्यांचे अधिनस्थ असलेल्या कर्मचा–यानी कसूर केला आहे. म्हणून मागितलेली माहिती रेकॉर्डच्या स्वरुपात देण्यात यावी असा प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येतो व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना दि. 2.12.2009 रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. तथापी त्या माहिती बाबत समाधान झाले नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

4. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी मुद्या क्र. 1 मध्ये कार्यालयीन टिपणीची माहिती द्यावी असे मागितले होते. मुद्या क्र. 2 व 3 मध्ये माहिती अवलोकन करण्याकरीता मागणी केली होती परंतू त्यांना अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती देण्यात आली. माहिती मध्ये कोणताही प्रश्न नाही तरी प्रश्नांची माहिती देता येत नाही असे उत्तर दिलेले आहे. जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीत असे सांगितले की सदरची माहिती त्यांना त्यांचे सहाय्यक श्री मिश्रा यांचेकडून प्राप्त झाल्यामुळे त्यांनी ती माहिती अपीलकर्त्यास दिलेली आहे. श्री मिश्रा यांचेकडे त्यांनी अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता अर्जावर आदेश दिलेले आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या निर्णयात नगर रचनाकार व त्यांचे सहाय्यक हे माहिती विलंबाने उपलब्ध करुन देण्याकरीता जबाबदार आहेत असा निष्कर्ष काढलेला आहे.

5. म्हणून याबाबत याचीकाकर्ते श्री मिश्रा यांनी आयोगापुढे सविस्तर लेखी निवेदन सादर केले. त्यांनी सुनावणीत असे सांगितले की जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याच्या माहितीच्या अर्जावर माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता कोणतेही आदेश दिलेले नाहीत. त्यांनी सुनावणीच्या वेळी अपीलकर्त्याचा माहितीचा अर्ज आयोगापुढे सादर केला. सदरच्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविण्याबाबत कोणतेही आदेश दिल्याचे दिसून येत नाही. तसेच श्री मिश्रा यांनी सुनावणीत असेही सांगितले की अपीलकर्त्याच्या माहितीच्या अर्जाच्या वेळी तत्कालीन नगर रचनाकार नगर परिषद गोंदिया श्री सी.एस.झाडे हे जन माहिती अधिकारी म्हणून कार्यरत होते. त्यांनी

माहितीचा अर्ज केवळ मिश्रा यांचेकडे पाठविला. मात्र त्यावर माहिती देण्याच`कोणतेही आदेश दिलेले नाहीत. तसेच माहितीच्या अधिकारान्वये माहिती ही जन माहिती अधिकारी यांच्या स्वाक्षरीने उपलब्ध करुन देणे आवश्यक असते. तसेच त्यांनी असेही सांगितले की दि. 1.12.2009 रोजी त्यांनी प्रस्तूत प्रकरणी अपीलकर्त्यास माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी टिपणी सादर केली होती आणि त्यामध्ये जन माहिती अधिकारी यांनी दि. 2.12.2009 रोजी असे आदेश दिले की अतिक्रमण संबंधी दिलेल्या नोटिसीची छायांकीत प्रत देण्यात यावी व प्रश्नोत्तरास माहिती देता येत नाही असे जन माहिती अधिकारी यांनी आदेश दिलेले आहेत. म्हणून जन माहिती अधिकारी यांनी टिपणीवर दिलेल्या आदेशाप्रमाणे कार्यवाही केलेली आहे असे मिश्रा यांनी सुनावणीत सांगितले. म्हणून त्यांचे विरुध्द शास्तीची कार्यवाही करु नये असे त्यांनी नमुद केले. कारण जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्याचे कोणतेही आदेश माहितीच्या अर्जावर दिलेले नव्हते. तसेच टिपणीवर जन माहिती अधिकारी यांनी आदेश दिले की प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती देता येत नाही. अश कार्यवाही जन माहिती अधिकारी यांच्या आदेशावर केलेली आहे असे मिश्रा यांनी सुनावणीत सांगितले.

6. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार नगर परिषद गोंदिया श्री झाडे यांनी सुनावणीत असे नमुद केले की श्री मिश्रा यांना वेळोवेळी तोंडी आदेश त्यांनी देवूनही अपीलकर्त्यास श्री मिश्रा यांनी मुदतीत माहिती दिलेली नाही. त्यामुळे विलंबास श्री मिश्रा हे जबाबदार आहेत असे जन माहिती अधिकारी श्री झाडे यांनी सांगितले.

7. वास्तविक पाहता माहितीच्या अधिकारान्वये जन माहिती अधिकारी यांनी माहितीचा अर्ज प्राप्त झाल्यानंतर त्यावर त्याची तातडीने दखल घेवून मुदतीत माहिती अर्जदारास उपलब्ध करुन देण्याची प्राथमिक जबाबदारी जन माहिती अधिकारी यांची आहे. अपीलकर्त्याच्या माहिती मागण्याच्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्याचे कोणतेही आदेश दिलेले दिसून येत नाही. तसेच त्यानंतर प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती देता येत नाही असे अभिप्राय जन माहिती अधिकारी यांनी टिपणीवर नमुद केलेले दिसून येतात. म्हणून जन माहिती अधिकारी यांनी माहितीच्या अर्जातील माहिती त्वरीत उपलब्ध होण्यासाठी अपेक्षित कार्यवाही केलेली दिसून येत नाही. म्हणून अपीलकर्त्यास माहिती विलंबाने उपलब्ध झालेली आहे आणि त्यास तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार नगर परिषद गोंदिया श्री सी.एस.झाडे हे जबाबदार दिसून येतात. तसेच आजच्या सुनावणीस प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी नगर परिषद गोंदिया यांनी लेखी निवेदन सादर करुन अपीलकर्त्यास माहिती विलंबाने उपलब्ध करुन देण्याच्या कार्यवाहीस श्री झाडे तत्कालीन नगर रचनाकार हे जबाबदार दिसून येतात असा निष्कर्ष काढून लेखी निवेदन दिलेले आहे. तथापी आता विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास संपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिल्याचे सुनावणीत सांगितले.

8. अपीलकर्ता तसेच याचिकाकर्ते आणि तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री झाडे व इतर संबंधीत यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की

अपीलकर्त्यास विलंबाने माहिती उपलब्ध करुन देण्यास तत्कालीन नगर रचनाकार तथा जन माहिती अधिकारी श्री झाडे हे जबाबदार दिसून येतात. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून अपीलकर्त्यास विलंबाने माहिती उपलब्ध करुन देण्याच्या कृतीस तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नगर रचनाकार श्री झाडे हे जबाबदार दिसून येतात. म्हणून त्यांचे विरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या अधिनियमाच्या कलम 20 (2) अन्वये शिस्तभंगाच्या कार्यवाहीची शिफारस करण्यात येते.
2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1581-1584

जा.क्र.————————— दि..................
मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1733 नाग/2010**

श्री उमाशंकर पी. नामदेव
07, के.के.प्लाझा, रामदासपेठ, नागपूर
ता. जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री एन. पी. टोनगावकर
प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता
सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.3, सिव्हील लाईन, नागपूर
ता. जि. नागपूर

2) श्री एस. एस. मुजूमदार
जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता
सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.3, सिव्हील लाईन, नागपूर
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 28.3.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 26.10.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 18.2.2011 रोजी नोटीस काढून दि. 28.3.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. मात्र उत्तरवादी हजर आहेत. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे त्यांचे प्रस्तूत प्रकरणी कोणतेही म्हणणे एकून घेता आलेले नाही.

2. मात्र आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग क्र.3, नागपूर श्री एस. एस. मुजूमदार हे उपस्थित आहेत. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता श्री टोनगावकर हे उपस्थित आहेत.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी यांनी आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा माहिती मागण्याचा दि. 26.10.2010 चा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे दि. 27.10.2010 रोजी प्राप्त झाला. त्यामध्ये त्यांनी मुद्या क्र.1 बांधकाम विभाग क्र.3 मध्ये सन

2009–2010 या वर्षात किती निवीदा निघाल्या त्याच्या प्रमाणित प्रती मागितल्या तसेच मुद्या क्र.2 मध्ये प्रथमतः निगरानी निवीदा कोणत्या कंत्राटदारांना देण्यात आल्या ही माहिती मागितलेली होती. त्यानुसार अपीलकर्त्यास दि. 1.11.2010 रोजी पत्र पाठविले आणि त्यामध्ये मुद्या क्र.1 च्या माहितीची फी रु. 60/– भरण्याबाबत कळविले. आणि मुद्या क्र.2 निगरानी निवीदा बाबत निश्चित स्वरुपात बोध होत नसल्यामुळे दि. 15.11. 2010 ला कार्यालयात उपस्थित राहून निश्चित स्वरुपात कोणती माहिती पाहिजे याबाबत त्यांना विचारणा करण्यात आली. त्यानुसार अपीलकर्त्याने मुद्या क्र.1 च्या माहितीचे शुल्क रु. 60/– दि. 16.11.2010 रोजी भरणा केले आणि ती माहिती दि. 19. 11.2010 रोजी अपीलकर्त्यास उपलब्ध करुन दिली. तसेच मुद्या क्र.2 च्या माहिती बाबत निगरानी निवीदा अशा निवीदा नसतात याची कल्पना अपीलकर्त्यास दिली. त्यावेळी दि. 16.11.2010 रोजी अपीलकर्त्याने मुद्या क्र.2 च्या बाबत संदिग्धता दूर करुन निगरानी निवीदा ऐवजी कार्यारंभी आदेश (work order) याच्या प्रती मागितल्या. त्यानुसार त्याच्या प्रती तयार केल्या. त्या प्रती एकूण 321 होत्या. परंतू 321 प्रतीचे रु. 2/– प्रमाणे शुल्क रु. 642/– भरण्याबाबत अपीलकर्त्यास दि. 22.11.2010 रोजी रजिस्टर पोस्टाने पत्र पाठविले. मात्र अपीलकर्त्याने मुद्या क्र.2 च्या माहितीचे शुल्क भरले नाही म्हणून त्यांना मुद्या क्र.2 ची माहिती उपलब्ध करुन देता आली नाही. त्यानंतर अपीलकर्त्याने प्रथम अपील कार्यकारी अभियंता यांचेकडे दाखल केले. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाची सुनावणी घेतली. आणि दि. 22.12.2010 रोजी अपीलाचा निर्णय देवून त्यामध्ये असे यांनी नमूद केले की अपीलकर्त्याने दि. 22.10.2010 च्या पत्रा नुसार कळविल्याप्रमाणे माहितीचे शुल्क भरणा करावे आणि माहितीचे शुल्क भरणा केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास मुद्या क्र.2 ची माहिती उपलब्ध करुन द्यावी.

4. जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की जन माहिती अधिकारी यांनी अपीलकत्यास मुद्या क्र.1 ची माहिती माहितीचे शुल्क भरल्यानंतर दि. 19.11.2010 रोजी उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. तसेच याबाबत प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दि. 22.12.2010 रोजी प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येतो. आणि त्यामध्ये अपीलकर्त्याने जन माहिती अधिकारी यांनी दि. 22.11.2010 च्या पत्राने कळविल्याप्रमाणे माहितीचे शुल्क रु. 642/– भरणा करुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी असा निर्णय दिलेला आहे. सदरच्या माहितीचे शुल्क भरण्या बाबतचे पत्र जन माहिती अधिकारी यांनी अपीलकत्यास विहित मुदतीत पाठविलेले असल्यामुळे प्रथम अपीलाच्या निर्णयात बदल करण्याची आवश्यकता दिसून येत नाही. म्हणून खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांनी जन माहिती अधिकारी यांचेकडे दि. 22.11.2010 च्या पत्राने कळविल्याप्रमाणे माहितीचे शुल्क रु. 642/— भरणा करुन माहिती प्राप्त करुन घ्यावी आणि जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्याने माहितीचे शुल्क भरल्यानंतर त्वरीत माहिती उपलब्ध करुन द्यावी.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1591-1593

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

## राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 1731 नाग/2010

श्री मनोज मदनलाल पटेल
तेलीपुरा, सिताबर्डी वार्ड क्र. 80, घर नं.536
इलेक्ट्रॉनिक्स मार्केट, नागपूर
ता. जि. नागपूर ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त
परिमंडळ क्र.3 नागपूर
ता. जि. नागपूर

2) जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक
पोलीस स्टेशन लकडगंज
ता. जि. नागपूर ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 28.3.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 23.12.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 18.2.2011 रोजी नोटीस काढून दि. 28.3.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता हे स्वतः हजर होते. त्यांनी आयोगापुढ असे सांगितले की त्यांनी दि. 20.2.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन लकडगंज नागपूर यांचेकडे त्यांनी माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन लकडगंज पोलीस स्टेशन येथे NC No 162/09 (दिवाणी स्वरुपाची) मुळ F.I.R. गुन्हयाची सत्यप्रत तसेच फिर्यादीचे बयाणाची सत्यप्रत मागितलेली होती. परंतू त्यांना कोणतीही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपील दाखल केल्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा सहा. पोलीस आयुक्त लकडगंज डॉ. सूर्यभान इंगळे हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त श्री जाधव हे उपस्थित होते.

4. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त लकडगंज यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणून दिले की अपीलकर्त्याचा दि. 20.2.2010 चा माहितीचा अर्ज त्यांचेकडे प्राप्त झाला नाही. सदरचा अर्ज पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन लकडगंज यांचेकडे केलेला होता. म्हणून पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन लकडगंज यांनी अपीलकर्त्यास दि. 4.3.2010 च्या पत्राने कळविले की पोलीस स्टेशन लकडगंज हे सहाय्यक पोलीस आयुक्त लकडगंज विभागात असून मा. सहाय्यक पोलीस आयुक्त लकडगंज विभाग नागपूर हे माहिती अधिकारी आहेत तरी आपण त्यांचेकडे अर्ज सादर करावा. तथापी अपीलकर्त्याने त्यांचेकडे माहितीचा अर्ज सादर न करता प्रथम अपील पोलीस उपायुक्त यांचेकडे दाखल केले. पोलीस उपआयुक्त परिमंडळ क्र.3 नागपूर शहर यांनी अपीलकर्त्यास दि. 20.10.2010 च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे अपीलकर्त्याने सुनावणीत आयोगा पुढे मान्य केले. मात्र अपीलकर्त्याचे असे म्हणणे आहे की पोलीसांकडे जो F.I.R. दाखल झालेला आहे त्याप्रमाणे पोलीसांनी त्यांच्या अपेक्षेप्रमाणे कार्यवाही केलेली नाही. यावर जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगा पुढे असे असे सांगितले की अपीलकर्त्याने केलेला अर्ज हा अदखलपात्र NC आहे. तसेच सदरची बाब ही दिवाणी स्वरुपाची आहे.

5. अपीलकर्ता तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उपआयुक्त परिमंडळ क्र.3 नागपूर यांनी अपीलकर्त्यास दि. 20.10.2010 च्या पत्राने आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.

**आ दे श**

1) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

2) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

( पी. डब्ल्यु. पाटील )
राज्य माहिती आयुक्त,
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**नागपूर**
Ageyord6.1585-1587

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

उपसचिव
राज्य माहिती आयोग,
खंडपीठ नागपूर.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 17 नाग/2011**

श्री रविशंकर दयानंद राठोर
प्लॉट नं. के–1, अजय नगर, अंबाझरी, नागपूर
ता. जि. नागपूर –440010 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री बढीये
प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी,
प्रादेशिक परिवहन कार्यालय नागपूर(शहर)
गिरीपेठ अमरावती रोड नागपूर

2) श्री पुरोहीत
जन माहिती अधिकारी तथा सहा प्रादेशिक परिवहन अधिकारी,
प्रादेशिक परिवहन कार्यालय नागपूर(शहर)
गिरीपेठ अमरावती रोड नागपूर

3) जन माहिती अधिकारी तथा उप परिवहन आयुक्त
परिवहन आयुक्त कार्यालय, प्रशासकिय इमारत, 4 व 4 था मजला,
डॉ. आंबेडकर उद्यानजवळ, शासकीय कॉलनी,
बांद्रा(पूर्व) मुंबई –4400051 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 29.3.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 30.12.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 8.2.2011 रोजी नोटीस काढून दि. 29.3.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांच्या वतीने ॲड. श्री तुषार मंडलेकर हे उपस्थित होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 2.7.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा सहा प्रादेशिक परिवहन अधिकारी, प्रादेशिक परिवहन कार्यालय

नागपूर(शहर) नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन मोटार वाहन विभागामध्ये मोटार वाहनाच्या नोंदणी प्रमाणपत्राकरीता ऑफीसीअल स्मार्ट कार्डचा वापर करण्याच्या संदर्भात फॉर्म नं. 23–अे व 23–बी बाबत 1 ते 6 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. त्याला अनुसरुन जन माहिती अधिकारी तथा सहा प्रादेशिक परिवहन अधिकारी, नागपूर(शहर) यांनी त्यांना दि. 5.8.2010 च्या पत्राने 1 ते 6 मुद्यांची माहिती उपलब्ध करुन दिली. तथापी त्यांना मुद्या क्र. 2,3,4 ची माहिती मिळाली. मात्र मुद्या क्र. 1,5,6 बाबत त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही. म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. तथापी प्रथम अपील दाखल केल्यानंतरही त्यांना मुद्या क्र. 1,5,6 ची माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले. तसेच अपीलकर्ता यांच्या वकीलांनी आयोगापुढे सुनावणीत असेही सांगितले की मोटार वाहन विभागामध्ये मोटार वाहनाच्या नोंदणी प्रमाणपत्राकरीता ऑफीसीअल स्मार्ट कार्डचा वापर करण्याबाबत रु.150/– ची फी ग्राहकांना स्मार्ट कार्ड ऑपरेटरला देण्यात येत असते. सदरची रु.150/– ची फी ग्राहकांना स्मार्ट कार्ड ऑपरेटरला करारानुसार देण्याबाबतचा करार झाला असला तरी त्या कराराची प्रत त्यांना मिळणे आवश्यक आहे. तसेच मुद्या क्र. 1 बाबत त्यांचे वाहन क्र. एम एच 31–सी वाय–9006 च्या संदर्भात फॉर्म नं. 23–बी ची संगणकावर उपलब्ध असलेली प्रत त्यांना देण्यात यावी असे अपीलकर्ता यांच्या वकीलांनी सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा सहा प्रादेशिक परिवहन अधिकारी, नागपूर श्री पुरोहीत हे उपस्थित होते. तसेच जन माहिती अधिकारी परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई यांच्या वतीने श्री लांडे प्रादेशिक परिवहन अधिकारी, नागपूर हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, प्रादेशिक परिवहन कार्यालय नागपूर(शहर) श्री बढीये हे उपस्थित होते. जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीत आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 2.7.2010 चा माहिती मागण्याचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. त्या अर्जाला अनुसरुन अपीलकर्त्यास दि. 5.8.2010 रोजी शुल्क भरण्याबाबत कळविले होते आणि त्याच बरोबर दि. 5.8.2010 रोजी त्यांचे कार्यालयात जी माहिती उपलब्ध होती ती माहीती देखील अपीलकर्त्यास पाठविण्यात आली. त्यानंतर अपीलकर्त्याने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि. 18.8.2010 रोजी विहित शुल्क जमा केले आणि त्यानंतर पुन्हा अपीलकर्त्यास दि. 27.8.2010 रोजी माहिती उपलब्ध करुन देण्यात आली असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सुनावणीत नमुद केले.

4. तथापी सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे अपीलकर्ता यांच्या वकीलांनी सुनावणीत मान्य केले. मात्र मुद्दा क्र. 1,5,6 ची माहिती अपेक्षे प्रमाणे उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. याबाबत प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत असे नमुद केले की अपीलकर्त्याचे प्रथम अपील त्यांच्याकडे दि. 8.9.2010 रोजी दाखल केले होते. त्याची सुनावणी घेण्यात आली व सुनावणी घेवून अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी माहिती प्राप्त करुन दिली असल्यामुळे अपील अर्ज निकाली काढला आणि मुद्दा क्र. 5 व 6 बाबतची माहिती अपीलकर्त्यास पुरविण्यासाठी सदरचा अर्ज परिवहन आयुक्त मुंबई यांचेकडे वर्ग करण्यात आला. तथापी जन माहिती अधिकारी परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई यांनी आयोगापुढे लेखी खुलासा सादर केलेला असून त्यामध्ये असे नमुद केले की अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यामुळे अपीलकर्त्याचे अपील फेटाळण्यात यावे असा लेखी खुलासा त्यांनी आयोगापुढे सादर केलेला आहे.

5. अपीलकर्ता यांचे वकील श्री तुषार मंडलेकर तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याच्या माहिती अधिकारा खालील अर्जाला अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 5.8.2010 च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. मात्र मुद्दा क्र. 1,5,6 बाबत पूर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही. म्हणून मुद्दा क्र. 1 बाबत अपीलकर्त्यास त्यांचे वाहन क्र. एम एच 31–सी वाय–9006 च्या संदर्भात फॉर्म नं. 23–बी च्या माहितीची संगणकावर उपलब्ध असलेली प्रिंटची प्रत देणे संयुक्तिक होईल. तसेच मुद्दा क्र. 5 व 6 बाबत मोटार वाहनाच्या नोंदणी प्रमाणपत्राकरीता ऑफीसीअल स्मार्ट कार्डच्या स्वरुपात देण्याचे काम विहित केलेल्या अटी व शर्तीच्या करारनाम्याची प्रत व्यापक जनहिताच्या दृष्टीकोनातून अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना मुद्दा क्र. 1 बाबतची माहिती त्यांचे कार्यालयात संगणकावर वर नमुद केल्याप्रमाणे फॉर्म नं. 23–बी च्या प्रिंटची प्रत विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

2) त्याचप्रमाणे मुद्दा क्र. 5 व 6 बाबत मोटार वाहनाच्या नोंदणी प्रमाणपत्राकरीता ऑफीसीअल स्मार्ट कार्डच्या स्वरुपात देण्याचे काम विहित केलेल्या अटी व शर्तीच्या करारनाम्याची प्रत जन माहिती अधिकारी यांनी परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई यांचेकडून प्राप्त करुन घेवून विनामुल्य अपीलकर्ता यांना पुरवावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1587-1590

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 18 नाग/2011**

श्रीमती विजया अनिल पत्की
604–अ, एनआयटी कॉम्प्लेक्स, हिल रोड, गांधीनगर, नागपूर
ता. जि. नागपूर –440010 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री बढीये
प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी,
प्रादेशिक परिवहन कार्यालय नागपूर(शहर)
गिरीपेठ अमरावती रोड नागपूर

2) श्री पुरोहीत
जन माहिती अधिकारी तथा सहा प्रादेशिक परिवहन अधिकारी,
प्रादेशिक परिवहन कार्यालय नागपूर(शहर)
गिरीपेठ अमरावती रोड नागपूर

3) जन माहिती अधिकारी तथा उप परिवहन आयुक्त
परिवहन आयुक्त कार्यालय, प्रशासकिय इमारत, 4 व 4 था मजला,
डॉ. आंबेडकर उद्यानजवळ, शासकीय कॉलनी,
बांद्रा(पूर्व) मुंबई –4400051 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 29.3.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 30.12.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 8.2.2011 रोजी नोटीस काढून दि. 29.3.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांच्या वतीने ॲड. श्री तुषार मंडलेकर हे उपस्थित होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 8.7.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा सहा प्रादेशिक परिवहन अधिकारी, प्रादेशिक परिवहन कार्यालय

नागपूर(शहर) नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन मोटार वाहन विभागामध्ये मोटार वाहनाच्या नोंदणी प्रमाणपत्राकरीता ऑफीसीअल स्मार्ट कार्डचा वापर करण्याच्या संदर्भात फॉर्म नं. 23–अे व 23–बी बाबत 1 ते 6 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. त्याला अनुसरुन जन माहिती अधिकारी तथा सहा प्रादेशिक परिवहन अधिकारी, नागपूर(शहर) यांनी त्यांना दि. 5.8.2010 च्या पत्राने 1 ते 6 मुद्यांची माहिती उपलब्ध करुन दिली. तथापी त्यांना मुद्या क्र. 2,3,4 ची माहिती मिळाली. मात्र मुद्या क्र. 1,5,6 बाबत त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही. म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. तथापी प्रथम अपील दाखल केल्यानंतरही त्यांना मुद्या क्र. 1,5,6 ची माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले. तसेच अपीलकर्ता यांच्या वकीलांनी आयोगापुढे सुनावणीत असेही सांगितले की मोटार वाहन विभागामध्ये मोटार वाहनाच्या नोंदणी प्रमाणपत्राकरीता ऑफीसीअल स्मार्ट कार्डचा वापर करण्याबाबत रु.150/– ची फी ग्राहकांना स्मार्ट कार्ड ऑपरेटरला देण्यात येत असते. सदरची रु.150/– ची फी ग्राहकांना स्मार्ट कार्ड ऑपरेटरला करारानुसार देण्याबाबतचा करार झाला असला तरी त्या कराराची प्रत त्यांना मिळणे आवश्यक आहे. तसेच मुद्या क्र. 1 बाबत त्यांचे वाहन क्र. एम एच 31–सी डब्ल्यु–7279 च्या संदर्भात फॉर्म नं. 23–बी ची संगणकावर उपलब्ध असलेली प्रत त्यांना देण्यात यावी असे अपीलकर्ता यांच्या वकीलांनी सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा सहा प्रादेशिक परिवहन अधिकारी, नागपूर श्री पुरोहीत हे उपस्थित होते. तसेच जन माहिती अधिकारी परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई यांच्या वतीने श्री लांडे प्रादेशिक परिवहन अधिकारी, नागपूर हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, प्रादेशिक परिवहन कार्यालय नागपूर(शहर) श्री बढीये हे उपस्थित होते. जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीत आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 8.7.2010 चा माहिती मागण्याचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. त्या अर्जाला अनुसरुन अपीलकर्त्यास दि. 5.8.2010 रोजी शुल्क भरण्याबाबत कळविले होते आणि त्याच बरोबर दि. 5.8.2010 रोजी त्यांचे कार्यालयात जी माहिती उपलब्ध होती ती माहीती देखील अपीलकर्त्यास पाठविण्यात आली. त्यानंतर अपीलकर्त्याने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि. 18.8.2010 रोजी विहित शुल्क जमा केले आणि त्यानंतर पुन्हा अपीलकर्त्यास दि. 27.8.2010 रोजी माहिती उपलब्ध करुन देण्यात आली असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सुनावणीत नमुद केले.

4. तथापी सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे अपीलकर्ता यांच्या वकीलांनी सुनावणीत मान्य केले. मात्र मुद्या क्र. 1,5,6 ची माहिती अपेक्षे प्रमाणे उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. याबाबत प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत असे नमुद केले की अपीलकर्त्याचे प्रथम अपील त्यांच्याकडे दि. 8.9.2010 रोजी दाखल केले होते. त्याची सुनावणी घेण्यात आली व सुनावणी घेवून अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी माहिती प्राप्त करुन दिली असल्यामुळे अपील अर्ज निकाली काढला आणि मुद्या क्र. 5 व 6 बाबतची माहिती अपीलकर्त्यास पुरविण्यासाठी सदरचा अर्ज परिवहन आयुक्त मुंबई यांचेकडे वर्ग करण्यात आला. तथापी जन माहिती अधिकारी परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई यांनी आयोगापुढे लेखी खुलासा सादर केलेला असून त्यामध्ये असे नमुद केले की अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यामुळे अपीलकर्त्याचे द्वितीय अपील फेटाळण्यात यावे असा लेखी खुलासा त्यांनी आयोगापुढे सादर केलेला आहे.

5. अपीलकर्ता यांचे वकील श्री तुषार मंडलेकर तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याच्या माहिती अधिकारा खालील अर्जाला अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 5.8.2010 च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. मात्र मुद्या क्र. 1,5,6 बाबत पूर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही. म्हणून मुद्या क्र. 1 बाबत अपीलकर्त्यास त्यांचे वाहन क्र. एम एच 31–सी डब्ल्यु–7279 च्या संदर्भात फॉर्म नं. 23–बी च्या माहितीची संगणकावर उपलब्ध असलेली प्रिंटची प्रत देणे संयुक्तिक होईल. तसेच मुद्या क्र. 5 व 6 बाबत मोटार वाहनाच्या नोंदणी प्रमाणपत्राकरीता ऑफीसीअल स्मार्ट कार्डच्या स्वरुपात देण्याचे काम विहित केलेल्या अटी व शर्तीच्या करारनाम्याची प्रत व्यापक जनहिताच्या दृष्टीकोनातून अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना मुद्या क्र. 1 बाबतची माहिती त्यांचे कार्यालयात संगणकावर नमुद केल्याप्रमाणे फॉर्म नं. 23–बी च्या प्रिंटची प्रत विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

2) त्याचप्रमाणे मुद्दा क्र. 5 व 6 बाबत मोटार वाहनाच्या नोंदणी प्रमाणपत्राकरीता ऑफीसीअल स्मार्ट कार्डच्या स्वरुपात देण्याचे काम विहित केलेल्या अटी व शर्तीच्या करारनाम्याची प्रत जन माहिती अधिकारी यांनी परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई यांचेकडून प्राप्त करुन घेवून विनामुल्य अपीलकर्ता यांना पुरवावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1592-1595

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 19 नाग/2011**

श्री तुषार धनंजय मंडलेकर
एल 37, यशवंत नगर, नॉर्थ अंबाझरी रोड, नागपूर
ता. जि. नागपूर –440010 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री बढीये
प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी,
प्रादेशिक परिवहन कार्यालय नागपूर(शहर)
गिरीपेठ अमरावती रोड नागपूर

2) श्री पुरोहीत
जन माहिती अधिकारी तथा सहा प्रादेशिक परिवहन अधिकारी,
प्रादेशिक परिवहन कार्यालय नागपूर(शहर)
गिरीपेठ अमरावती रोड नागपूर

3) जन माहिती अधिकारी तथा उप परिवहन आयुक्त
परिवहन आयुक्त कार्यालय, प्रशासकिय इमारत, 4 व 4 था मजला,
डॉ. आंबेडकर उद्यानजवळ, शासकीय कॉलनी,
बांद्रा(पूर्व) मुंबई –4400051 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 29.3.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 30.12.2010 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 8.2.2011 रोजी नोटीस काढून दि. 29.3.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांच्या वतीने ॲड. श्री तुषार मंडलेकर हे उपस्थित होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 6.7.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा सहा प्रादेशिक परिवहन अधिकारी, प्रादेशिक परिवहन कार्यालय

नागपूर(शहर) नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन मोटार वाहन विभागामध्ये मोटार वाहनाच्या नोंदणी प्रमाणपत्राकरीता ऑफीसीअल स्मार्ट कार्डचा वापर करण्याच्या संदर्भात फॉर्म नं. 23–अे व 23–बी बाबत 1 ते 6 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. त्याला अनुसरुन जन माहिती अधिकारी तथा सहा प्रादेशिक परिवहन अधिकारी, नागपूर(शहर) यांनी त्यांना दि. 5.8.2010 च्या पत्राने 1 ते 6 मुद्यांची माहिती उपलब्ध करुन दिली. तथापी त्यांना मुद्या क्र. 2,3,4 ची माहिती मिळाली. मात्र मुद्या क्र. 1,5,6 बाबत त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही. म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. तथापी प्रथम अपील दाखल केल्यानंतरही त्यांना मुद्या क्र. 1,5,6 ची माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले. तसेच अपीलकर्ता यांच्या वकीलांनी आयोगापुढे सुनावणीत असेही सांगितले की मोटार वाहन विभागामध्ये मोटार वाहनाच्या नोंदणी प्रमाणपत्राकरीता ऑफीसीअल स्मार्ट कार्डचा वापर करण्याबाबत रु.150/– ची फी ग्राहकांना स्मार्ट कार्ड ऑपरेटरला देण्यात येत असते. सदरची रु.150/– ची फी ग्राहकांना स्मार्ट कार्ड ऑपरेटरला करारानुसार देण्याबाबतचा करार झाला असला तरी त्या कराराची प्रत त्यांना मिळणे आवश्यक आहे. तसेच मुद्या क्र. 1 बाबत त्यांचे वाहन क्र. एम एच 31–सी डब्ल्यु–4393 च्या संदर्भात फॉर्म नं. 23–बी ची संगणकावर उपलब्ध असलेली प्रत त्यांना देण्यात यावी असे अपीलकर्ता यांच्या वकीलांनी सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा सहा प्रादेशिक परिवहन अधिकारी, नागपूर श्री पुरोहीत हे उपस्थित होते. तसेच जन माहिती अधिकारी परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई यांच्या वतीने श्री लांडे प्रादेशिक परिवहन अधिकारी, नागपूर हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, प्रादेशिक परिवहन कार्यालय नागपूर(शहर) श्री बढीये हे उपस्थित होते. जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीत आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 6.7.2010 चा माहिती मागण्याचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. त्या अर्जाला अनुसरुन अपीलकर्त्यास दि. 5.8.2010 रोजी शुल्क भरण्याबाबत कळविले होते आणि त्याच बरोबर दि. 5.8.2010 रोजी त्यांचे कार्यालयात जी माहिती उपलब्ध होती ती माहीती देखील अपीलकर्त्यास पाठविण्यात आली. त्यानंतर अपीलकर्त्याने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि. 18.8.2010 रोजी विहित शुल्क जमा केले आणि त्यानंतर पुन्हा अपीलकर्त्यास दि. 27.8.2010 रोजी माहिती उपलब्ध करुन देण्यात आली असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सुनावणीत नमुद केले.

4. तथापी सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे अपीलकर्ता यांच्या वकीलांनी सुनावणीत मान्य केले. मात्र मुद्या क्र. 1,5,6 ची माहिती अपेक्षे प्रमाणे उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. याबाबत प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत असे नमुद केले की अपीलकर्त्याचे प्रथम अपील त्यांच्याकडे दि. 8.9.2010 रोजी दाखल केले होते. त्याची सुनावणी घेण्यात आली व सुनावणी घेवून अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी माहिती प्राप्त करुन दिली असल्यामुळे अपील अर्ज निकाली काढला आणि मुद्या क्र. 5 व 6 बाबतची माहिती अपीलकर्त्यास पुरविण्यासाठी सदरचा अर्ज परिवहन आयुक्त मुंबई यांचेकडे वर्ग करण्यात आला. तथापी जन माहिती अधिकारी परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई यांनी आयोगापुढे लेखी खुलासा सादर केलेला असून त्यामध्ये असे नमुद केले की अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यामुळे अपीलकर्त्याचे द्वितीय अपील फेटाळण्यात यावे असा लेखी खुलासा त्यांनी आयोगापुढे सादर केलेला आहे.

5. अपीलकर्ता यांचे वकील श्री तुषार मंडलेकर तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याच्या माहिती अधिकारा खालील अर्जाला अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 5.8.2010 च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. मात्र मुद्या क्र. 1,5,6 बाबत पूर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही. म्हणून मुद्या क्र. 1 बाबत अपीलकर्त्यास त्यांचे वाहन क्र. एम एच 31–सी डब्ल्यु–4393 च्या संदर्भात फॉर्म नं. 23–बी च्या माहितीची संगणकावर उपलब्ध असलेली प्रिंटची प्रत देणे संयुक्तिक होईल. तसेच मुद्या क्र. 5 व 6 बाबत मोटार वाहनाच्या नोंदणी प्रमाणपत्राकरीता ऑफीसीअल स्मार्ट कार्डच्या स्वरुपात देण्याचे काम विहित केलेल्या अटी व शर्तीच्या करारनाम्याची प्रत व्यापक जनहिताच्या दृष्टीकोनातून अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना मुद्या क्र. 1 बाबतची माहिती त्यांचे कार्यालयात संगणकावर नमुद केल्याप्रमाणे फॉर्म नं. 23–बी च्या प्रिंटची प्रत विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

2) त्याचप्रमाणे मुद्या क्र. 5 व 6 बाबत मोटार वाहनाच्या नोंदणी प्रमाणपत्राकरीता ऑफीसीअल स्मार्ट कार्डच्या स्वरुपात देण्याचे काम विहित केलेल्या अटी व शर्तीच्या करारनाम्याची प्रत जन माहिती अधिकारी यांनी परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई यांचेकडून प्राप्त करुन घेवून विनामुल्य अपीलकर्ता यांना पुरवावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1597-1600

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम 2005 चे कलम 19 (3) प्रमाणे अपील क्रमांक 211 नाग/2011**

श्री रविन्द्रसिंग इश्वरसिंग बडेल
प्लॉट नं. 162, गोकुळपेठ, नागपूर
ता. जि. नागपूर –440010 ..... **अपिलकर्ता**

**विरुध्द**

1) श्री बढीये
प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी,
प्रादेशिक परिवहन कार्यालय नागपूर(शहर)
गिरीपेठ अमरावती रोड नागपूर

2) श्री पुरोहीत
जन माहिती अधिकारी तथा सहा प्रादेशिक परिवहन अधिकारी,
प्रादेशिक परिवहन कार्यालय नागपूर(शहर)
गिरीपेठ अमरावती रोड नागपूर

3) जन माहिती अधिकारी तथा उप परिवहन आयुक्त
परिवहन आयुक्त कार्यालय, प्रशासकिय इमारत, 4 व 4 था मजला,
डॉ. आंबेडकर उद्यानजवळ, शासकीय कॉलनी,
बांद्रा(पूर्व) मुंबई –4400051 ..... **उत्तरवादी**

**( आदेश पारित दिनांक 29.3.2011 )**

**नि र्ण य**

अपीलकर्ता यांनी दिनांक 2.2.2011 रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम 2005 च्या कलम 19 (3) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दि. 8.2.2011 रोजी नोटीस काढून दि. 29.3.2011 रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहण्याबाबत यु.पी.सी.ने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज घेण्यात आली. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता व उत्तरवादी हजर आहेत.

2. आजच्या सुनावणीस अपीलकर्ता यांच्या वतीने ॲड. श्री तुषार मंडलेकर हे उपस्थित होते. त्यांनी आयोगापुढे असे सांगितले की त्यांनी दि. 6.7.2010 रोजी जन माहिती अधिकारी तथा सहा प्रादेशिक परिवहन अधिकारी, प्रादेशिक परिवहन कार्यालय

नागपूर(शहर) नागपूर यांचेकडे माहितीच्या अधिकारा खाली अर्ज सादर करुन मोटार वाहन विभागामध्ये मोटार वाहनाच्या नोंदणी प्रमाणपत्राकरीता ऑफीसीअल स्मार्ट कार्डचा वापर करण्याच्या संदर्भात फॉर्म नं. 23–अे व 23–बी बाबत 1 ते 6 मुद्यांवर माहिती मागितलेली होती. त्याला अनुसरुन जन माहिती अधिकारी तथा सहा प्रादेशिक परिवहन अधिकारी, नागपूर(शहर) यांनी त्यांना दि. 5.8.2010 च्या पत्राने 1 ते 6 मुद्यांची माहिती उपलब्ध करुन दिली. तथापी त्यांना मुद्या क्र. 2,3,4 ची माहिती मिळाली. मात्र मुद्या क्र. 1,5,6 बाबत त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही. म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. तथापी प्रथम अपील दाखल केल्यानंतरही त्यांना मुद्या क्र. 1,5,6 ची माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केल्याचे सुनावणीत नमुद केले. तसेच अपीलकर्ता यांच्या वकीलांनी आयोगापुढे सुनावणीत असेही सांगितले की मोटार वाहन विभागामध्ये मोटार वाहनाच्या नोंदणी प्रमाणपत्राकरीता ऑफीसीअल स्मार्ट कार्डचा वापर करण्याबाबत रु.150/– ची फी ग्राहकांना स्मार्ट कार्ड ऑपरेटरला देण्यात येत असते. सदरची रु.150/– ची फी ग्राहकांना स्मार्ट कार्ड ऑपरेटरला करारानुसार देण्याबाबतचा करार झाला असला तरी त्या कराराची प्रत त्यांना मिळणे आवश्यक आहे. तसेच मुद्या क्र. 1 बाबत त्यांचे वाहन क्र. एम एच 31–डी ई–6840 च्या संदर्भात फॉर्म नं. 23–बी ची संगणकावर उपलब्ध असलेली प्रत त्यांना देण्यात यावी असे अपीलकर्ता यांच्या वकीलांनी सुनावणीत नमुद केले.

3. आजच्या सुनावणीस जन माहिती अधिकारी तथा सहा प्रादेशिक परिवहन अधिकारी, नागपूर श्री पुरोहीत हे उपस्थित होते. तसेच जन माहिती अधिकारी परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई यांच्या वतीने श्री लांडे प्रादेशिक परिवहन अधिकारी, नागपूर हे उपस्थित होते. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, प्रादेशिक परिवहन कार्यालय नागपूर(शहर) श्री बढीये हे उपस्थित होते. जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीत आयोगा पुढे असे सांगितले की अपीलकर्त्याचा दि. 6.7.2010 चा माहिती मागण्याचा अर्ज त्यांचे कार्यालयाकडे प्राप्त झाला होता. त्या अर्जाला अनुसरुन अपीलकर्त्यास दि. 5.8.2010 रोजी शुल्क भरण्याबाबत कळविले होते आणि त्याच बरोबर दि. 5.8.2010 रोजी त्यांचे कार्यालयात जी माहिती उपलब्ध होती ती माहीती देखील अपीलकर्त्यास पाठविण्यात आली. त्यानंतर अपीलकर्त्याने जन माहिती अधिकारी यांचेकडे दि. 18.8.2010 रोजी विहित शुल्क जमा केले आणि त्यानंतर पुन्हा अपीलकर्त्यास दि. 27.8.2010 रोजी माहिती उपलब्ध करुन देण्यात आली असे जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सुनावणीत नमुद केले.

4. तथापी सदरची माहिती अपीलकर्त्यास प्राप्त झाल्याचे अपीलकर्ता यांच्या वकीलांनी सुनावणीत मान्य केले. मात्र मुद्या क. 1,5,6 ची माहिती अपेक्षे प्रमाणे उपलब्ध झाली नाही म्हणून त्यांनी प्रथम अपील दाखल केले. याबाबत प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणीत असे नमुद केले की अपीलकर्त्याचे प्रथम अपील त्यांच्याकडे दि. 8.9.2010 रोजी दाखल केले होते. त्याची सुनावणी घेण्यात आली व सुनावणी घेवून अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी माहिती प्राप्त करुन दिली असल्यामुळे अपील अर्ज निकाली काढला आणि मुद्या क. 5 व 6 बाबतची माहिती अपीलकर्त्यास पुरविण्यासाठी सदरचा अर्ज परिवहन आयुक्त मुंबई यांचेकडे वर्ग करण्यात आला. तथापी जन माहिती अधिकारी परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई यांनी आयोगापुढे लेखी खुलासा सादर केलेला असून त्यामध्ये असे नमुद केले की अपीलकर्त्यास जन माहिती अधिकारी यांनी आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यामुळे अपीलकर्त्याचे द्वितीय अपील फेटाळण्यात यावे असा लेखी खुलासा त्यांनी आयोगापुढे सादर केलेला आहे.

5. अपीलकर्ता यांचे वकील श्री तुषार मंडलेकर तसेच जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे एकून घेतल्यानंतर प्रस्तूत प्रकरणी असे दिसून येते की अपीलकर्त्याच्या माहिती अधिकारा खालील अर्जाला अनुसरुन जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास दि. 5.8.2010 च्या पत्राने माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. मात्र मुद्या क. 1,5,6 बाबत पूर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येत नाही. म्हणून मुद्या क. 1 बाबत अपीलकर्त्यास त्यांचे वाहन क. एम एच 31– डी ई–6840 च्या संदर्भात फॉर्म नं. 23–बी च्या माहितीची संगणकावर उपलब्ध असलेली प्रिंटची प्रत देणे संयुक्तिक होईल. तसेच मुद्या क. 5 व 6 बाबत मोटार वाहनाच्या नोंदणी प्रमाणपत्राकरीता ऑफीसीअल स्मार्ट कार्डच्या स्वरुपात देण्याचे काम विहित केलेल्या अटी व शर्तीच्या करारनाम्याची प्रत व्यापक जनहिताच्या दृष्टीकोनातून अपीलकर्त्यास उपलब्ध करुन देणे संयुक्तिक होईल. म्हणून अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

## आ दे श

1) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजुर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून 10 दिवसाचे आंत जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना मुद्या क. 1 बाबतची माहिती त्यांचे कार्यालयात संगणकावर नमुद केल्याप्रमाणे फॉर्म नं. 23–बी च्या प्रिंटची प्रत विनामुल्य उपलब्ध करुन द्यावी.

2) त्याचप्रमाणे मुद्या क्र. 5 व 6 बाबत मोटार वाहनाच्या नोंदणी प्रमाणपत्राकरीता ऑफीसीअल स्मार्ट कार्डच्या स्वरुपात देण्याचे काम विहित केलेल्या अटी व शर्तीच्या करारनाम्याची प्रत जन माहिती अधिकारी यांनी परिवहन आयुक्त कार्यालय, मुंबई यांचेकडून प्राप्त करुन घेवून विनामुल्य अपीलकर्ता यांना पुरवावी.

3) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक एक प्रत देण्यात यावी.

**( पी. डब्ल्यु. पाटील )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**

**नागपूर**
Ageyord6.1602-1605

जा.क्र.————————— दि..................

मा. राज्य माहिती आयुक्त खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रत.

**उपसचिव**
**राज्य माहिती आयोग,**
**खंडपीठ नागपूर.**